अकोला । शुक्रवार
दि. ४ जुलै २०२५
वर्ष : १९ अंक : १२४
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत**
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये

### शुभमन गिलने रचला इतिहास!



इंग्लंडमध्ये द्विशतक झळकावणारा गिल हा पहिलाच भारतीय कर्णधार ठरला आहे. याशिवाय, त्याने दिग्गज सुनील गावस्कर आणि राहुल द्रविड यांच्या पंक्तीत स्थान मिळवले. इंग्लंडमध्ये द्विशतक झळकावणारा शुभमन गिल हा भारताचा तिसरा खेळाडू ठरला.

**(सविस्तर वृत्त क्रीडा पानावर )**

## थोडक्यात

### पिक्चर अभी बाकी हैं – राणेंचा हल्लाबोल



**मुंबई :** दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणात उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांना दिलासा मिळाला आहे. मुंबई पोलिसांनी त्यांना क्लीन चिट दिली आहे. याविषयी भाजप नेते आणि विद्यमान मंत्री नितेश राणे यांनी आज माध्यमांशी बोलताना 'पिक्चर अभी बाकी हैं, अस म्हणत टोला लगावला आहे. कोर्टात चालू असलेला मॅटर आहे. त्याबद्दल किती भाष्य करु शकतो, यावर प्रश्नचिन्ह आहे. हा नितेश राणेंचा विषय नाही. राजकीय आरोपांचा विषय नाही. दिशा सालियानचे वडील ज्यांनी स्वतची मुलगी गमावली ते राजकीय आरोप करणार आहेत का? ते मुद्दामून कोणाचं नाव घेणार का? त्यांनी जे प्रतिज्ञापत्र कोर्टात सादर केलं, दिशा सालियानच्या वडिलांनी डिनो मारियो, आदित्य ठाकरे यांची नाव घेतली आहेत. म्हणून मी एवढच सांगेन पिक्चर अजून बाकी आहे. पूर्ण पिक्चर अजून संपलेला नाही. १६ तारीख दिली आहे. त्या तारखेला काय होत ते आपण बघू, असं नितेश राणे म्हणाले.

### दरडग्रस्त कुटुंबियांचे पुर्नवसन करावे–दानवे



**मुंबई :** महाड तालुक्यातील तळीये येथील दरड पडून झालेल्या दुर्घटनेला ४ वर्षे होत आले तरी अद्याप पूर्णपणे दरडग्रस्त कुटुंबियांचे पुर्नवसन करण्यात आले नाही, ही बाब विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणली. तसेच या पावसाळ्यात अशी दुर्घटना होऊ नये, यासाठी लवकरात लवकर या कुटुंबियांचे पुर्नवसन करण्याची मागणी दानवे यांनी केली. दरडग्रस्त तळीये गावात दरड कोसळून ६६ लोकांचा मृत्यू झाला असल्याने या गावाचे पुनर्वसन करण्याचे शासनाने ठरवले होते. आतापर्यंत फक्त ६६ कुटुंबांना घरे मिळाली असून बाकीचे कुटुंब अजूनही असुरक्षित ठिकाणी राहत आहेत. सदर ठिकाणी अजूनही पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि निवासाची व्यवस्था करण्यात आली नाही. त्यामुळे नागरी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याची मागणीही दानवे यांनी केली.

### पतंजली च्यवनप्राशच्या जाहिरातीवर बंदी

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी पतंजलीला डाबर च्यवनप्राशविरुद्ध कोणतीही नकारात्मक किंवा दिशाभूल करणारी जाहिरात दाखवू नये असे निर्देश दिले. डाबरने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी केल्यानंतर न्यायमूर्ती मिनी पुष्कर्ण यांनी हा आदेश दिला. डाबरने न्यायालयात युक्तिवाद केला की अशा जाहिराती त्यांच्या उत्पादनाची केवळ बदनामी करत नाहीत तर ग्राहकांची दिशाभूल देखील करतात. त्यांनी म्हटले की च्यवनप्राश हे एक पारंपारिक आयुर्वेदिक औषध आहे, जे औषधे आणि सौंदर्यप्रसाधने कायद्यांतर्गत नियमांनुसार तयार केले पाहिजे. अशा परिस्थितीत, इतर ब्रँडना सामान्य म्हणणे चुकीचे, दिशाभूल करणारे आणि हानिकारक आहे. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी १४ जुलै रोजी होणार आहे. सध्या पतंजली च्यवनप्राशच्या जाहिरातीवर बंदी घालण्यात आली आहे.

# प्रत्येक भारतीयावर ४ लाख ८० हजारांचे कर्ज!

## आरबीआयच्या रिपोर्टने उडाली खळबळ

**नवी दिल्ली, दि. ३** वृत्तसंस्था



रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नव्या रिपोर्टने खळबळ उडाली आहे. मागील दोन वर्षात प्रत्येक भारतीयावरील भांडवली कर्जात प्रचंड वाढ झाली असून, ते ९० हजाराने वाढून ४ लाख ८० हजाराच्या घरात गेले आहे. यावरूनच काँग्रेसने मोदी सरकारवर हल्ला चढवला. सगळे सरकारी प्रकल्प पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप किंवा खासगी भागीदारीतून होत आहेत, तर मग देशावर हे कर्ज का वाढत चालले आहे?, असा सवाल काँग्रेसने उपस्थित केला आहे.

काँग्रेसचे माध्यम प्रमुख जयराम रमेश यांनी म्हटले आहे की, मोदी सरकारने मागील ११ वर्षाच्या काळात देशाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली. लोकांचे आयुष्य सुधारण्याऐवजी फक्त उद्योगपती मित्रांसाठी धोरणे बनवली. त्यातून झालेले नुकसान देशातील जनतेला सोसावे लागत आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नव्या अहवालात भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल चिंता वाढवणारे चित्र समोर आले आहे. सरकारकडून आकड्यांचा खेळ आणि तज्ज्ञांची मदत घेऊन मूळ उणीवा लपवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पण, हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही की, देशावरील कर्जाचे ओझे मोदीराजमध्ये उच्चांकी पातळीवर गेले आहे, असे रमेश यांनी म्हटले आहे. देशात मागील २ वर्षांत प्रत्येक व्यक्तीवरील कर्ज ९० हजारांनी वाढून ४.८ लाख झाले आहे. हातात येणा-या कमाईतील २५.७ टक्के पैसे फक्त कर्ज फेडण्यात चालले आहे. सर्वात जास्त ५५ टक्के कर्ज कथित क्रेडिट कार्ड, मोबाईल ईएमआय याच्यासाठी जात आहे. याचा अर्थ महागाईमुळे कुटुंबीयांचा उदरनिर्वाह होत नाही आणि कर्ज घेण्याची नामुष्की त्यांच्यावर येत आहे, असे जयराम रमेश म्हणाले.

## आरबीआयचा सर्वसामान्य व्यावसायिकांना दिलासा!

**नवी दिल्ली, दि. ३** वृत्तसंस्था




रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बँकेने कर्ज ग्राहकांना मोठा निर्णय घेत दिलासा दिला आहे. जानेवारी २०२६ पासून मंजूर किंवा नूतनीकरण केलेल्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांना फ्लोटिंग रेट कर्जांवर कोणताही आगाऊ दंड आकारू नये असे निर्देश आरबीआयने बँका आणि विनाबँकिंग वित्तीय कंपन्यांना दिले आहेत. सूक्ष्म आणि लघु उद्योगांना सुलभ आणि परवडणारे वित्तपुरवठा उपलब्ध असणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रामुख्याने निरीक्षण नोंदवत बँकिंग नियामकाने म्हटले आहे की त्यांच्या पर्यवेक्षी पुनरावलोकनांमध्ये सूक्ष्म आणि लघु उद्योगांना मंजूर केलेल्या कर्जांवर प्रीपेमेंट शुल्क आकारण्याच्या बाबतीत कर्जदारांनी वेगवेगळ्या पद्धती वापरल्या आहेत, ज्यामुळे ग्राहकांच्या तक्रारी आणि वाद निर्माण झाले आहेत. या कारणांमुळे या अनैतिक व्यवसाय पद्धतीला आरबीआयने चाप लावण्याचा निर्णय उच्चस्तरीय पातळीवर घेतला आहे. शिवाय, काही नियमन केलेल्या संस्था कर्जदारांना कमी व्याजदर किंवा चांगल्या सेवा अटी मिळविण्यासाठी दुसऱ्या कर्जदात्याकडे जाण्यापासून रोखण्यासाठी कर्ज करार किंवा करारांमध्ये प्रतिबंधात्मक कलमे समाविष्ट करत असल्याचे आढळून आले आहे, असे नेमके आरबीआयने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे. या निर्णयामुळे कर्ज लवचिकता वाढेल आणि कर्जदारांमध्ये स्पर्धा वाढेल अशी अपेक्षा आहे. कर्जदारांना मंजुरी पत्रे आणि कर्ज करारांमध्ये आणि लागू असल्यास, मुख्य तथ्ये विधानात पूर्व-पेमेंट कलमांबद्दल स्पष्टपणे माहिती देण्याचे निर्देश आरबीआयने दिले आहेत. मात्र लघु वित्त बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, टियर-३ प्राथमिक (शहरी) सहकारी बँका, राज्य सहकारी बँका, केंद्रीय सहकारी बँका आणि मध्यम स्तरावरील एनबीएफसींना अपवाद करण्यात आले आहे. या संस्थांना मंजूर रकमेच्या किंवा ५० लाखांपर्यंतच्या मर्यादेच्या कर्जावर कोणतेही प्रीपेमेंट शुल्क आकारण्याची परवानगी नाही याआधीच नाही. हे निर्देश १ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर मंजूर झालेल्या किंवा नूतनीकरण केलेल्या सर्व कर्जांना आणि आगाऊ कर्जांना लागू असतील, असेही आरबीआयने म्हटले आहे. कॅश क्रेडिट किंवा ओव्हरड्राफ्ट सुविधांच्या बाबतीत, कर्जदाराने कर्ज करारात नमूद केलेल्या कालावधीपूर्वी सुविधा नूतनीकरण न करण्याचा त्यांचा हेतू नियमन केलेल्या संस्थेला कळवला तर कोणतेही प्रीपेमेंट शुल्क लागू होणार नाही, परंतु जर सुविधा देय तारखेला बंद झाली तर, असे अधिसूचनेत म्हटले आहे. नियामकाने आधीच कर्जदारांना किरकोळ कर्ज ग्राहकांकडून प्रीपेमेंट दंड आकारण्यास मनाई केली होती.

# सरकारी व्यवस्था शेतकऱ्यांसाठी मारक!

## महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर राहुल गांधी आक्रमक

**नवी दिल्ली, दि. ३** वृत्तसंस्था



शेतकरी दिवसेंदिवस कर्जाच्या खाईत बुडत असून, सरकार त्यांच्या दुरवस्थेबाबत पूर्णपणे उदासीन आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफी आणि पिकांना किमान आधारभूत किंमत (एमएसपी) देण्याच्या कायदेशीर हमीच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहे, अशा शब्दांमध्ये लोकसभा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी आज (दि. ३ जुलै) महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारवर हल्लाबोल केला.

राहुल गांधी यांनी अधिकृत एक्स पोस्टमध्ये लिहिले की, महाराष्ट्रामध्ये तीन महिन्यांत ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, पण सरकार यावर शांत आहे. हा केवळ एक आकडा आहे का? ही ७६७ कुटुंबं आता कधीही सावरू शकणार नाहीत. एका दैनिकाच्या रिपोर्टचा अहवालाचा संदर्भ देत त्यांनी लिहिले की, शेतकरी दररोज कर्जाच्या ओझ्याखाली दबला जात आहे. बियाणे महाग, खते महाग, डिझेल महाग, पण एमएसपीची कोणतीही हमी नाही. जेव्हा ते कर्जमाफीची मागणी करतात, तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. पण ज्यांच्याकडे कोट्यवधी रुपये आहेत, त्यांची कर्जे मोदी सरकार सहज माफ करते. मोदीजी म्हणाले होते, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू, पण आज परिस्थिती अशी आहे की अन्नदात्याचे आयुष्यच संपत चालले आहे. ही व्यवस्था शेतकऱ्यांचा जीव घेत आहे आणि मोदीजी आपल्याच प्रसिद्धीचा (पीआर) तमाशा पाहत आहेत, अशी बोचरी टीकाही राहुल गांधी यांनी केली आहे. दरम्यान, भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी राहुल गांधींवर पलटवार केला आहे. त्यांनी एक्स वर एक तक्ता **(पान २ वर)**

## दिशा सालियन मृत्यू : आदित्य ठाकरेंना क्लीन चिट!

**मुंबई, दि. ३** वृत्तसंस्था



सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणी नवा ट्विस्ट समोर आला आहे. या प्रकरणात आदित्य ठाकरेंना क्लीन चिट मिळाली आहे. दिशाची हत्या झाल्याचे किंवा तिच्यावर कोणत्याही प्रकारचा लैंगिक अत्याचार झाल्याचे पुराव्यांतून सिद्ध झालेले नाही, असे पोलिसांनी म्हटले आहे.

सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियनची हत्या झाल्याचे किंवा तिच्यावर कोणत्याही प्रकारचा लैंगिक अत्याचार झाल्याचे वैद्यकीय आणि वैज्ञानिक पुराव्यांतून सिद्ध झालेले नाही, अशी माहिती मुंबई पोलिसांनी उच्च न्यायालयात दिली. दिशा सालियनच्या वडिलांनी केलेल्या याचिकेत शिवसेना (ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांच्यावर आरोप करण्यात आला होता. या याचिकेवर पोलिसांनी हे **(पान २ वर)**

### सूडबुद्धीने याचिका – आदित्य ठाकरे

दिशा सालियन मृत्यूप्रकरणी निर्णय देण्याआधी आपली बाजू ऐकून घ्यावी, अशी मागणी आदित्य ठाकरे यांच्या वतीने उच्च न्यायालयात करण्यात आली. ठाकरे यांनी हस्तक्षेप याचिकेद्वारे ही मागणी केली. या प्रकरणी आपण प्रतिवादी नसलो तरीही आपलं नाव राजकीय सूडबुद्धीने गोवण्यात आले आहे. आपल्याविरोधात द्वेषाने, वैयक्तिक आणि राजकीय सूड उगवण्यासाठी खोटी, निरर्थक याचिका केल्याचा दावाही ठाकरेंनी केला आहे.

## मालीमध्ये दहशतवाद्यांकडून तीन भारतीयांचे अपहरण

**माली, दि. ३** वृत्तसंस्था

मालीमधील एका सिमेंट कारखान्यात काम करणाऱ्या तीन भारतीय नागरिकांचे अल-कायदाशी संबंधित दहशतवाद्यांनी अपहरण केले आहे. एका वृत्तानुसार, गुरुवारी अधिकाऱ्यांनी याची पुष्टी केली आहे. पश्चिम आफ्रिकी देश मालीच्या अनेक भागात दहशतवादी हल्ले झाले आहेत. दरम्यान, भारतीय नागरिकांचे अपहरण करण्यात आले. याबद्दल चिंता व्यक्त करत भारताने माली सरकारला त्यांची सुटका सुनिश्चित करण्यास सांगितले आहे.

भारतीयांच्या अपहरणानंतर, भारताने माली सरकारला त्यांची सुरक्षित आणि लवकर सुटका सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलण्यास सांगितले. परराष्ट्र मंत्रालयाने कायेस येथील डायमंड सिमेंट कारखान्यात काम करणाऱ्या भारतीयांच्या अपहरणाबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, ही घटना १ जुलै रोजी घडली, जेव्हा हल्लेखोरांच्या एका गटाने कारखान्याच्या परिसरात हल्ला केला आणि तीन भारतीय नागरिकांना जबरदस्तीने ओलीस ठेवले. मालीमधील हल्ल्याची जबाबदारी अल-कायदाशी संबंधित जमात नुसरत अल-इस्लाम वाल-मुस्लिमीनने स्वीकारली, परंतु अपहरणावर कोणीही प्रतिक्रिया दिलेली नाही. भारत याबाबत माली सरकारशी सतत संपर्कात आहे. गेल्या काही वर्षांत मालीमध्ये अनेक दहशतवादी हल्ले झाले आहेत. १ जुलै रोजी **(पान २ वर)**

## फक्त दलाई लामाच त्यांचा उत्तराधिकारी ठरवू शकतात

### भारताने चीनला दिली योग्य पद्धतीने समज

**नवी दिल्ली, दि. ३** वृत्तसंस्था



भारताने चीनला, फक्त तिबेटी आध्यात्मिक नेते दलाई लामाच त्यांच्या उत्तराधिकाऱ्याबाबत निर्णय घेऊ शकतात, असे स्पष्ट शब्दात सांगितले आहे.

भारताने आज चीनला सांगताना, त्यांनी दलाई लामा यांच्या पुनर्जन्माला मान्यता द्यावी. असे म्हटले आहे. दलाई लामा यांनी नुकतेच त्यांनी स्थापन केलेल्या गादेन फोडरंग ट्रस्टला त्यांचा पुनर्जन्म ओळखण्याचा अधिकार आहे, परंतु दुसरीकडे चीन दलाई लामांचा उत्तराधिकारी निवडेल असा आग्रह धरत आहे. मात्र, १४ व्या दलाई लामांनी स्पष्टपणे सांगितले होते की, या प्रकरणात कोणालाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी, दलाई लामा यांचे स्थान केवळ तिबेटी लोकांसाठीच नाही तर जगभरातील त्यांच्या सर्व अनुयायांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांचा उत्तराधिकारी ठरवण्याचा अधिकार पूर्णपणे दलाई लामांचा आहे. भारताने असेही म्हटले आहे की केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू आणि राजीव रंजन सिंह रविवारी १४ व्या दलाई लामा यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या समारंभात सहभागी होतील. भविष्यातील दलाई लामा यांना मान्यता देण्याची प्रक्रिया २४ सप्टेंबर २०११ च्या निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहे, असे दलाई लामा यांच्या कार्यालयाने एका निवेदनात म्हटले आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते माओ निंग म्हणाले की, दलाई लामा यांच्या उत्तराधिकारीची निवड चीनच्या सीमेत त्यांच्या देखरेखीखाली झाली पाहिजे.

### दलाई लामा १९५९ पासून भारतात

दलाई लामा १९५९ पासून भारतात निर्वासित जीवन जगत आहेत. जेव्हा चिनी राजवटीविरुद्ध बंड झाले तेव्हा ते तेथून भारतात आले. दलाई लामा यांना जगभरात अहिंसा, करुणा आणि तिबेटी लोकांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक ओळखीचे रक्षण करण्यासाठीच्या संघर्षाचे प्रतीक म्हणून पाहिले जाते, तर बीजिंग त्यांना फुटीरतावादी म्हणून वर्णन करते. निर्वासित असलेल्या अनेक तिबेटींना भीती आहे की भविष्यात चीन स्वतःचा दलाई लामा नियुक्त करण्याचा प्रयत्न करू शकेल.

## बागेश्वर धाममध्ये शेड कोसळल्याने एकाचा मृत्यू; १० भाविक जखमी

**भोपाळ :** मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील गढा गावात असलेल्या बागेश्वर धाम याठिकाणी एक मोठी दुर्घटना घडली आहे. धामचे पीठाधीश धीरेंद्र शास्त्री यांच्या वाढदिवसाच्या एक दिवस आधी आज सकाळी आरतीनंतर याठिकाणी टिन शेड कोसळले. यादरम्यान एका भक्ताच्या डोक्यावर लोखंडी अँगल पडला, ज्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात इतर १० जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान,या दुर्घटनेत जखमींना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

छतरपूर जिल्हा रुग्णालयाच्या डॉक्टरांनी सांगितले की, एकाला मृत अवस्थेत आणण्यात आले होते. त्याचे पोस्टमार्टम करण्यात आले आहे. एका रुग्णाचे सीटी स्कॅन करण्यात आले आहे. त्याची प्रकृती ठीक आहे. जखमी भक्ताने सांगितले की, सकाळी ७.३० च्या सुमारास हा अपघात झाला, जेव्हा लोक पावसापासून वाचण्यासाठी तंबूखाली जमले होते. मृत भक्ताचे नाव राजेश कुमार कौशल असे आहे, **(पान २ वर)**

# आश्रमात गोळ्यांची पाकिटे, आयपॅड, सिमकार्डचा खच!

## पुण्यातील भोंदूबाबाचा हायटेक कारनामा समोर

**पुणे, दि. ३** वृत्तसंस्था



सांस्कृतिक आणि शैक्षणिक नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्यात एका भोंदूबाबाच्या काळ्या कारनाम्यांनी खळबळ उडवली आहे. प्रसाद तामदार (वय २९, रा. सूस गाव, मुळशी) या तथाकथित बाबाला बावधन पोलिसांनी अटक केली असून, त्याच्यावर गंभीर आरोपांचा डोंगर उभा राहिला आहे.

अंधश्रद्धेचा गैरफायदा घेत भक्तांची फसवणूक करणाऱ्या या भोंदूबाबाच्या आश्रमातून पोलिसांना धक्कादायक पुरावे हाती लागले आहेत. यामध्ये वेगवेगळ्या गोळ्यांची पाकिटे, ३ मोबाईल, २ आयपॅड, सिमकार्ड आणि पेन ड्राइव्ह यांचा समावेश आहे. हा बाबा हायटेक पद्धतीने भक्तांच्या खासगी आयुष्यावर नजर ठेवत होता आणि गुंगीच्या गोळ्या देऊन अश्लील कृत्ये करत होता, असा गंभीर आरोप पोलिस तपासातून समोर आला आहे. पोलिस तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, प्रसाद तामदार हा भक्तांच्या मोबाइलमध्ये 'हिडन ॲप' डाऊनलोड करून त्यांच्या खासगी क्षणांवर पाळत ठेवत असे. याशिवाय, तो भक्तांना गुंगीचे औषध देऊन त्यांच्यावर अश्लील अत्याचार करत होता. पाच वेगवेगळ्या भक्तांच्या जबाबातून या कृत्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. बाबा स्वतः ला 'संकटमोचक' म्हणवून भक्तांचे दोष स्वतःवर घेत असल्याचा दावा करत असे. विशेष म्हणजे, त्याच्या उपायांचा विरोध करणाऱ्या भक्तांना तो मृत्यूची भीती दाखवत असे. यामुळे अनेक भक्त मानसिक दबावाखाली त्याच्या सांगण्याप्रमाणे वागत होते. भोंदूबाबाची पोलिस कोठडी संपत असताना पोलिसांनी आणखी ठोस पुरावे गोळा केले आहेत. या प्रकरणात आणखी किती भक्त बळी पडले असतील, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. या हायटेक भोंदूबाबाच्या कारनाम्यांनी पुण्यातील अंधश्रद्धेचा काळा बाजार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. या प्रकरणाने पुन्हा एकदा अंधश्रद्धेच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. पोलिसांनी या भोंदूबाबाला जेरबंद केले असले, तरी समाजात अशा बाबांच्या जाळ्यात अडकणाऱ्या भक्तांनी सावध राहण्याची गरज आहे. पोलिस आता या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, लवकरच आणखी खुलासे होण्याची शक्यता आहे.

### आश्रमातून जप्त केलेले धक्कादायक पुरावे

पोलिसांनी भोंदूबाबाच्या आश्रमातून जप्त केलेल्या वस्तूंमध्ये सोलोपोशे ०.५ एमडीच्या गोळ्यांचे मोकळे पाकीट, प्रोव्हेनॉलच्या ९ गोळ्या, ३ मोबाईल, २ आयपॅड, सिमकार्ड आणि पेन ड्राइव्ह यांचा समावेश आहे. या इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये अश्लील व्हिडिओ क्लिप्स असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. यासाठी पोलिस हे साहित्य न्याय वैद्यकीय प्रयोगशाळेत (फॉरेन्सिक लॅब) पाठवणार असून, त्यातील डेटा तपासला जाणार आहे. याशिवाय, आश्रमात आढळलेल्या इतर वैद्यकीय औषधांचा नेमका उपयोग काय होता, याचाही तपास पोलिस करत आहेत.

## जमियत उलेमा–ए–इस्लाम पाकिस्तानच्या मुफ्ती हबीबुल्ला हक्कानीची हत्या!

**बरवाल, दि. ३** वृत्तसंस्था



पाकिस्तानमधील अप्पर दिरच्या बरवाल बेंद्रा भागात जमियत उलेमा-ए-इस्लाम पाकिस्तानच्या मुफ्ती हबीबुल्ला हक्कानीची घरात घुसून हत्या करण्यात आली. हबीबुल्ला हक्कानी मूलतत्ववादी विचारांचा नेता होता. हल्लेखोरांनी त्याच्या घरात घुसून गोळीबार केला. या गोळीबारात हबीबुल्ला हक्कानी ठार झाला आणि त्याची पत्नी जखमी झाली. हबीबुल्ला हक्कानीच्या जखमी पत्नीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हल्ल्याची जबाबदारी कोणीही स्वीकारलेली नाही. तपास पथकाने अज्ञातांनी हल्ला केल्याची माहिती दिली. तर जमियत उलेमा-ए-इस्लाम पंजाबचे अमीर, जामिया मदनिया जदीदचे प्रमुख मौलाना सय्यद मेहमूद मियांचे दीर्घ आजाराने निधन झाले. भारताच्या ऑपरेशन सिंदूर नंतर काही आठवड्यातच हबीबुल्ला हक्कानीची अज्ञातांनी हत्या केली आहे. हा पाकिस्तानच्या भारतविरोधी अतिरेकी कारवायांना मोठा धक्का असल्याची चर्चा आहे. जमियत उलेमा-ए-इस्लाम पाकिस्तान ही एक जहाल मूलत्ववादी विचारांची संघटना आहे. इस्लामचा प्रचार प्रसार करणे आणि धर्मयुद्ध लढण्याच्या नावाखाली अतिरेकी तयार करुन भारताविरोधात वापरणे हे जमियतचे प्रमुख काम आहे. यामुळे जमियतशी संबंधित महत्त्वाच्या नेत्याच्या हत्येने अतिरेक्यांच्या कारवायांना धक्का बसल्याची चर्चा आहे.

## पान 1 वरून...

### सरकारी व्यवस्था शेतकऱ्यांना ...

(चार्ट) शेअर करत दावा केला की, राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस सरकारच्या १५ वर्षांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात ५५,९२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. मृतांची आकडेवारी मोजण्याचे राजकारण घृणास्पद आहे, परंतु राहुल गांधींसारख्या लोकांना आरसा दाखवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. काहीही बोलण्यापूर्वी राहुल गांधींनी महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस सरकारच्या कार्यकाळात झालेल्या पापांची आठवण करायला हवी.

**विरोधी पक्षांचा विधानसभेतून सभात्याग**

महाराष्ट्र विधिमंडळातून विरोधी पक्षांच्या सदस्यांनी शेतकरी आत्महत्या आणि राज्यातील सोयाबीन उत्पादकांची थकबाकी न मिळाल्याच्या मुद्द्यांवरून महाराष्ट्र विधानसभेतून दोनदा सभात्याग केला होता. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत दावा केला होता की, यावर्षी जानेवारी ते मार्च या कालावधीत महाराष्ट्रात ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी २०० प्रकरणे मदतीसाठी अपात्र ठरवण्यात आली असून, १९४ प्रकरणांची चौकशी अद्याप प्रलंबित आहे, असेही ते म्हणाले.

### दिशा सालियन मृत्यू ...

प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. दिशाची हत्या झाल्याचा आणि त्यापूर्वी तिच्यावर सामूहिक बलात्कार झाल्याचा दावा करून प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याच्या मागणीसाठी तिचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठापुढे ही याचिका सुनावणीसाठी आली. त्यावेळी मालवणी पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकांनी या प्रकरणी प्रतिज्ञापत्र दाखल केले. या प्रतिज्ञापत्रात सतीश यांनी केलेल्या दाव्यांचे खंडन केले आहे. प्रतिज्ञापत्रात घटनेच्या दिवशी नेमके काय घडले हे नमूद केले आहे. तसेच घटनेच्या वेळी दिशासह असलेला तिचा प्रियकर आणि मित्रांनी दिलेल्या जबाबात सत्य असल्याचे म्हटले आहे.

### मालीमध्ये दहशतवाद्यांकडून ....

झालेल्या या दहशतवादी हल्ल्यापूर्वी गेल्या वर्षी १७ सप्टेंबर रोजी बामाकोमध्ये अनेक ठिकाणी हल्ला झाला होता. एएफपी वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, या हल्ल्यात ७७ जणांना आपला जीव गमवावा लागला होता. त्याच वेळी २०० हून अधिक लोक जखमी झाले होते. यापूर्वी ७ सप्टेंबर २०२३ रोजी टिंबक्टूजवळील नायजर नदीत एका बोटीवर हल्ला झाला होता. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या अहवालानुसार, या हल्ल्यात ७४ जणांचा मृत्यू झाला होता. त्यात ४९ नागरिकांचा समावेश होता, तर २० हल्लेखोर आणि बोटीच्या सुरक्षा पथकातील लोक होते.

### बागेश्वर धाममध्ये शेड ...

जो अयोध्येचा रहिवासी आहे. तो बुधवारी रात्री त्याच्या कुटुंबातील ६ सदस्यांसह बागेश्वर धाम याठिकाणी पोहोचला होता. शुक्रवारी धामचे पीठाधीश धीरेंद्र शास्त्री यांचा वाढदिवस आहे, त्यांच्या दर्शनासाठी ते आले होते. धीरेंद्र शास्त्री बागेश्वर धाममध्येच उपस्थित आहेत. बागेश्वर धामच्या अधिकृत सोशल मीडियावरून भाविकांना वाढदिवसानिमित्त आवाहन केले जात आहे. आज सकाळीच एका पोस्ट करत, ''फक्त एक दिवस शिल्लक आहे पूज्य सरकार यांच्या जयंतीला तुम्हा सर्वांना बागेश्वर धाम पीठात हार्दिक आमंत्रित केले आहे'' असे म्हटले गेले होते. धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांचा वाढदिवस बागेश्वर धाममध्ये एक मोठा उत्सव म्हणून साजरा केला जातो, ज्यामध्ये देशभरातील लाखो भाविक सहभागी होतात. त्यांच्या वाढदिवसानिमित्त धीरेंद्र शास्त्री यांनी भाविकांना भेट म्हणून त्यांना विटा दान करण्याचे आवाहन केले आहे. या विटाचा वापर रुग्णालय बांधण्यासाठी केला जाईल. अलीकडेच धीरेंद्र शास्त्री यांनी कर्करोग रुग्णालयाची पायाभरणी केली होती.

# तेल्हारा शहरामधील आरक्षणासह गुंठेवारीचा प्रश्न निकाली काढा

## युवा सेनेची पालिकेकडे मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ३ :** शहरामधील आरक्षणासह गुंठेवारीचा प्रश्न निकाली काढून घरकुलापासून वंचित असलेल्या गरिबांना घरकुल द्या व इंदिरानगर मधील नागरिकांच्या घरांचा प्रश्न सोडवा अशी मागणी युवासेनेच्या वतीने मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन करण्यात आलीआहे.
तेल्हारा शहरामधील जिजामाता नगर, नाथनगर तसेच इतर भागातील आरक्षणाचा प्रश्न निकाली काढून त्या भागातील नागरिकांना आपल्या हक्काच्या घराची, जागेची नोंद न.प.मध्ये करून त्यांचा प्रश्न मार्गी लावून सदर सर्व नागरिकांना पंतप्रधान आवास योजनेचा लाभ द्यावा तसेच ज्या भागांमध्ये पालिकेने गुंठेवारी व एन. ए. चा प्रश्न उपस्थित करून अनेक नागरिकांना पंतप्रधान घरकुल आवास योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे. त्यांना सदर योजनेचा लाभमिळविण्याकरिता यापूर्वी शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार गुंठेवारी भागातील घरे, मालमत्ता नियमित करण्यात याव्यात व एनएचा प्रश्न तत्काळ सोडविण्यात यावा तसेच बॉण्ड पेपर मालमत्ता धारकांना सुद्धा घरकुल चा लाभ घेण्यात यावा , शहरातील गुंठेवारीचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे त्यामुळे तो तात्काळ सोडविण्यात यावा तसेच शहरातील इंदिरानगर मधील रहिवाशांना ते ज्या ठिकाणी राहतात त्या जागेच्या मालकी हक्क त्यांना देण्यात यावा अशी मागणी युवा सेनेच्या वतीने करण्यात आले आहे मागणीचा विचार लवकरात लवकर न केल्यास जनहितार्थ आम्हाला आंदोलन करावे लागेल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. प्रा .सचिन थाटे,प्रदीप सोनटक्के, रामाभाऊ फाटकर,गौरव धुळे, स्वप्नील सुरे, राम वाकोडे,मोहन श्रीवास, प्रदीप राजुस्कर, दिलीप गावंडे यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# पंढरपूर स्पेशल ट्रेनचे अकोल्यात स्वागत

## ट्रेनच्या चालक आणि गार्डला केले सन्मानित

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३ :** आषाढी एकादशीच्या पवित्र सणाला हजारो भाविक पंढरपूरला जातात. भाविकांची संख्या लक्षात घेऊन आणि त्यांना चांगल्या सुविधा आणि आरामदायी मुक्काम मिळावा यासाठी मध्य रेल्वेने दरवर्षी प्रमाने यावर्षीही पंढरपूरसाठी अनेक विशेष गाड्या चालवत आहे.
या मालिकेत आज २ जुलै रोजी ट्रेन क्रमांक ०११९९ अमरावतीहून पंढरपूरला जाणारी यात्री स्पेशल ट्रेन अमरावतीहून दुपारी २:४० वाजता प्रवाश्यांना व भाविकांना घेऊन निघाली आणि ४:५० वाजता अकोला रेल्वे स्थानकावर पोहोचली. ही यात्री स्पेशल ट्रेन अकोला रेल्वे स्थानकावर पोहोचताच डीआरयूसीसी सदस्य ॲड. राजनारायण मिश्रा, विमल जैन (राज्याध्यक्ष महाराष्ट्र प्रवासी रेल सेवा संघ) यांनी तिचे जंगी स्वागत केले.
ट्रेनचे लोको पायलट एन. एन. कुंभारे आणि गार्ड यांना शाल व नारळ देऊन सम्मान करण्यात आला. यावेळी डिप्टीएसएस धीरज शर्मा, प्रकाशचंद्र बेहेरा, जीआरपीएफ स्टेशन प्रभारी अर्चना गाढवे मॅडम, आरपीएफ उपनिरीक्षक टिंगरे जी, रजनीकांत जी , दीपक गवई, प्रेम जयशंकर, ऋषी पाटील, मनोज बुंदेले, बडू भाऊ आणि राजेश मिश्रा यांची विशेष उपस्थिती होती.

# डॉक्टर धबाले यांच्याकडे पातूर होमगार्ड पथकाच्या प्रभारी समादेशक पदाचा कार्यभार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातूर, दि. ३ :**पातूर येथील होमगार्ड पथकाच्या प्रभारी समादेशक पदाचा कार्यभार १ मार्च २०२५ पासून डॉ. धबाले साहेब यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. मात्र, अद्यापही मागील प्रभारी समादेशकाकडून कोणतेही कागदपत्र, सेवा पुस्तिका अथवा आवश्यक साहित्य प्रदान करण्यात आलेले नाही. त्यामुळे संपूर्ण पथक व्यवस्थापनास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.
डॉ. धबाले यांनी यासंदर्भात दोनवेळा पातूर पोलिस स्टेशनमध्ये स्टेशन डायरीवर नोंद केली आहे. तरीही अद्याप त्यांना अधिकृत चार्ज देण्यात आलेला नाही. यामुळे प्रशासकीय कामकाजात व होमगार्ड सैनिकांच्या नियमित नोंदींमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. सदर पातूर पथकामध्ये सुमारे ९० होमगार्ड सैनिक कार्यरत आहेत, ज्यामध्ये पुरुष व महिला दोघांचाही समावेश आहे. नियमांनुसार दर तीन वर्षांनी या सैनिकांची पुनरनियुक्ती केली जाते, तसेच प्रशिक्षण व इतर सेवासंबंधित नोंदी सेवा पुस्तिकेत घेणे आवश्यक असते, मात्र यासाठी आवश्यक असलेली सेवा पुस्तिका व जुने अभिलेख उपलब्ध नसल्याने, प्रशिक्षण पूर्ण करून आलेल्या काही सैनिकांच्या नोंदी आजतागायत करण्यात आलेल्या नाहीत. विशेष म्हणजे, पातूर पथकातील काही सैनिकांनी मुंबई, घाटकोपर येथे प्रशिक्षणही पूर्ण केले आहे, पण त्याचे दस्तऐवजीकरण अद्याप बाकी आहे.

# 'माँ के नाम एक पेड' अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुर्तिजापूर, दि. ३ :** येथील इन्सपायरींग रेनबो गृप, तथा रॉकींग स्टार गृप यांच्या संयुक्त विद्यमाने आणि शासनाच्या उपक्रमा अंतर्गत येथील कोकणवाडी परीसरातील हनुमान मंदिर येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येवून मॉ. के नाम एक पेड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात करून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
इन्सपायरींग रेनबो गृप तथा रॉकींग स्टार गृप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात परीसरातील हनुमान मंदिर व विविध परीसरात नवनविन प्रजातींचे वृक्ष लागवड करण्यात आले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला विमल वानखडे ,प्रज्ञा हरीया, अनिता तिडके, तृप्ती कोल्हाडे, अनघा धामोरे,अशवीनी काळे, पल्लवी मुळे, भाग्यश्री मुळे, सरीता कुचर,जया टाले,प्रिती जयस्वाल, मनिषा बगाडे, पुनम अग्रवाल,सोनाली तायडे, जागृती डागा,आरती पोळकट,वर्षा लोडम,लता रघुवंशी आदी परीसरातील महीला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.वृक्षारोपण कार्यक्रमात परीसरात नवनविन प्रजातींचे वृक्ष लागवड करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन विमल हरीभाऊ वानखडे यांनी केले होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हरीभाऊ वानखडे, विभुती लोडम,भैरव कोल्हाडे, अभीराज तायडे, काव्या पोळकट,श्रेया टाले, भक्ती अग्रवाल, अक्षय काळे इत्यादीनी परीश्रम घेतले. आयोजीत वृक्षारोपण कार्यक्रमाला परीसरातील महीला बहुसंख्येने उपस्थित होते.

# मोबाईल हिसकण्याच्या दोन घटनातील तीन आरोपींना अटक!



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३ :** जुने शहर पोलीसांनी दोन वेगवेगळ्या मोबाईल चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावत तांत्रिक तपास व गुप्त माहितीच्या आधारे २४ तासांत ३ आरोपींना अटक केली. दोन्ही गुन्ह्यांत मिळून सुमारे ४.१५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन्ही प्रकरणांत एका विधी संघर्ष बालकाचा सहभाग उघडकीस आला आहे.
दिनांक २ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास सतिष प्रफुलचंद्र वखारीया (५१), रा. गीता नगर, जुने शहर) हे पायी जात असताना दोन अज्ञात आरोपींनी त्यांचा मोबाईल हिसकावून पळ काढला. यावरून जुने शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४५८/२०२५ कलम ३९२, ३४ भादंवि नोंदविण्यात आला.
तपासात प्रज्वल कैलास तायडे (१८)रा. यशवंत नगर, गल्ली नं. ३, वाशिम बायपास, अकोला) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून फिर्यादीचा विवो कंपनीचा मोबाईल (किंमत १५ हजार), गुन्ह्यात वापरलेली बजाज पल्सर मोटरसायकल (एम एच ३० बी वाय ३४८२, किंमत १ लाख४० हजार आणि आणखी एक रेडमी मोबाईल (किंमत २० हजार) असा एकूण १ लाख७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्ह्यात एक विधी संघर्ष बालकाचा सहभाग देखील आढळून आला आहे.

**ॲटो आडवा करून जबरदस्ती मोबाईल हिसकावला**

याच दिवशी दुपारी आशिष अरुण जाधव ( ५०) रा. ख्रिश्चन कॉलनी, खदान, अकोला) हे वाशिम बायपास मार्गे घरी जात असताना अचानक एका ॲटोने त्यांची मोटरसायकल आडवून उभी केली. ॲटोमधून उतरलेल्या तीन आरोपींनी जबरदस्तीने त्यांचा मोबाईल हिसकावून पलायन केले. यावरून जुने शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४४७/२०२५ कलम ३९२, ३४ भादंवि अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला.
तपासादरम्यान आरोपी आदित्य उर्फ गोपाल विजय अंभोरे (२१) व देव विनोद खंडारे ( २१), दोघेही रा. नित्यानंद नगर, तुकाराम चौक, अकोला, यांना अटक करण्यात आली.
त्यांच्याकडून फिर्यादीचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल (किंमत १८ हजार) आणि गुन्ह्यात वापरलेला महिंद्रा इलेक्ट्रिक ॲटो (एम एच ३० बीसी ३७७८, किंमत २ लाख४० हजार असा २ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या गुन्ह्यात देखील एक विधी संघर्ष बालकाचा सहभाग आढळून आला आहे. या दोन्ही प्रकरणांत मिळून एकूण ४ लाख१५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, संबंधित आरोपींविरुद्ध पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.
सदर कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सतिष कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, पो.उ.नि. रविंद्र करणकार, पो.अमलदार पंकज उपाध्याय, श्रीकांत पवार, सागर शिरसाट, पवन डांबलकर यांनी केली.

# महाराष्ट्र राज्याच्या आम आदमी पार्टी कार्यकारिणीमध्ये फेरबदल

## अरविंद कांबळे यांना मिळाली प्रदेश सहसचिवपदी नियुक्ती

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ३ :** आम आदमी पार्टी मध्ये आलेली मरगळ झटकून टाकण्यासाठी आणि कार्यकर्त्यांमध्ये नवीन जोश आणि उत्साह भरण्यासाठी प्रदेश पातळीवरील कार्यकारिणीमध्ये ३० जून रोजी फेरबदल करून नवीन कार्यकारिणी घोषित केली आहे. ज्यामध्ये अकोला जिल्ह्यात ग्रामीण भागात आम आदमी पक्ष पोहचवून जिल्हाभर कार्यकर्त्यांची फळी उभी करणारे अकोला जिल्ह्याचे माजी जिल्हाध्यक्ष अरविंद कांबळे यांचा प्रदेश कार्यकारिणी मध्ये समावेश करून त्यांचेवर प्रदेश सह सचिव पदाची जबाबदारीं सोपवीण्यात आली आहे.आम आदमी पार्टी महाराष्ट्र प्रभारी प्रकाश जरवाल, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके पाटील, प्रदेश सचिव डॉ. अभिजित मोरे आदी पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सह्या असणारे नियुक्ती पत्र देण्यात आले आहे.
अकोला जिल्ह्यातील माजी जिल्हाध्यक्ष अरविंद कांबले यांच्या कार्यकाळात विविध प्रश्नांवार वेळोवेळी आंदोलने, निदर्शने आणि मोर्चे काढले गेल्याने आम आदमी पार्टी हा पक्ष जिल्ह्यात खेडयापाड्यात पोहचला होता. मात्र त्यानंतर पार्टीने कोणत्याही निवडणुका न लढण्याचा निर्णय घेतल्याने पार्टी कार्यकर्त्यांचा हिरमोड झालेला आहे. आता मात्र देशपातळीवर पार्टीने स्थानिक स्वराज्य संस्थासह सर्वच निवडणुका लढविन्याचे जाहीर केल्याने उत्साही कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून नव्या दमाच्या कार्यकर्त्यांना उभारी देण्यासाठी पद नियुक्त्या दिल्या आहेत. त्यामुळे अकोला जिल्ह्यातीलज्ञानेश्वर साकरकर आणि डॉ तुषार बायस्कर यांच्या सह नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागण्याचा निश्चित केले आहे. प्रदेश कार्यकारिणी सदस्य अरविंद कांबळे हे अकोला जिल्ह्याचे माजी जिल्हाध्यक्ष असून, समाजाचे प्रतिनिधित्व करण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे. पक्षामध्ये सामाजिक समतोल साधण्यासाठी तसेच स्थानिक स्तरावर प्रभावी नियोजन करण्यासाठी कार्यकारिणी सदस्य म्हणून त्यांची नेमणूक करणे गरजेचे असल्याचा अभिप्राय अमरावती विभाग प्रमुख मनिष मोहोड यांनी दिल्यानुसार ही नियुक्ती देण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष कैलास प्राणजाळे, महानगर अध्यक्ष महसूद अहमद खान ,अकोला जिल्हा महासचिव प्रदिपकुमार गवई यांनी ह्या नवीन नियुक्तीचे स्वागत केले आहे.

# आषाढीत पंढरपूरमध्ये व्हीआयपी पासला बंदी

## सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांचा धाडसी निर्णय

पंढरपूर, दि. ३ वृत्तसंस्था

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल-रखुमाईचे 'व्हीआयपी' दर्शन पास दिल्यास आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत कारवाईचा इशारा सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला आहे. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी, प्रांताधिकारी , उपविभागीय पोलीस अधिकारी यांना याबाबत त्यांनी पत्राद्वारे आदेश दिला आहे. या निर्णयाचे भाविकांनी स्वागत केले आहे.
आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील मंत्री, आमदार, खासदार, अधिकाऱ्यांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने 'व्हीआयपी' पास घेऊन दर्शन घेतात. परिणामी दर्शनरांगेतील भाविकांना मात्र तासन् तास थांबावे लागते. यामध्ये अनेकजण मंत्री किंवा अन्य लोकप्रतिनिधींची शिपारस घेऊनही 'व्हीआयपी' म्हणून शरकाव करतात. यामुळे सामान्य भाविकांना मात्र दर्शनासाठी तिष्ठत राहावे लागते.
या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेत वरील आदेश काढला आहे.पंढरीत आषाढी यात्रा काळात रोज हजारो भाविक पंढरीत दाखल होत असतात. एकादशीच्या आसपास तर ही संख्या लाखोंच्या घरात जाते. गर्दीमुळे भाविकांना दर्शनासाठी अनेक तास रांगेत उभे राहावे लागते. त्यातच 'व्हीआयपी', ओळखीने दर्शन घेणाऱ्या भाविकांमुळे दर्शनासाठी तिष्ठत राहण्याचा काळ वाढतो.

# मेंढपाळांना दिलासा : चराईवर वनविभागाची बंदी उठविली

## बच्चू कडूंच्या पाठपुराव्याला यश, मंत्रालयात निर्णय

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**धनगर समाजाला दिलासा**

या निर्णयामुळे पशुपालक मेंढपाळांना मोठा दिलासा मिळाला असून अनेक वर्षांपासून चालत आलेल्या अडचणींवर मार्ग निघण्याची आशा निर्माण झाली आहे. बच्चू कडू यांनी सांगितले की, ''हा लढा अजून थांबलेला नाही, जोपर्यंत धनगर समाजाच्या सर्व मागण्यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत संघर्ष सुरूच राहील.

**मुंबई, दि.३:** प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी केलेल्या अन्नत्याग आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत मेंढपाळांना दिलासा देणारा निर्णय निगर्मीत करण्यात आला.मुंबई मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत वनविभागाच्या क्षेत्रात मेंढपाळांना चराईस बंदी घालण्यात येणार नाही असा स्पष्ट निर्णय घेण्यात आला.या निर्णयामुळे मेंढपाळांचा चराईचा मोठा प्रश्न मिटला आहे. शिवाय मंत्रालयात इतर विभागाच्या वतीने देखील बच्चू कडू यांच्या मागण्यांवर देखील निर्णय घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट संकेत आहे.
या बैठकीस बच्चू कडूंसह संबंधित विभागांचे मंत्री व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अन्नत्याग आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या चर्चेत बच्चू कडू यांनी सविस्तरपणे मेंढपाळ व धनगर समाजाच्या समस्या मांडल्या. यानंतर सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला. शेतकरी, शेतमजूर, मेंढपाळ, मच्छीमार, दिव्यांग, विधवा महिला, ग्रामपंचायत कर्मचारी, बेरोजगार तरुण अशा वंचित आणि उपेक्षित घटकांच्या प्रश्नांसाठी आमदार बच्चू कडू यांनी केलेल्या अन्नत्याग आंदोलनाची अखेर शासनास्तरावर दखल घेण्यात आली आहे.३ एप्रिल रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत आंदोलनात मांडलेल्या १७ महत्त्वाच्या मागण्यांवर सखोल चर्चा झाली असून लवकरच शासन निर्णय काढण्यात येईल, अशी माहिती खुद्द बच्चू कडू यांनी दिली. या बैठकीत शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, हमीभावावर २० टक्के अनुदान, तसेच शेतमजुरांना शेतकऱ्यांप्रमाणे आर्थिक सहाय्य देणे, त्यांच्यासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करणे यांसारख्या मागण्यांचा समावेश होता. तसेच दिव्यांग व विधवा महिलांना दरमहा ६००० रुपये मानधन, तरुणांच्या हाताला काम आणि त्यासाठी योग्य मोबदला, भरती प्रक्रिया राबवणे आणि ग्रामीण भागातील घरकुल योजनेंतर्गत ५ लाख रुपयांचे अनुदान देणे यासारख्या निर्णयांवरही सकारात्मक चर्चा झाली. अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या समाजघटकांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी हे आंदोलन निर्णायक ठरणार असल्याचे चित्र आहे. बच्चू कडू यांनी या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले की, ''आम्ही केवळ आंदोलनासाठी आंदोलन करत नाही, तर जनतेच्या हक्कांसाठी लढत आहोत. शासन सकारात्मक असून लवकरच मागण्या मान्य झाल्याचा अधिकृत निर्णय जाहीर होईल.''या आंदोलनामुळे ग्रामीण भागातील सामान्य जनतेच्या प्रश्नांना पुन्हा एकदा केंद्रस्थानी आणले गेले असून, आगामी काळात शासनाच्या निर्णयाकडे साऱ्या राज्याचे लक्ष लागले आहे.

# कृषिदिनी खरेदी-विक्री संघातर्फे शेतकऱ्यांचा सन्मान

## माजी मंत्री पुरके यांची उपस्थिती; राळेगाव येथे कार्यक्रमाचे आयोजन



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**राळेगाव, दि.३:** हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे व कृषीदिनाचे औचित्य साधून, राळेगाव येथील खरेदी-विक्री संघाच्या कार्यालयात दोन प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. राज्याचे माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंतराव पुरके यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा मंगळवारी, दि.१ जुलै रोजी पार पडला.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. वसंतराव पुरके यांनी स्व. नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन केले. त्यानंतर, कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल श्रीरामपूर येथील शेतकरी बाबाराव येरेकर आणि राळेगाव येथील शेतकरी प्रभाकर जुनगरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन प्रा. पुरके यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना प्रा. पुरके यांनी, वसंतराव नाईक यांनी शेतकरी आणि जनसामान्यांसाठी केलेल्या कार्याचे स्मरण करून दिले आणि आज देशाला त्यांच्यासारख्या दूरदृष्टीच्या नेत्यांची गरज असल्याचे मत व्यक्त केले.
या कार्यक्रमाला काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष इंजिनिअर अरविंद वाढोणकर, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष मिलिंद इंगोले, तालुका काँग्रेस अध्यक्ष राजेंद्र तेलंगे, शहराध्यक्ष प्रदीप ठुणे, भरत पाल, श्रावणसिंग वडते, अशोक काचोळे, श्रीधर थुतुरकर, महादेव मळशाम, बाळासाहेब दरणे, सदानंद भोरे, अंकुश मुनेश्वर, सुधीर जवादे, वैकुंठ मांडेकर, मंगेश पिंपरे, शुभम चिडाम, प्रफुल्ल तायवाडे, गोविंद चहांकर, केशवराव पडोळे, विनोद माहुरे, राजू पुडके, मधुकर राजूरकर, स्वप्नील जयपूरकर, मनोज पेंदोर, अफसर अली, धवल घुंगरुड, कुंदन कांबळे, शंकर दातारकर, राजू मोहूर्ले, प्रशांत ठाकरे, व्यवस्थापक संजय जुमळे, कर्मचारी गणेश हिवरकर, अवधूत शेराम, रोशन शिरळकर, कुणाल शिरळकर आणि सत्कारीत शेतकरी उपस्थित होते. प्रास्ताविक मिलिंद इंगोले यांनी केले, सूत्रसंचालन राजेंद्र तेलंगे यांनी केले. आभार प्रदर्शन अंकुश मुनेश्वर यांनी मानले.

## थोडक्यात

### मूळ संविधानात धर्मनिरपेक्ष शब्द नव्हता - अविमुक्तेश्वरानंद



**नवी दिल्ली :** शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांनी देखील 'धर्मनिरपेक्ष' या शब्दाबद्दल एक मोठे विधान केले आहे. त्यांनी धर्मनिरपेक्ष हा शब्द मूळतः भारतीय संविधानात समाविष्ट नव्हता, परंतु नंतर जोडला गेला.'' असे म्हटले आहे. त्यांचे हे विधान राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे यांनी केलेल्या विधानाला समर्थन देणारे असल्याचे दिसत आहे.शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांनी, ''हा शब्द संविधानाच्या मूलभूत स्वरूपाशी जुळत नाही आणि म्हणूनच हा विषय वेळोवेळी चर्चेत येतो.'' धर्माची व्याख्या करताना शंकराचार्य यांनी,''धर्म म्हणजे बरोबर आणि चूक यात फरक करणे, बरोबर स्वीकारणे आणि चुकीचे सोडून देणे. परंतु 'धर्मनिरपेक्ष' असणे म्हणजे बरोबर किंवा चूक यांच्याशी काहीही संबंध नसणे, जे कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात शक्य नाही. '' असे म्हटले. म्हणूनच, त्यांचा असा विश्वास आहे की हा शब्द भारतीय विचारसरणीला अनुरूप नाही. अलीकडेच, आरएसएस (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे यांनी आणीबाणीच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त संविधानात केलेल्या बदलांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी, आणीबाणीच्या काळात संविधानाच्या प्रस्तावनेत 'समाजवाद' आणि 'धर्मनिरपेक्षता' सारखे शब्द जोडले गेले होते आणि आता ते काढून टाकण्याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे.'' असे म्हटले होते. त्यांच्या विधानामुळे वाद निर्माण झाला होता, परंतु आता केंद्र सरकारच्या दोन वरिष्ठ मंत्र्यांनीही त्यांच्या विचारांना पाठिंबा दिला आहे. केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते शिवराज सिंह चौहान यांनी दत्तात्रय होसाबळे यांच्या विधानाला पाठिंबा देत या मुद्द्यावर विचार करण्याची गरज आहे.'' असे म्हटले होते.

### बिहारमध्ये 'आप' स्वबळावरच- केजरीवाल



**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी बिहार विधानसभा निवडणुकीविषयी आज मोठी घोषणा केली आहे, अरविंद केजरीवाल यांनी त्यांचा पक्ष बिहार विधानसभा निवडणुका स्वबळावर लढवणार असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी काँग्रेससोबत किंवा अन्य कोणासोबतही कोणत्याही प्रकारची युती केली जाणार नाही.'' असेही स्पष्ट केले आहे. येत्या काही महिन्यांत बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. अरविंद केजरीवाल यांच्या निवडणूक रिंगणात उतरल्याने विरोधकांना ही निवडणूक जड जाणार का असा सवाल निर्माण झाला आहे.अरविंद केजरीवाल यांनी अशीही घोषणा केली की आम आदमी पक्ष पंजाब आणि गुजरातमध्येही निवडणुका लढवेल आणि सरकार स्थापन करेल. अलिकडेच गुजरातमधील विसावदर जागा आणि पंजाबमधील लुधियाना पश्चिम जागेवरील पोटनिवडणुकांमध्ये आपने विजय मिळवला. अलीकडेच हैदराबादचे खासदार आणि एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत,'' त्यांचा पक्ष महाआघाडीसोबत बिहारमध्येही निवडणूक लढण्यास तयार आहे.'' असे म्हटले होते, तसेच ओवेसी यांनी,''एआयएमआयएमने या संदर्भात महाआघाडीच्या नेत्यांशी संपर्क साधला असल्याचीही माहिती दिली होती.

### जुने वाहन, इंधन मिळणार नाही

**नवी दिल्ली :** राजधानी नवी दिल्लीमध्ये १५ वर्षांहून जुन्या डिझेल वाहनांना आणि १० वर्षांहून जुन्या पेट्रोल वाहनांना पेट्रोल पंपांवर इंधन मिळणे आजपासून बंद झाले आहे. तसेच पोलिसांनी अशा वाहनांची जप्ती सुरू केली असून हवेतील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाने दिल्लीतील सर्व पेट्रोल पंपांवर विशेष पथके तैनात केली आहेत. दहा वर्षे आणि पंधरा वर्षांची वयोमर्यादा पार करणाऱ्या पेट्रोल, डिझेल वाहनांसाठी राजधानी दिल्लीत इंधन बंदी लागू करण्यासाठी राजधानीतील अनेक पेट्रोल पंपांवर एआय कॅमेरे आणि वाहतूक पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे. या इंधनबंदीच्या अंमलबजावणीसाठी दिल्लीच्या एक ते १०० क्रमांकाच्या पेट्रोल पंपांवर पोलिसांची तर १०१ ते १५९ क्रमांकाच्या पेट्रोल पंपांवर परिवहन विभागाच्या ५९ पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.एकूण ३५० चिन्हित पेट्रोल पंपांवर एक वाहतूक पोलीस अधिकारी नेमला जाणार असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रत्येक पंपावर २ अतिरिक्त पोलिस कर्मचारी तैनात केले जातील.

# सरकारी व्यवस्था शेतकऱ्यांना मारत आहे- राहुल गांधी

## कर्जमाफीसह शेतकऱ्यांच्या एमएसपीच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप

**नवी दिल्ली, दि.३ वृत्तसंस्था**

शेतकरी दिवसेंदिवस कर्जाच्या खाईत बुडत असून, सरकार त्यांच्या दुरवस्थेबाबत पूर्णपणे उदासीन आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफी आणि पिकांना किमान आधारभूत किंमत (एमएसपी) देण्याच्या कायदेशीर हमीच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहे, अशा शब्दांमध्ये लोकसभा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी आज (दि. ३ जुलै) महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारवर हल्लाबोल केला.

राहुल गांधी यांनी अधिकृत एक्स पोस्टमध्ये लिहिले की, ''महाराष्ट्रामध्ये तीन महिन्यांत ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, पण सरकार यावर शांत आहे. हा केवळ एक आकडा आहे का? ही ७६७ कुटुंबं आता कधीही सावरू शकणार नाहीत.'' एका दैनिकाच्या रिपोर्टचा अहवालाचा संदर्भ देत त्यांनी लिहिले की, ''शेतकरी दररोज कर्जाच्या ओझ्याखाली दबला जात आहे. बियाणे महाग, खते महाग, डिझेल महाग, पण एमएसपीची कोणतीही हमी नाही. जेव्हा ते कर्जमाफीची मागणी करतात, तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. पण ज्यांच्याकडे कोट्यवधी रुपये आहेत, त्यांची कर्जे मोदी सरकार सहज माफ करते.'' ''मोदीजी म्हणाले होते, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू, पण आज परिस्थिती अशी आहे की अन्नदात्याचे आयुष्यच संपत चालले आहे. ही व्यवस्था शेतकऱ्यांचा जीव घेत आहे आणि मोदीजी आपल्याच प्रसिद्धीचा (पीआर) तमाशा पाहत आहेत.'', अशी बोचरी टीकाही राहुल गांधी यांनी केला आहे.दरम्यान, भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी राहुल गांधींवर पलटवार केला आहे. त्यांनी एक्स वर एक तक्ता (चार्ट) शेअर करत दावा केला की, राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस सरकारच्या १५ वर्षांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात ५५,९२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. मृतांची आकडेवारी मोजण्याचे राजकारण घृणास्पद आहे, परंतु राहुल गांधींसारख्या लोकांना आरसा दाखवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. काहीही बोलण्यापूर्वी राहुल गांधींनी महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस सरकारच्या कार्यकाळात



झालेल्या पापांची आठवण करायला हवी.''बुधवार, २ जुलै रोजी महाराष्ट्र विधिमंडळातून विरोधी पक्षांच्या सदस्यांनी शेतकरी आत्महत्या आणि राज्यातील सोयाबीन उत्पादकांची थकबाकी न मिळाल्याच्या मुद्द्यांवरून महाराष्ट्र विधानसभेतून दोनदा सभात्याग केला होता.

## दहशतवादी हल्ले झाले तर योग्य प्रत्युत्तर देणार- जयशंकर

**नवी दिल्ली , दि.३ वृत्तसंस्था**

जम्मू-कश्मीरच्या पहलगाममध्ये नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पुन्हा एकदा आपली कठोर आणि स्पष्ट भूमिका आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडली आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर सध्या अमेरिकेच्या चार दिवसीय दौऱ्यावर असून, त्याच दरम्यान क्वाड परिषदेच्या निमित्ताने त्यांनी पाकिस्तानला कडक शब्दांत इशारा दिला आहे.

क्वाड परिषदेची बैठक अमेरिकेतील वॉशिंग्टन डीसी येथे झाली. अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया आणि भारत या चार देशांचा हा मंच जागतिक राजकारणात आणि सुरक्षा विषयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. याच मंचावर बोलताना जयशंकर यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला आणि भविष्यात भारतावर असे हल्ले झाल्यास त्याला कठोर प्रत्युत्तर दिलं जाईल, असे स्पष्ट केलं.''भारत शांत बसणारा देश नाही. जर पुन्हा अशा प्रकारचे हल्ले झाले, तर केवळ हल्लेखोरच नव्हे, तर त्यांना पाठीशी घालणाऱ्यांनाही आम्ही लक्ष्य करू,'' असे ठाम विधान जयशंकर यांनी केलं. त्यांनी सांगितले की, भारताचा हा संदेश पाकिस्तानपर्यंत पोहोचवण्यात आला आहे आणि देशाची सुरक्षा ही सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे.



श्रीनगर : अमरनाथ यात्रेला जाणाऱ्या भाविकांच्या यंदाच्या पहिल्या तुकडीच्या वाहनांना जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी बुधवारी सकाळी हिरवा झेंडा दाखविला. भगवती नगर तळावरून निघालेल्या या भाविकांच्या तुकडीने केलेल्या हर हर महादेव आणि बम बम भोलेच्या गजरात येथील आसमंत दुमदुमून गेला होता. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर यात्रेकरूंच्या सुरक्षाव्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून विधानसभेत रणकंदन; विरोधकांनी सरकारला धरले धारेवर!

## तत्काळ चर्चेची मागणी फेटाळली

**मुंबई, दि.३ वृत्तसंस्था**



विधीमंडळ विशेष

शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून विरोधकांनी सलग दुसऱ्या दिवशी विधानसभेत सरकारला धारेवर धरले. तीन महिन्यांत राज्यात ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. बैल नाही म्हणून शेतकऱ्याला स्वत:ला जोताला जुंपून घ्यायची वेळ आली आहे. कर्जमाफी देऊ म्हणून सत्तेत आलेले सरकार आता हे आश्वासन विसरले, असा हल्लाबोल काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

''दहशतवादी हल्ला झाला, तर आम्ही जशास तसे उत्तर देणार''; जयशंकर यांनी अमेरिकेतून पाकिस्तानला फटकारलं

आम्ही स्थगनप्रस्ताव दिला आहे, तेव्हा आताच चर्चा करा, असा आग्रह विरोधकांनी धरला. त्यावर, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षांनी प्रस्ताव आणावा, मी चर्चेला पूर्ण दिवस द्यायला तयार आहे, असे सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही चर्चा करण्यास सरकार तयार असल्याचे स्पष्ट केले. मात्र, तत्काळ चर्चेची मागणी मान्य न झाल्याने विरोधकांनी सभात्याग केला.शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेऊन त्या सोडवणे, शेतकऱ्यांना मदत करणे, ही सरकारची जबाबदारी असून आमचे सरकार ती पार पाडेलच. मात्र, विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आडून राजकारण करू नये, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकारची भूमिका स्पष्ट मांडली.विजय वडेट्टीवार म्हणाले की, कृषिमंत्री शेतकऱ्यांना भिकारी म्हणतात, माजी मंत्री बबनराव लोणीकर शेतकऱ्यांबाबत आक्षेपार्ह विधान करतात. शेतमालाला हमीभाव मिळत नाही. निवडणुकीआधी कर्जमाफी करू, अशी घोषणा केली होती. आता मात्र सरकार समितीला पुढे करत आहे. २५ वर्षे शेतकरी मला निवडून देत आहेत. शेतकऱ्यांसाठी मी मोर्चे काढले, आंदोलने केली. रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत मी शेतकऱ्यांच्या बाजूने आहे, मी शेतकऱ्यांच्या विरोधात बोललो नाही काही लोक राजकारण करत आहेत. माझ्या मृत्यूनंतरही माझी हाडेसुद्धा म्हणतील मी शेतकरी आहे.

# ३ कोटी २० लाख सरकारी निधी हडपण्याचा डाव उघड

## आमदार प्रसाद लाड यांचा खळबळजनक आरोप

**मुंबई , दि.३ वृत्तसंस्था**



भाजपाचेविधान परिषदेचे आमदार प्रसाद लाड यांनी विधान परिषदेत धक्कादायक माहिती दिली आहे. लाड यांचं बनावट लेटरहेड वापरून काहींनी ३.२० कोटी सरकारी निधी लंपास केल्याचा आरोप आहे. अधिवेशन संपल्यानंतर ४.३० वाजता मला रत्नागिरी येथून अधिकाऱ्यांचा फोन आला. आपण मागणी केल्याप्रमाणे ३ कोटी २० लाख निधी बीड जिल्ह्याला वर्ग केला आहे. त्याबाबत तुमचा फोनही आला होता असं सांगण्यात आले. त्यानंतर मला संशय आला आणि ती पत्राची प्रत मागवली. त्यातले लेटरहेड बनावट होते. सही खोटी होती. मी फोनही केला नव्हता असा गंभीर आरोप आमदार प्रसाद लाड यांनी केला.

प्रसाद लाड म्हणाले की, मी चौकशी केली असता हा निधी कुणीतरी चोरायचा प्रयत्न केला आहे हे लक्षात आले. त्यानंतर मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर ही बाब घातली. मुंबई पोलीस आयुक्तांशी बोललो. रात्री उशिरा याबाबत सायन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात ४ नावे माझ्याकडे आली तीदेखील पोलिसांना कळवली आहेत. याप्रकारे सरकारी निधी हडपण्याचा प्रकार समोर आला.

हा निधी मोठा होता म्हणून लक्षात आले. परंतु छोटे छोटे निधी हडप करण्याचे प्रकार याआधीही झालेत असं त्यांनी सांगितले.तसेच आमदार उमा खापरे, श्रीकांत भारतीय यांच्याबाबत हे झाले होते. स्वत: राम शिंदे सभापती होण्यापूर्वी त्यांच्यासोबतही हे घडले होते. अशा टोळ्या राज्यात कार्यरत आहेत. बीड जिल्ह्याचे नाव आल्यावर मी सतर्क झालो. आधीच बीडचा बोलबाला झाला आहे. बीडमधले हे महाठग कोण आहेत त्याची पोलीस चौकशी करत आहेत. माझ्याकडे अज्ञात नंबर आलेत ते पोलिसांना दिलेत.

# कृषी विमा योजनेतील भ्रष्टाचाऱ्यांवर कधी कारवाई?

## अधिवेशनात सतेज पाटील यांचा सवाल

**कोल्हापूर, दि.३ वृत्तसंस्था**

महिन्याच्या आत कारवाईचे कृषीमंत्र्यांचे आश्वासन राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या एक रुपयात विमा या योजनेमध्ये कोट्यवधींचा भ्रष्टाचार उघडकीस आला आहे. यामध्ये गुंतलेल्यांवर कारवाई होणार का, असा प्रश्न काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी मंगळवारी अधिवेशनात उपस्थित केला. यावर कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दोषींवर एक महिन्याच्या आत कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

सतेज पाटील म्हणाले, नवीन पीक योजनेच्या माध्यमातून सरकार ५ वर्षात २५ हजार कोटी रुपये




शेतकऱ्यांना देणार असल्याचा दावा करत आहे. मात्र, यासाठी काही टाइमलाइन आहे? ते पैसे किती दिवसात आपण शेतकऱ्यांना देणार आहात? यावर कृषिमंत्री कोकाटे यांनी या नवीन पीक योजनेमुळे सरकारचे साडेपाच हजार कोटी रुपये वाचले आहेत. तेच पैसे शेतकऱ्याच्या भांडवली गुंतवणुकीला वापरणार असल्याचा खुलासा केला. पंचनामा झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत त्याचा मोबदला मिळेल, असेही त्यांनी सांगितले. विमा कंपन्यांच्या बाबतीत जर कोणी तक्रार केली आणि त्यात विमा कंपनी दोषी सापडली तर त्यांच्यावर महिन्याच्या आत कारवाई करण्यात येईल, असा शब्दही त्यांनी दिला.

# अनिल परब लिंबू-मिरची घेऊन विधान परिषदेत, बहिणीवर अघोरी प्रयोग केल्याचा दावा

**मुंबई , दि.३ वृत्तसंस्था**

रायगड पालकमंत्रीपदाचा वाद सर्वश्रुत आहे. शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले हे रायगडच्या पालकमंत्री पदासाठी आग्रही आहेत. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्री आदिती तटकरे या देखील इच्छुक आहेत. त्यामुळे रायगडच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. या दरम्यान काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर भरत गोगावले यांचे काही फोटो व्हायरल झाले होते. यावरुन भरत गोगावले यांच्यावर अघोरी प्रयोग केल्याचा आरोप करण्यात आला होता. गोगावले यांनी या आरोपांचे खंडन केलं होतं. पण या घडामोडींचा पडसाद विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पडलेले बघायला मिळाले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब हे आज चक्क लिंबू-मिरची घेऊन सभागृहात पोहोचले. आदिती तटकरे या माझ्या बहीण आहेत. त्यांच्या सुरक्षेसाठी मी हे लिंबू-मिरची आणले आहेत. त्यांच्यापर्यंत हे लिंबू-मिरची पोहोचवावेत, अशी विनंती



त्यांनी सभागृहात केली. यावेळी सभागृहात चांगलाच हास्यकल्लोळ बघायला मिळाला.या बिलाच्या माध्यमातून व्यापक बदल सूचवले आहेत. निवडून येणाऱ्या माणसाचे अधिकार काय, त्याला किती संरक्षण मिळायला पाहिजे, कारण तो जनतेतून येतो. निवडून येणाऱ्या व्यक्तीला एक वर्ष तरी संरक्षण मिळालं पाहिजे. कारण सहा महिन्यात त्याला लगेच सिम्पल मेजॉरिटी म्हणून काढून टाकलं जातं. अशा असुरक्षिता भावनेने तो नगराध्यक्ष कसा काम करु शकतो? त्यामुळे सरकार सुरक्षा पुरवण्याचं जे काम करत आहे, हे खरंच प्रशंसनीय आहे. आपण गेल्या महिन्यांमध्ये वेगवेगळे कायदे करुन वेगवेगळ्या पद्धतीने सुरक्षा दिली. आपण लाडक्या बहिणींना १५०० रुपये देऊन मजबूत स्थान दिलं, शेतकऱ्यांना न्याय दिला, पण आज माझा विषय आहे, तुम्ही एवढ्या लाडक्या बहिणींचा मान सन्मान करताय, एवढा मानसन्मान करताना माझं देखील एक कर्तव्य आहे की, महाराष्ट्राच्या प्रत्येक बहिणीची सुरक्षा राहण्यासाठी माझं योगदान काय? हा प्रश्न माझ्यासमोर आहे'', असं अनिल परब म्हणाले.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे. आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## उशिरा सुचलेले शहाणपण

राज्यात गेले काही दिवस हिंदी सक्तीच्या विषयावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. मुख्य म्हणजे हा केवळ राजकीय विषय नव्हता तर मराठी भाषेच्या अस्तित्वाचा आणि एकूणच मराठी मनाच्या स्वाभिमानाचा विषय होता. त्यावरून विरोधी पक्षांमध्ये एकजूट होत असल्याचे दिसताच आणि त्यातही उद्धव आणि राज ठाकरे बंधू एकत्र आल्याचे आणि ते एकत्रितपणे मोर्चा काढणार असल्याचे लक्षात येताच सरकारने ही माघार घेतली आहे. ही माघार म्हणजे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. सरकारने हिंदी भाषा सक्तीच्या संबंधात १६ एप्रिल आणि १७ जून असे दोन शासकीय निर्णय काढले होते, हे दोन्ही निर्णय रद्द करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला करुन टाकली. हा निर्णय घेण्यामध्ये त्यांचा काही मास्टर स्ट्रोक वगैरे असल्याच्या बाता पण मारल्या जात असल्या, तरी ही सरळ सरळ माघार आहे ही बाब तितकीच खरी आहे. परंतु ही माघार घेत असतानाही राज्य सरकारने आणखीन एक घोळ त्यामध्ये घालून ठेवला असून या विषयावर निर्णय घेण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या समितीचा निर्णय आल्यानंतर त्रिभाषा सूत्र संबंधात पुढील अंतिम निर्णय घेतला जाणार आहे, म्हणजे थोडक्यात, माघार घेत असतानाही सरकारने ही मखलाशी करून हा विषय जिवंत ठेवला आहे त्याचा निषेधच केला पाहिजे. राज्यात पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषेची सक्ती करण्याचा उद्योग सरकारने कशासाठी केला होता हे नीट लक्षात घेण्याची गरज आहे. हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा भाग असल्याचे सरकार भासवीत असले तरी त्रिभाषा सूत्र आपल्या राज्यात राबविताना त्या संदर्भातील धोरण ठरविण्याचा स्वतंत्र अधिकार राज्य सरकारला असतो. दक्षिणेकडील राज्यांनी त्यानुसार निर्णय घेत त्यांच्या राज्यातून हिंदी हद्दपार केली, पण महाराष्ट्रात मात्र फडणवीस यांचे सरकार विरोध डावलून हिंदी सक्तीवर ठाम होते. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधू सह सर्वच विरोधी पक्षनेते या विरोधात एकवटल्याचे चित्र निर्माण झाले होते. या अनुषंगाने मुंबईत एक सर्वपक्षीय मोठा मोर्चा काढला जाणार होता, त्यातून आपल्यापुढे मोठे राजकीय आव्हान उभे राहिल्याची धास्ती सरकारला झाली आणि त्यांनी हे दोन्ही जीआर रद्द करण्याचा निर्णय घेतला. आता या मुद्द्यावरून पुन्हा वेगळी समिती स्थापन करण्याचा जो घाट घातला आहे त्यालाही विरोधी पक्षांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. वेगळी समिती नेमण्याचा घोळ सरकारने घालू नये, कुठल्याही मार्गाने आम्ही हे त्रिभाषा सूत्र स्वीकारणार नाही, असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे. उद्धव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनीही मराठी एकजुटीने सरकारची नांगी ठेचली गेली आहे असे नमूद करताना सरकारने पुन्हा याबाबतीत आडमार्गाने फणा काढू नये, असा स्पष्ट इशारा दिला आहे. विरोधी ऐक्यातून मराठीच्या संबंधात जो मोर्चा काढला जाणार होता त्याला मुंबई महापालिकेची निवडणूक ही पार्श्वभूमी आहे असे सांगितले गेले असले, तरी मराठी भाषिकांवर हिंदीची सक्ती ही बाब मराठी मनावर ओरखडा उठवणारीच होती. त्यामुळे हा केवळ मुंबई महापालिकेच्या किंवा अन्य कुठल्याही महापालिकेच्या निवडणुकांच्या संदर्भातला मुद्दा नव्हता. पण सरकारने मात्र मुंबई महापालिकेची निवडणूक लक्षात घेऊन हे दोन्ही जीआर रद्द केले आहेत. मुळात असा निर्णय घेण्याच्या मागे नेमके काय कारण होते हे मात्र अजून पुढे आलेले नाही. पुण्यात एका कार्यक्रमात बोलताना ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे की, या निर्णयामागे 'एक भाषा, एक देश' असे सूत्र राबविण्याचा सरकारचा इरादा होता. त्यांनी या संदर्भात जर्मनीतील तत्कालीन हिटलरच्या राजवटीचेही उदाहरण दिले. महाराष्ट्रात मोदी सरकारला याच स्वरूपाचा निर्णय घ्यायचा होता त्यातून हा प्रकार घडल्याचे पृथ्वीराज चव्हाण यांचे म्हणणे होते. शैक्षणिक धोरणानुसार आधीच्याच उद्धव ठाकरे सरकारने राज्यात हे त्रिसूत्रीचे धोरण मान्य केले, असा दावा फडणवीस सरकार करत असले तरी, एक मुद्दा या ठिकाणी लक्षात घेणे गरजेचे आहे की, अशा भाषा सक्तीचा कोणताही जीआर उद्धव ठाकरे सरकारने काढलेला नव्हता. त्यामुळे त्यांच्या काळात या निर्णयाच्या अंमलबजावणीचा प्रयत्न झाला होता किंवा उद्धव ठाकरे सरकारचा तसा इरादा होता असे कोठेही ध्वनीत होत नाही. त्यामुळे केवळ शाब्दिक मखलाशी करीत फडणवीस सरकारने उद्धव ठाकरे आणि विरोधकांवर ही बाजी उलटविण्याचा प्रयत्न केला असला, तरी ती त्यांच्याच अंगलट आली आहे हे लपून राहिलेले नाही. महाराष्ट्र ही वेगळी भूमी आहे, स्वतःच्या भाषेचा अभिमान बाळगणारी ही भूमी आहे. केवळ केंद्र सरकारच्या तालावर नाचताना महाराष्ट्रात अशी हिंदी भाषेची सक्ती यापुढे कधीही जर होणार असेल, तर संपूर्ण मराठी माणूस पुन्हा एकजुटीने ते सगळे प्रयत्न हाणून पाडील याविषयी शंका नाही. या एकजुटीचा पहिला तडाखा भाजप सरकारला बसला आहेच, पण आता केवळ आपल्या राजकीय प्रतिष्ठेसाठी पुन्हा हिंदी सक्तीसाठी हे सरकार आडमार्गाने काही प्रयत्न करू इच्छित असेल, तर त्यांनी ते धाडस करू नये असा धडाच या सरकारला मराठी एकजुटीतून मिळाला आहे, हे मात्र नक्की. त्यामधून राज्य सरकार काय बोध घेते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.



# नुसते पटोले नाही, तर शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्यांनाही आवरा!



## विचारमंथन

संजय एम. देशमुख
9881304546





स्वत:ला माणूस म्हणवून घेणाऱ्या माणसामध्ये सामाजिक कर्तव्याची जाणीव देणारं माणूसपण असलं पाहिजे. फक्त स्वार्थ आणि राजकीय उन्मादाचं अवसान आणून आपल्याच भावंडांच्या छातीवर नाचणारी राजकारणात उगवणारी माणसं म्हणजे माणुसपण हरविलेल्या अपप्रवृत्ती म्हणाव्या लागतील.मानवता आणि येथील समाजधर्माशी प्रतारणा करणारे बिघडलेले कृतघ्न नेते त्यांना म्हणावं लागेलं .ज्या समाजात आपण जन्माला आलो,ज्यांच्या आशीर्वादाने आणि विश्वासमतांच्या आधारावर लोकप्रतिनिधी, मंत्री,संत्री झालोत, त्यांनाच खालच्या पातळीवरील शब्द वापरून हलकट वागणूक देणे म्हणजे राज्यातील मध्यमर्गियांची क्रूर चेष्टा आहे. देशातील अन्नदात्या श्रमिकांचा अपमान आहे. अशा प्रकारचे वाचाळवीर म्हणजे पक्षाच्या यशोदायी आलेखावरील काळे डागांची दखल पक्षाने घेतली पाहिजे.

शेतकऱ्यांना कर्जमाफी कशाला पाहिजे म्हणणाऱ्यांनी आपल्या त्या मायबापांचे उपकार विसरणे म्हणजे आपल्याच परिवाराशी केलेला भिषण द्रोह आहे. माणिकराव कोकाटे या अनाचारांच्या आरोपात अडकलेल्या मंत्र्यांनंतर तशीच दुसरी आवृत्तीही पुढे आली. शेतकऱ्यांच्याच घामाच्या पैशावर ऐशोराम करून सत्तेचं लोणी खाणाऱ्या बबनराव लोणीकरांनीही स्वत:ला उदार,दानशूर दाखवण्याचं कोरडं अवसान आणलं. उपकारांची उन्मादी भाषा वापरून आमच्या शेतकरी आणि त्या शेतकऱ्यांच्या मुलांना अपमानित केलं आहे.कोकाटे आणि लोणीकर शासनाकडून मानधन आणि ऐशोरामाच्या सोईसुविधा तर ओरबाडतातच. तसंच रक्ताचं पाणी करून मंत्री आणि नोकरशाहीला जगवण्याचे मानवतावादी कर्तव्य निभावणाऱ्या शेतकऱ्यांचे सुध्दा मदती घेण्याचे संविधानिक हक्क आहेत.ते त्यानेच जमा केलेल्या तिजोरीतील पैशातून त्याला दिले जातात. ते शासनाचं कर्तव्य आहे आणि ते कृतघ्नपणा न दाखवता पार पाडलं गेलं पाहिजे. तो सारा पैसा शासकीय तिजोरीतून जातो. तो शेतकऱ्यांच्या मतांवरच मंत्री झालेल्या माणिकराव कोकाटेंच्या आणि लोणीकरांच्या वाडवडीलांच्या मालमत्तेतून जात नाही. म्हणून आपण कुठे आहोत,आपली पात्रता किती आणि आपण बोलतो किती याचा विचार बुध्दीहिनांसारखं बडबडण्यापेक्षा आपल्या बुध्दीला ताण देऊन केला पाहिजे. त्यालाच समाजशास्त्राच्या परीक्षेत पास होणारा परीपक्व माणूस म्हणता येईल.मध्यमवर्गिय आणि श्रमिकांच्या त्यागाच्या जाणीवेने आपण सामाजिक बांधिलकी म्हणून काय काय केलंय हा विचार केला पाहिजे. लोकप्रतिनिधी म्हणून आपलं कर्तव्य काय? आपण राजभवनात शपथा कशासाठी घेतल्यात? मानसिक संतुलन ढासळल्यारखी फुकटची बडबड करणाऱ्या महाराष्ट्रातील या दोन्ही मंत्र्यांनी हे लक्षात ठेवलं. पाहिजे.शेतकरी ,श्रमिक,आणि युवावर्गाच्या त्यागाने,केलेल्या विश्वासदर्शक मदतींमुळे आपल्यासारखे अनेक नेते मोठे झालेले. त्यांनीच आपल्यावर उपकार केलेत म्हणूनच आपण मंत्री झालोत. माणुसकीचा लवलेश नसलेले आपणासारखे अनेक अपात्र पुढारी नुसत्या खोट्या चमत्कारांच्या गारुडांनी मोठे झाले नसते.मतदारांवर आपण उपकार केलेले नाहीत तर त्यांच्या वेदनांवर मीठ चोळण्याची कामं फक्त आपण करीत आहात. ही पापं आपण कुठे फेडणार?

शेतकऱ्यांना अभद्र बोलून त्यांना, त्यांच्या तरूण मुलांना अपमानित करणाऱ्या संबंधित मंत्र्यांच्या या अशोभनिय कृत्यांबध्दल परवा विरोधी पक्षनेते माणिकराव पटोले आक्रमक झाले.सत्ताधाऱ्यांकडून अशा वाचाळवीरांना पाठीशी घालण्याच्या चुकीच्या गोष्टीविरूध्द बोलणे,कारवायांच्या मागण्या करणे हे विरोधी पक्षाचे आणि मतदारांचेही संविधानिक हक्क आहेत. त्यानुसार कर्तव्यभावना आणि संवेदनशीलता ठेऊन शासनाने हे विषय प्राधान्याने आणि गांभिर्यपूर्वक हाताळले असते तर असे घडलेच नसते.आमदार नानाभाऊ पटोलेंचे विधीमंडळ अध्यक्षांच्या आसनापर्यंत धावत जाणे ही कृती समर्थनिय नाही.परंतू शेतकऱ्यांच्या विरोधातल्या या प्रकरणांवर सरकारने मुग गिळून गप्प बसणे म्हणजे अशा अहंकारी लोकांना आणखी बोलण्यासाठी मोकाट सोडणे आहे. ही बाब शांत बसण्यासारखी आणि सहन करण्यासारखी पण नाही, तर चिड आणणारी आहे.अगोदरच भाजपने पोसलेले अनेक माजोरी वाचाळवीर ही महाराष्ट्रातील जनतेची डोकेदुखी आहे. त्यात आणखी शेतकऱ्यांचा अपमान ही गोष्ट खपवून घेण्यासारखी नाही.त्यामुळे नुसते नानाभाऊ पटोले नाही तर सारा महाराष्ट्र खवळलेला आहे.याचा फटका बसू नये असं वाटत असेल तर फडणवीससाहेब!आपण पुढे यावं, आणि महाराष्ट्रातील शेतकरी,श्रमिकांना न्याय द्यावा.त्यांच्या स्वाभिमानावर आक्रमण करणाऱ्या या बिघडलेल्या मंत्र्यांना आवरावे... कारवाई करावी. अन्यथा महाराष्ट्रासमोर जाहिर माफी मागायला सांगावी. उन्मत्त झालेल्या अपराधी मंत्र्यांवर कोणतीही कारवाई न करता सरकारने आणि पक्षाने त्यांना संरक्षण देणे. ही दिल्या घेतल्या शपथांशी प्रतारणा आहे. शेतकऱ्यांशी केलेली शुध्द अप्रामाणिकपणा आहे.

कोणीही यावं आणि शेतकरी,श्रमिकांना अभद्र बोलून अपमानित करून जावं.हा जनतेच्या स्वाभिमानावरील आघात,इज्जतीचा होणारा हा असा जाहिर लिलाव महाराष्ट्रातील मतदार आता खपवून घेणार नाहीत.त्यासाठीच नानाभाऊ पटोले आक्रमक झाले. तसेच आक्रमक भाजप नेते पण पूर्वी होत होते.गळे फाडून ओरडत होते.आपण पण हे कशासाठी करत होतो तो विरोधी पक्षाचा आपला काळ सरकारात बसलेल्या नेत्यांनी आता आठवावा. पटोलेंनी सभागृहाचा उपमर्द केला असेल, सभाध्यक्षांचा अवमान झाला असेल तर ते समर्थनिय नाही.परंतू दडपगीरीची नीति वापरून जेवढ्या तडकाफडकी विरोधकांवर कारवाया होतात त्याच तत्परतेने आपल्या पक्षातील वाचाळविरांवर पण आपल्या शिस्तीचा बडगा उगारला पाहिजे. म्हणून नुसते आमदार पटोले नाही तर अपराधी उन्मत्त मंत्री कोकाटे आणि लोणीकरांवर सुध्दा अविलंब कारवाई झालीच पाहिजे...!

# वडाळा गावचे तीर्थक्षेत्र श्रीप्रति पंढरपूर



## आध्यात्म

दिनेश ज. हुमणे
मो. ९८३३५५७०४४

आषाढी एकादशी म्हणजे पंढरीचा मानाचा दिवस. आपल्या या विठुरायाचे दर्शन घेण्याच्या लगबगीने सारे वारकरी वारी करीत पंढरीची पायी वाटचाल करीत असतात. टाळ मृदुंग, ग्यानबा- तुकाराम, जय हरी विठ्ठल जय जय विठ्ठल या जयघोषात या विठुरायाचे नामस्मरण करीत वारकरी विठ्ठलाच्या नामस्मरणात लीन होताना दिसतात.

प्रत्येक विठ्ठलभक्ताला आपल्या देवाचे दर्शन व्हावे असे वाटत असते. परंतु प्रत्येकालाच वारीला जाण्याची संधी मिळेलच असे नाही. असंच मुंबईकरांच्या बाबतीत काही दिसून येते. मुंबई मधील भक्तांना या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जाणे शक्य होत नाही. अशावेळी हे भक्त मुंबईतील वसलेल्या वडाळा गावांत '' प्रतिपंढरपूर '' या मंदिरात वारी काढतात. मुंबईतील पंढरीत टाळ मृदुंगाचा नाद, वैष्णवांचा मेळा, भगवा पताका, विद्युत रोषणाई हे सारे दृश्य पाहायला मिळते. अशाच मुंबईतील प्रसिद्ध प्रतिपंढरपूर '' म्हणजेच वडाळा गांवातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर. मंदिराचा विस्तार वाढवण्यात आला असून मंदिराचा कळस हा भागवतभक्त सोनोपंत दांडेकर यांनी बसवला होता असे सांगितले जाते. मुंबईतील ज्यांना पंढरपूर येथे जाणे शक्य होत नाही, त्यांच्यासाठी हे मंदिर एक प्रतिपंढरपूर म्हणून उभे आहे. मंदिरात आषाढी एकादशीला लाखो भाविकांची




गर्दी दिसून येते. मुंबईतील कुलाबा आणि अनेक ठिकाणाहून येथे वारक-यांच्या दिंड्या येतात. जत्रेचा उत्साह ही असतो. असे हे मंदिर पूर्वाभिमुख असून संपूर्ण संगमरवरी आहे. मंदिरात प्रथम प्रवेश करताना आपल्या नजरेस पडते ती काळ्या पाषाणातील गरुड देवाची मूर्ती, बाजूला शनी देवाचे मंदिर, आत गेल्यावर श्री. मारुतीरायाची मूर्ती, पुढे गेल्यानंतर मुख्य गाभा-यात दर्शन घडते सुंदर काळ्या पाषाणातील विविध आभूषणे आणि अलंकाराने नटलेली विठ्ठल-रखुमाईची मूर्ती. या मंदिरच्या उजव्या बाजूला महादेवाचे मंदिर असून डाव्या बाजूला श्रीदत्त, देवीचे गणपतीचे मंदिर आहे, मंदिरात पहाटे काकड आरती, दुपारी १ आणि सायंकाळी ७ वाजता आरती तर रात्री ९.३० वाजता शेजारती होत असून दररोज सायंकाळी ५ ते ७ वाजता आणि रविवारी ४ ते ७ हरिपाठ प्रवचन असा हा मंदिराचा कार्यक्रम असतो. दशमीपासून भजन सुरु होऊन ते आषाढी एकादशीच्या रात्री पर्यंत भजन सुरु असते. आषाढीला लाखो वैष्णवांचा मेळा भरतो संपूर्ण मंदिर हरिनामाच्या जपाने दुमदुमून जातो. मंदिरातील विठ्ठल रखुमाईच्या मूर्तीची पूजा आषाढी एकादशीला राजकीय पुढारी व्यक्तींच्या हस्ते केली जाते.

मुंबईतील प्रसिद्ध मंदिरांपैकी हे एक विठ्ठल रुक्मिणी मंदिर. मंदिर पुरातन असून जवळ जवळ ४०० वर्षे जुने आहे. या मंदिराच्या स्थापनेविषयाची गोष्ट ऐकण्यासारखी आहे. पूर्वी मुंबई हि सात बेटांची होती. त्यातील वडाळा हे एक बेट किंवा गांव. वडाळा गांव हे प्रसिद्ध होते, ते येथील मिठागरांसाठी. अशा या मिठागरात लमाणी, शेतकरी, कोळी, आगरी अशी अनेक लोक राहत होते. मिठाचा व्यापार करणे या त्यांचा व्यवसाय. व्यापार करणारे व्यापारी हे विठ्ठलाचे आणि तुकाराम महाराजांचे भक्त असून ते नित्यनियमाने वारीला पंढरपूरला जात असे. एक दिवशी काम करताना या मिठागरात काम करणा-या विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ती सापडल्या. सदर घटना व्यापा-यांनी पंढरपुरास जाऊन तुकाराम महाराजांना सांगितली असे म्हणणे आहे, त्यांनी सांगितले या मुर्त्या ज्या ठिकाणी सापडल्या त्या ठिकाणी विठ्ठल-रखुमाईचे मंदिर स्थापन करा. व्यापा-यांनी त्या परिसरात एक तळ होतं तेथे मंदिर उभारले. मंदिराचा विकास होत गेला तस तसे या मंदिराचा पाय रचत गेला. आणि आज या मंदिरात गेल्यावर समाधान मिळाल्याशिवाय बाहेर येऊच शकत नाही. ही खरी मंदिराची ख्याती आहे. म्हणून हे विठ्ठल रुक्मिणी मंदिर ''प्रतिपंढरपूर '' तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते.

# पालकांनी नेमकं काय करावं, काय टाळावं?



## शैक्षणिक

प्रा. वैभव कनोजे
अकोला



मुलं घडवताना पालकांनी स्वतःची भूमिका स्पष्ट ठेवली, तर मुलांचं जीवनही स्पष्ट मार्गावर चालेल. पालकांनी काय करावं? स्वतःच्या आयुष्याचा अभिमान ठेवा. तुम्ही संघर्षातून, प्रामाणिकपणे, कष्टाने जे काही कमावलंय त्यातूनच मुलं प्रेरणा घेतात. मुलांची नैसर्गिक क्षमता आणि कल ओळखा. त्यांच्यावर तुमचं स्वप्न लादू नका, तर त्यांच्या स्वप्नाला आधार द्या. स्वतःच्या कृतीतून शिकवा. वेळेचं पालन, सचोटी, आदर हे वागताना दाखवा. बोलून नाही तर 'करून' शिकवा. दुसऱ्याचं कौतुक प्रेरणा म्हणून सांगा. ''सचिन खूप मेहनती होता'', असं सांगून तुम्ही मेहनतीचं महत्त्व समजावताय, पण ''तू सचिनसारखा हो'' असं नको म्हणू. स्वतः सतत सुधारत रहा. ''माझं मूल माझ्यासारखं व्हावं'' असं म्हणायचं असेल, तर स्वतःमध्येही रोज थोडं थोडं चांगलं घडवा. मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद ठेवा. ते काय विचार करतात, काय वाटतं त्यांना, हे जाणून घ्या. त्यांचं बालपण ऐकून घ्या आदेश देऊन नाही.

पालकांनी काय टाळावं? तुलना करणे टाळा. ''तुझ्या मित्रासारखा हो'', ''शेजारच्या मुलीसारखं वाग'' या वाक्यांमुळे मुलं गोंधळतात आणि आत्मविश्वास गमावतात. स्वतःच्या अपयशाची ओझी मुलांवर टाकू नका. ''माझं स्वप्न पूर्ण नाही झालं, तू तरी कर'', अशा जबरदस्तीने मूल हरवतं. त्यांच्या चुका ओरडून नको, समजावून घ्या. चुकांना शिक्षा न करता संवादातून सुधारण्याची संधी द्या. टीव्ही, मोबाईल यांचे अंधानुकरण मुलांसमोर करू नका. आपण जे पाहतो, तेच मुलं शिकतात. स्क्रीनटाइमवर नियंत्रण ठेवा. दुसऱ्याच्या यशाला केवळ 'ग्लॅमर' म्हणून सांगू नका. यशामागची प्रक्रिया अपयश, शिस्त, त्याग हे दाखवा. केवळ यश नव्हे, प्रयत्न देखील महत्त्वाचे आहेत.

**शेवटी एक साधा नियम :** ''तुम्ही जसे आहात, तसे प्रामाणिकपणे राहा मुलं तुमचं अनुकरण करत असतात, अनुकरण नव्हे तर आदर्श घडवा.''

# कर्तृत्वाचा वसा : प्रा. अजय चिंचोळकर यांचा प्रेरणादायी प्रवास



## व्यक्तीवेध

देविदास चव्हाण
मो. 9028618156



सेवानिवृत्ती ही प्रत्येक कर्मचाऱ्याच्या आयुष्यातील एक अटळ पण अत्यंत महत्त्वाची घटना असते. हा केवळ एका अध्यायाचा शेवट नसून, अनुभवांची शिदोरी घेऊन आयुष्याच्या पुढच्या प्रवासाला निघण्याची एक नवी सुरुवात असते. मागे वळून पाहताना आपण काय कमावले, याचा धांडोळा घेण्याची ही एक संधी असते. अशाच एका कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक आणि विद्यार्थिप्रिय व्यक्तिमत्त्वाचा, प्रा. अजय चिंचोळकर यांच्या गौरवशाली प्रवासाचा आढावा घेणे प्रेरणादायी ठरते. ३० जून २०२५ रोजी ते अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथून तीन दशकांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. त्यांनी शैक्षणिक, सामाजिक आणि स्वयंसेवा क्षेत्रांत केलेले कार्य अनेकांसाठी दीपस्तंभासारखे आहे.

प्रा. अजय चिंचोळकर यांनी १९९४-९५ मध्ये याच महाविद्यालयातून राज्यशास्त्र विषयात एम.ए. पदवी मिळवली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी केवळ नोकरी म्हणून नव्हे, तर एक सामाजिक बांधिलकी म्हणून अध्यापन क्षेत्राची निवड केली. महाविद्यालयात रुजू होताच, त्यांनी प्रत्येक जबाबदारी अत्यंत तत्परतेने स्वीकारली. तत्कालीन प्राचार्य, कै. शंकरराव सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी १९९५-९६ मध्ये मुक्त विद्यापीठ केंद्राची जबाबदारी घेतली. त्यावेळी केवळ ५० विद्यार्थी असलेल्या या केंद्राचे स्वरूप त्यांनी दोन वर्षांत पूर्णपणे बदलून टाकले. विद्यार्थ्यांशी थेट संवाद, मार्गदर्शक सत्रे आणि विश्वासाचे नाते निर्माण करून त्यांनी विद्यार्थी संख्या ५०० पर्यंत पोहोचवली. ही वाढ केवळ आकड्यांची नव्हती, तर ती त्यांच्या व्यवस्थापन कौशल्याची, दूरदृष्टीची आणि प्रेरणादायी नेतृत्वाची साक्ष होती. त्यांचा अध्यापनाचा खरा प्रवास सुरू झाला, तो राज्यशास्त्र विभागप्रमुख, कै. डॉ. राम जाधव यांच्या प्रोत्साहनाने. तासिका तत्त्वावर शिकवताना, विषयातील सखोल अभ्यास आणि विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याच्या त्यांच्या हातोटीमुळे ते लवकरच विद्यार्थ्यांचे आवडते शिक्षक बनले. १६ नोव्हेंबर १९९८ रोजी कनिष्ठ महाविद्यालयात नियमित शिक्षक म्हणून रुजू झाल्यावर त्यांनी विद्यार्थ्याला केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्याला विचार करायला शिकवणे, समाजाशी जोडणे आणि त्याच्यात कर्तव्यबुद्धी जागविणे हेच शिक्षणाचे खरे ध्येय मानले. मेजर महाजन यांच्या निवृत्तीनंतर त्यांच्यावर राष्ट्रीय छात्र सेनेची (एनसीसी) जबाबदारी आली. या क्षेत्राचा पूर्व-अनुभव नसतानाही, हे केवळ गणवेश घालून संचलन करण्याचे काम नाही, तर शिस्त, देशभक्ती आणि नेतृत्व घडवणारी प्रयोगशाळा आहे, हे त्यांनी ओळखले. तीन महिन्यांचे खडतर प्रशिक्षण पूर्ण करून त्यांनी एनसीसी युनिटच्या कामकाजात एक नवी ऊर्जा आणली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली युनिटच्या विद्यार्थ्यांनी केवळ बेसिक लीडरशिप कॅम्पमध्येच नव्हे, तर सलग चार वर्षे दिल्ली येथील प्रतिष्ठेच्या प्रजासत्ताक दिन संचलनामध्ये सहभाग घेतला. त्यांच्याच नेतृत्वात फुटबॉलमधील सहा विद्यार्थ्यांनी राष्ट्रीयस्तरावर 'कलर कोट' हा सन्मान मिळवला. या शिस्तीच्या आणि मार्गदर्शनाच्या जोरावर त्यांचे अनेक विद्यार्थी आज सैन्य, पोलिस आणि इतर शासकीय सेवांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत.

**महाविद्यालयाच्या पलीकडील सामाजिक योगदान :** प्रा. अजय चिंचोळकर यांचे कार्यक्षेत्र केवळ महाविद्यालयाच्या परिसरापुरते मर्यादित राहिले नाही. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून त्यांनी अनेक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. त्यांनी १५ वर्षे अमोलकचंद महाविद्यालय कर्मचारी सहकारी ग्राहक भांडाराचे सचिव म्हणून काम पाहिले. तसेच, एक स्वतंत्र रक्तदान गट स्थापन करून शिबिरांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना वेळोवेळी रक्तपुरवठा केला. बाजोरियानगर येथील 'मध्यमवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्थे'चे सचिव म्हणून त्यांनी सलग सात वर्षे धुरा सांभाळली. त्यांच्या कार्यकाळात, आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेली ही संस्था त्यांनी सक्षम झाली आणि आज त्या संस्थेचे उत्पन्न भरीव आहे. याच काळात परिसरात श्री संत गजानन महाराज मंदिराच्या उभारणीत आणि प्राणप्रतिष्ठेतही त्यांनी मोलाची भूमिका बजावली. एक शिक्षक किंवा प्रशासक म्हणून काम करताना अजय चिंचोळकर यांनी नेहमीच आपल्यातील माणुसकी जपली. त्यांचा मनमिळाऊ स्वभाव, सुसंवाद आणि सहज विनोदबुद्धी यामुळे त्यांची स्टाफ रूममधील उपस्थिती एक चैतन्याची लहर असे. कोणत्याही समस्येला धैर्याने सामोरे जाण्याचा त्यांचा आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन इतरांना प्रेरणा देणारा ठरला. वैयक्तिक आयुष्यात अनेक आव्हाने येऊनही ते कधीही डगमगले नाहीत. त्यांच्या या संपूर्ण प्रवासात सर्वांत मोठे बळ आणि प्रेरणास्थान ठरले ते महाविद्यालयाचे माजी प्राचार्य, कै. शंकरराव सांगळे. त्यांच्या प्रत्येक कार्यामागे सांगळे यांची सावलीसारखी साथ होती. 'सांगळे नसते, तर मी काहीच करू शकलो नसतो,' या शब्दांत ते नेहमीच आपली कृतज्ञता व्यक्त करतात. ही गुरू-शिष्य परंपरा त्यांच्यातील विनम्रता आणि मूल्यांची जाणीव दर्शवते. आज ते एका पदावरून निवृत्त झाले असले तरी, त्यांचा प्रवास हा केवळ सेवानिवृत्तीपुरता मर्यादित नाही. त्यांनी घडवलेले हजारो विद्यार्थी, त्यांनी रुजवलेली मूल्ये आणि त्यांनी जपलेले स्नेहबंध हा त्यांचा खरा वारसा आहे. त्यांची कर्तव्यनिष्ठा, सेवाभाव आणि प्रामाणिकपणा महाविद्यालयाच्या इतिहासात कायम स्मरणात राहील. शिक्षक म्हणून ते निवृत्त झाले असले, तरी मार्गदर्शक आणि समाजसेवक म्हणून त्यांचा प्रवास अखंड सुरूच राहील, या सदिच्छेसह त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### सुनावणी



कोण पक्ष कोणाचे चिन्ह
निर्णय तो प्रलंबित आहे
लवकरच होईल निर्णय
न्यायालयाचे म्हणणे आहे

राज्यात निवडणुकांचे वारे
वाहणे सुरु झाले आहेत
कोण कोणाला म्हणे कारे
ते चित्र दिसणार आहेत

तो बाण कोणाचा राहील
कोणाचे धनुष्य ते असेल
निर्णय नक्कीच हा लागेल
कोण गुरु शिष्य समजेल

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

दु:ख दु:ख दु:ख
नका माळ जपू ।
नका ते दाखवू
जगास हो ॥

दु:ख तेथे होई
दुबळा तू जेथे ।
खंबीर तू जेथे
दु:ख नाही ॥

ऐसे ना कुठले
जगी संकट हो ।
मिळे त्यासी ना हो
निवारण ॥

दु:खास लढण्या
तू व्हावे प्रवीण ।
सुंदर जीवन
जगण्या हो ॥

# बजरंगी भाईजानमधील मुन्नीचे साऊथमध्ये पदार्पण!



कबीर खान दिग्दर्शित बजरंगी भाईजान या चित्रपटाची क्रेझ आजही चाहत्यांमध्ये आहे. २०१५ साली प्रदर्शित झालेला हा चित्रपटात सलमान खान आणि करीना कपूरची मुख्य भूमिका होती.या चित्रपटात मुन्नीची भूमिका साकारून बालकलाकार हर्षाली मल्होत्राने ( ) प्रेक्षकांची मनं जिंकली. निरागस चेहरा आणि स्मित हास्याने अनेकांनी भुरळ घालणारी हर्षाली आता नव्या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकतीच तिच्या या आगामी चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे.

दरम्यान, हर्षाली मल्होत्राच्या बजरंगी भाईजान या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. तसेच अनेक समीक्षकांनी चित्रपटाची स्तुती केली. त्यानंतर आता हर्षालीने दाक्षिणात्य चित्रपटातून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यास सज्ज आहे. ''अखंडा-२'' असं या चित्रपटाचं नाव आहे. या चित्रपटात ती जननीची भूमिका साकारताना दिसणार आहे. दाक्षिणात्य अभिनेते नंदमुरी बालकृष्ण हे या चित्रपटात मुख्य भूमिका साकारत आहेत. नुकताच या हर्षालीचा चित्रपटातील पहिला लूक नुकताच समोर आला आहे. सोशल मीडियावर हर्षालीने तिच्या या आगामी चित्रपटाचं पोस्टर शेअर करत चाहत्यांसोबत गुडन्यूज शेअर केली आहे.

अखंडा-२ च्या घोषणेनंतर, हर्षाली मल्होत्रा चर्चेत आली आहे. बजरंगी भाईजान नंतर, आता हर्षाली या बिग बजेट प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. हा चित्रपट दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर म्हणजेच येत्या २५ सप्टेंबर २०२५ रोजी हिंदी, तेलगू, तमिळ, कन्नड आणि मल्याळम अशा ५ भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून हर्षाली मल्होत्रा जवळपास १० वर्षानंतर अभिनय क्षेत्रात कमबॅक करते आहे.

# पाय सतत दुखतात, सूज येत असेल तर करू नका कानाडोळा



आजकाल शरीरासंबंधी वेगवेगळ्या समस्या डोकं वर काढत आहेत. यातील काही आजार असेही असतात, ज्यांबाबत आपल्याला माहितही नसतं. तर काही आजार असे असतात ज्यांकडे आपण सामान्य समजून दुर्लक्ष करतो. नसांसंबंधी समस्यांकडेही बरंच दुर्लक्ष केलं जातं. व्हस्कुलर सर्जन आणि व्हेरिकोज व्हेन स्पेशलिस्ट डॉ. सुमित कपाडिया सांगतात की, नसांसंबंधी समस्या फार कॉमन झाल्या आहेत आणि जर वेळीच यावर उपाय केले नाही तर गंभीर रूप घेऊ शकतात. अशात नसांसंबंधी ५ अशा संकेतांबाबत पाहुया ज्यांकडे अजिबात दुर्लक्ष करू नये.

पायांमध्ये सतजर जास्त वेळ उभं राहिल्यानं किंवा बसल्यावर आपल्या पायांमध्ये सतत वेदना होत असेल, जडपणा वाटत असेल तर वेळीच सावध व्हा. कारण हा किंवा व्हेरिकोज व्हेंसचा सुरूवातीचा संकेत असू शकतो. यावरून हे दिसून येतं की, आपल्या नसांमध्ये रक्तप्रवाह सुरळीतपणे होत नाहीये. खासकरून पायांच्या खालच्या भागात नेहमीच सूज येत असेल तर हा खराब ब्लड सर्कुलेशन किंवा नसांमध्ये रक्त जमा झाल्याचा संकेत असू शकतो. या गोष्टीला अनेकदा लोक थकवा समजतात, पण हे शरीराच्या आतील समस्येचं लक्षण असू शकतं.

बऱ्याचदा आपण असा विचार करतो की, व्हेरिकोज व्हेन्स किंवा स्पायडर व्हेन्स ब्यूटीसंबंधी समस्या आहे. पण जर नसांमध्ये वेदना होत असेल, त्यांमध्ये सूज असेल तर हा नसांचा काहीतरी आजार असल्याचं संकेत असू शकतो. यातून हे दिसून येतं की, नसा योग्यपणे काम करत नाहीयेत.

जर पायांवरील जखम बऱ्याच दिवसांपासून बरी होत नसेल तर हा चा संकेत असू शकतो. या स्थितीत वेळीच डॉक्टरांना दाखवलं पाहिजे आणि योग्य ते उपचार घेतले पाहिजे.पायांच्या खालच्या भागात त्वचेचा रंग भुरका, जांबळा किंवा लाल झाला असेल, त्वचा जाड झाली असेल तर हा किंवा वीनस अल्सर विकसित झाल्याचा संकेत असू शकतो. रक्त पायांमध्ये जमा झाल्यानं त्वचा प्रभावित होत असल्याचं लक्षण आहे.

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 91



## हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

संकेत शब्दः–

**दोन अक्षरी**
- असा
- कपि
- गट
- जीव
- देव
- नड
- बस्ता
- रत
- रणी
- रवि
- लुब्ध
- वर
- शुक
- षट्
- साने
- साय
- सुरा

**तीन अक्षरी**
- अग्यारी
- आनन
- आळशी
- कमर
- कबर
- काबुल
- कापूर
- कारक
- कारंजा
- खडावा
- जनता
- नासाडी
- परडी
- पाटणा
- पिनाक
- प्रेरक
- भद्रता
- माहुत
- रगाडा
- शीतल
- सुरस

**चार अक्षरी**
- नुकसान
- पाकिस्तान
- पानशेत
- बकासुर
- बटवडा
- बुद्धिबळ
- मयसभा
- म्यानमार
- रजपूत
- लुटमार

**पाच अक्षरी**
- अजानुबाहू
- आदिमानव
- कदरदान
- गुलामगिरी
- देविकाराणी
- शेक्सपिअर

**सहा अक्षरी**
- कामगार दिन
- बटाट्याची चाळ

**अन्य**
- आयझॅक न्यूटन
- जमशेटजी टाटा
- ग दि माडगुळकर
- सचीन पिळगावकर
- नेताजी सुभाषचंद्र बोस

## मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 471



**—: आडवे संकेत :—**

1) कोणत्याही चांगल्या कार्याची सुरुवात, पहिला धडा
4) फळ देणे
7) पुत्राच्या विरहामुळे आपले प्राण त्यागणारा एक पौराणिककालीन राजा
10) नृपति
11) रामायणातील एक दशरथ पुत्र
12) वृक्षाच्या बुंध्याभेवती बांधलेला ओटा
13) स्वच्छंदी, लहरी
15) घोड्याची रग जिरविण्यासाठी त्याला दिलेले फेरे
17) श्रीकृष्णाने आपल्या करंगळीवर पेललेला पर्वत
18) वाद, भांडण
19) नाही म्हणणे, निषेध
21) रामायणातील विद्वान खलनायक
22) श्रीविष्णुचा चवथा अवतार
25) धोबी
28) पराभव मान्य करणे
30) चूक, अपराध, न्यून
31) मनात भक्तिभाव नसतांना भजनात टाळ वाजविणारा
33) दिवसभर उपवास करुन रात्री भोजन करण्याचे व्रत
34) देवपूजेचे किंवा मसाल्याचे पदार्थ ठेवण्याचे पाच खणांचे पात्र
36) हस्त, हात
37) वनात उत्पन्न झालेले
40) विष, जहर
41) शास्त्रांनी घालून दिलेले आचार, नियम, पवित्र विधी, आणि कर्तव्ये इ.
43) पैसा, संपत्ती
44) पुत्र, मुलगा
45) वनवासात गेलेल्या वडिलबंधूच्या पादूका सिंहासनावर ठेवून त्याच्यातर्फे राज्य सांभाळणारा एक रघूवंशी
46) भांडण सोडविण्यात मध्यस्थी करणारे
48) ऋषिप्रणीत गूढशक्तियुक्त वाक्य
50) वादी किंवा प्रतिवादी तर्फे त्यांची बाजू न्यायालयात मांडणारी अधिकृत व्यक्ति
51) रामायणातील एक दशरथ पत्नी
52) मोल, मूल्य
53) डावा, वाईट
54) रोजचा खुराक
56) शक्ति, ताकद
57) श्रीरामाचा जन्मदिन
59) धूळ, कण
60) नड, आवश्यकता
63) न्यून, वजा
65) घोड्याच्या खुरावर ठोकलेला अर्धचिंद्राकार लोखंडाचा तुकडा
66) वेळ घालविण्याचे साधन, करमणूक
67) उष्ण, तप्त
70) पृथ्वी
72) कौशल्य, चातुर्य, युक्ति
75) सुरेख, चांगले
76) बलाढ्य, पराक्रमी
78) माणसाच्या डोक्याची कवटी
79) मृत्यूदेवता
80) मुलगी, कन्या
81) सोज्वळता, नम्रता, लाजाळूपणा

**—: उभे संकेत :—**

1) प्रभू रामचंद्र
2) गणेश, गणपति
3) थंडीत अंगावर घेण्याचे लोकरीचे उंची वस्त्र
4) रागाचा झटका, संताप
5) सवाल, पृच्छा, विचारणा
6) नटात श्रेष्ठ
7) महाभारतात दहा तोंडे असलेला रावण
8) पत्त्यांमधील एक खेळ
9) प्रिय व्यक्तिच्या दुराव्याने होणारी मानसिक स्थिती
12) घराच्या भिंतीवर, अडगळीच्या ठिकाणी आढळणारा एक जीव
14) ग्रहण करणे, कबूल करणे
16) गोल गोल फिरत घोंघावत येणारा वारा 18) बिकट प्रसंग
20) रात्री फिरणारा, चंद्र
23) राजा महाराजांची रत्नजडित सोन्याची बैठक
24) रामायणात रावणाची पत्नी
26) खंजीर किवा बिचव्याच्या आकाराचे एक शस्त्र
27) रामायणात जनक राजाची कन्या
29) उंच झाडावर सर्रकन पळणारा एक जीव
31) काशाची पोकळ झांज
32) वाईट कार्य
34) एक रांगेत जेवायला बसलेले लोक
35) डोली, एक जुन्याकाळचे वाहन
37) समाज सोडून अरण्यात राहणे
38) फारच उग्र, तिखट
39) मोठे पोट असलेला गणपति
41) फार भीती वाटल्याने छातीत धडधड होणे
42) विद्येची देवता
44) नियम, तत्व, दोरा
47) सर्वत्र दाणादाण करीत येणारा सोसाट्याचा वारा
48) श्रीरामाच्या विरुद्ध कैकयीचे कान भरणारी दासी
49) सारख्या वयाचे
53) वर्ण, रंग
55) समाजात कुप्रसिद्ध झालेला
56) हनुमानाचे एक नाव
58) पौराणिक काळात अंबेने वधिलेला एक राक्षस
61) सूर्य 62) वेडा, विक्षिप्त
63) महाभारतात वीर अभिमन्यूची भार्या
64) अग्नि 68) चांदी
69) लहान, छोटा 70) जंगल, अरण्य
71) भय, धास्ती, दरारा
72) ओढा, झोंक, प्रवृत्ती
73) महाभारतात पांडवांसाठी चमत्कारिक सभागृह बांधणारा राक्षस
74) अंधार, काळोख 75) सावली
77) नम्र, एकजीव झालेला (उत्तर पुढील अंकी)

## मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# राशी-भविष्य

**मेष :** नशीब तुम्हाला साथ देण्यास उत्सुक आहे, काम करत राहा आणि सर्वकाही नशिबावर सोपवा. कामात यश मिळेल आणि मान-सन्मान वाढण्याची शक्यता आहे.

**वृषभः** प्रवास करणे टाळा. कोणाशीही अनावश्यक वाद घालू नका. काही ठिकाणी आनंद आणि काही ठिकाणी दुःख यामुळे दिवसभर गोंधळ राहील.

**मिथून :** आज प्रगतीशील दिवस आहे. तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून किंवा प्रियजनांकडून पाठिंबा मिळेल. मन आनंदी राहील.

**कर्क :** आज तुम्हाला प्रलंबित पैसे मिळतील. तुम्हाला अचानक काही चांगली बातमी मिळेल. शत्रू आणि विरोधक तुमच्यापासून पळून जातील. घरातील वातावरण चांगले राहील याची खात्री करा.

**सिंह :** चांगल्या बुद्धीच्या आधारे काम होईल आणि वाईट बुद्धीमुळे काम बिघडू शकते, विचार करून बुद्धीचा वापर करा. कोर्ट केसेसमध्ये सावधगिरी बाळगा.

**कन्या :** आज जर तुम्ही तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवले तर दिवस शांततेत जाईल, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते.

**तुळ :** आज धैर्य वाढण्याचा दिवस आहे. अनेक रखडलेल्या कामांना गती मिळेल. प्रवासातून तुम्हाला फायदा होईल.

**वृश्चिक :** आजचा दिवस मिश्रित परिणामांचा असेल. काळजीपूर्वक विचार करूनच शेअर्स इत्यादी जोखमीच्या कामात पुढाकार घ्या.

**धनु :** आज शत्रूंवर तुमचा विजय निश्चित आहे. न्यायालयीन प्रकरणांमध्ये तुम्हाला यश मिळेल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

**मकर :** सकाळपासून खर्च होण्याची शक्यता आहे, विचार करूनच पैसे गुंतवा. निरुपयोगी वाद टाळा. शक्य असल्यास प्रवास करणे टाळा.मुलांशी संबंधित काही समस्या असू शकतात.

**कुंभ :** आज तुम्ही जे काही काम कराल त्यात पूर्ण नफा मिळण्याची शक्यता आहे. मन आनंदी राहील, पैशाच्या गुंतवणुकीत नफा मिळण्याची दाट शक्यता आहे.

**मीन :** आज काम व्यवसायात प्रगतीचा दिवस आहे. आज केलेले काम किंवा घेतलेले निर्णय तुम्हाला यश देईल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# थैलेसिमिया प्रतिबंधासाठी राज्यात एसओपी तयार

## आमदार रणधीर सावरकर यांचा मुद्दा महत्त्वाचा ठरला

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



राज्यातील थैलीसेमिया रुग्णांसाठी ही कार्यप्रणाली नवसंजीवनी ठरणार असून, आमदार सावरकरांनी उपस्थित केलेल्या प्रश्नामुळे या विषयावर सरकारने सकारात्मक पावले उचलली आहेत.

**अकोला, दि. ३ :** थैलीसेमिया सारख्या गंभीर अनुवंशिक आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी आणि भावी पिढीला सुरक्षित ठेवण्यासाठी राज्यात मानक कार्यप्रणाली तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आमदार रणधीर सावरकर यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नाद्वारे हा मुद्दा जोरदारपणे उपस्थित केला होता. त्यांच्या मागणीनुसार, राज्य आरोग्य विभागाने थैलीसेमिया मुक्त महाराष्ट्राच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

राज्यात सुमारे १२ हजारथैलीसेमिया रुग्ण असून, त्यांच्या उपचारासाठी आणि नवीन रुग्णनिर्मिती थांबवण्यासाठी ही कार्यप्रणाली उपयुक्त ठरणार आहे. सदर एसओपी अंतर्गत सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये एचपीएलसी चाचणी मोफत उपलब्ध करुन देण्यात आली असून, आवश्यकतेनुसार मोफत रक्त संक्रमण व आयरन चिलेटिन गोळ्याही पुरवण्यात येत आहेत.

राज्य आरोग्य संस्थेच्या (पीएचआय नागपूर) माध्यमातून जिल्हा व तालुका पातळीवरील आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरू झाली असून, ३४ जिल्ह्यांमधील १०० समुपदेशकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्पष्ट केले की, खासगी रुग्णालयांमध्ये अनिवार्य चाचण्यांसाठी अद्याप मार्गदर्शक तत्वे लागू करण्यात आलेली नाहीत. मात्र, शासकीय पातळीवर तपासण्या, निदान व समुपदेशनासाठी भक्कम उपाययोजना केली जात आहे.

## थोडक्यात

### पूर्ण वाढ झालेल्या विषारी घोणसचा हैदोस; चैतन्य कॉलनीत खळबळ



**अकोला:** शहरातील गोरक्षण रोडवरील चैतन्य कॉलनीत आज सकाळच्या सुमारास एका फुल साईज विषारी घोणस (परड) सापाने खळबळ उडवून दिली. हा साप एक मोठा उंदीर गिळत असताना स्थानिकांनी पाहिला, आणि पाहता पाहता परिसरात गर्दी जमली. सुरुवातीला तो अजगर असल्याचा समज निर्माण झाला होता.

घटनेची माहिती मिळताच रहिवासी महेश गावंडे यांनी तात्काळ सर्पमित्र तथा मानद वन्यजीव रक्षक बाळ काळणे यांना पाचारण केले. त्यांनी प्रसंगावधान राखत आणि जीव धोक्यात घालून हा साप पकडला. अत्यंत अरुंद आणि अडचणीच्या जागेवर हा साप होता, मात्र बाळ काळणे यांनी कसब वापरून त्याला सुरक्षितपणे बरणीत बंद केलं. हा घोणस साप विषारी असून शरीराने लांब आणि वजनदार असतो. रागावल्यावर शेपटीपासून मानेपर्यंत शरीर हलवत आक्रमक होतो. याचे विषारी दात सुमारे १ इंच लांब आणि लवचिक असतात. त्यामुळे याचा चावाही अत्यंत घातक आणि सहसा चुकत नाही. सर्पमित्र बाळ काळणे यांनी सांगितले की, ''हा साप जंगल, शेत, नद्या-नाले यांच्या आसपासच्या भागांमध्ये आढळतो. जुन, जुलै, ऑगस्ट महिन्यात सापांचे प्रमाण वाढते. नागरिकांनी विशेषत: रात्रीच्या वेळेस खबरदारी घ्यावी. कुकरच्या शिट्टीसारखा आवाज करणारा हा साप शहरी भागात दुर्मीळ असूनसुद्धा काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.'' या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, नागरिकांनी सर्पदंशासंदर्भात सजग आणि सावध राहावे, असे आवाहन वनविभाग व सर्पमित्रांकडून करण्यात आले आहे.

### रेल्वेखाली आल्याने अज्ञात इसमाचा मृत्यू

**अकोला :** अकोला यावलखेड रेल्वे सेक्शनजवळ ५८५/३२-३४ कि.मी. दरम्यान एका अज्ञात व्यक्तीचा रेल्वे कटिंगमुळे मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. ३ जुलै २०२५) सकाळी १० वाजता उघडकीस आली.

ही माहिती अमोल खंडारे (ट्रॅक मॅन, युनिट क्र. ०१ अकोला) यांनी उपस्टेशनप्रबंधक लक्ष्मण वाघ यांच्यामार्फत सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात दिली. त्यानुसार दाखल अधिकारी वंदना खाडे (ब.नं. ६६८) यांनी मर्ग क्र. ४४/२०२५ कलम १७४ भा.दं.वि. नुसार नोंद घेतली असून, लाश ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.सदर मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे काम सुरू असून, सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याचे पथक अधिक तपास करीत आहे.

### सिद्धार्थवाडीत मालकीपट्ट्यासाठी नागरिकांचा एकमुखी ठराव



**अकोला :** नायगांव येथील सिद्धार्थवाडीतील नागरिकांनी आपली वस्ती अधिकृत असूनही आजपर्यंत मालकी हक्काचे पट्टे न मिळाल्याच्या प्रश्नावर आवाज उठवत एक मोठे पाऊल उचलले आहे. मोहल्ला सभा आयोजित करून मालकीपट्टा प्रक्रियेसाठी महानगरपालिका आणि जिल्हाधिकाऱ्यांना ठराव देण्याचा निर्णय घेण्यात आला. या मोहल्ला सभेचे प्रस्ताविक संध्या जोशी यांनी केले. या वेळी वस्तीतील सुमारे १०० नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेत नागरिकांनी त्यांच्या समस्या अत्यंत सविस्तरपणे मांडल्या. विशेषतः, काही अपप्रचारांमुळे वस्तीवर महानगरपालिका तोडफोड करणार असल्याच्या अफवांचे वातावरण तयार झाले असून त्यामुळे नागरिकांमध्ये भीती पसरली आहे, असे स्पष्ट करण्यात आले.

मुलभूत सुविधांचा अभाव, मालकी हक्काचा प्रश्न कायम सिद्धार्थवाडी वस्ती १९८४ साली अधिकृत झोपडपट्टी म्हणून घोषित झाली असून आज ४१ वर्षे उलटली तरीही येथील नागरिकांना त्यांच्या घरांवरील मालकीपट्टे किंवा भाडेपट्टे अद्यापही मिळालेले नाहीत. शासनाने झोपडपट्टी वासीयांना त्यांच्या भोगवटेखालील जमिनीवर मालकी हक्क देण्याचा निर्णय २३ वर्षांपूर्वी घेतला असतानाही त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे या सभेत नागरिकांनी ठणकावून सांगितले.

या सभेला मार्गदर्शक म्हणून युवा संस्थेचे दत्ता भिसे उपस्थित होते. त्यांनी मालकीपट्टा संदर्भातील विविध शासन निर्णयांचे विवेचन करत नागरिकांना योग्य त्या कायदेशीर प्रक्रिया, टप्पे आणि अंमलबजावणी संदर्भात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन दिले. तसेच, ही वस्ती अधिकृत असल्यामुळे नागरिकांनी कुठल्याही अफवांना बळी न पडता आत्मविश्वास बाळगावा, असे आवाहन त्यांनी केले.

**ठराव संमत: महानगरपालिकेला दिला जाणार प्रस्ताव**

सर्व नागरिकांनी एकमुखाने ठराव मंजूर केला की, महानगरपालिकेने सिद्धार्थवाडीतील नागरिकांसाठी मालकीपट्टा प्रक्रिया त्वरीत राबवावी. हा ठराव आता अकोला महानगरपालिका व जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे.

**संयोजन समितीचा मोलाचा सहभाग**

या सभेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी गौतम गवई, राजुभाऊ तायडे, विशाल नंदागवली, अनिता खैरनार, सुरेंद्र गवई, रेखा रवि बोदडे, मुकेश राजपूत, शेख कयुब आदी नागरिकांनी मेहनत घेतली.

# कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांनी घेतला जि.प.शाळा शिवापूर येथे प्रवेश

## अखेर जिल्हा परिषदेच्या शिक्षणाचे महत्त्व पटले पालकांना

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. ३ :** खाजगी शिक्षण संस्थांच्या पैशाचा भडिमार व विद्यार्थीना मिळणाऱ्या योग्य शिक्षणाचा अभाव उशीरा का होईना याचे महत्त्व पालकांना पटले असून याची प्रचिती जि.प शाळा शिवापूर येथे आली. शिवापूर येथील विविध इंग्रजी शाळांमधून शिकणाऱ्या जवळपास १५ विद्यार्थ्यांनी जि.प. शाळा शिवापुर येथे प्रवेश घेतला आहे.

उन्हाळी सुट्टी नंतर विदर्भातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळा २३ जून रोजी सुरू झाल्या. इंग्रजी शाळांमधून दिसत असलेली आभासी प्रगती आणि जिल्हा परिषदेमध्ये असलेली खरी प्रगती ही तफावत पालकांच्या लक्षात आली. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची विविध स्पर्धा परीक्षांमध्ये दिवसेंदिवस दिसून येणारी प्रगती, खेळांमधील प्राविण्य, वाचन लेखनातील प्रगती या सर्व गोष्टी चावडी वाचनाने किंवा इतर कार्यक्रमांच्या निमित्तने शिवापूर येथील ग्रामस्थांच्या लक्षात येत होत्या तसेच विद्यार्थ्यांमधला आत्मविश्वास ही प्रत्येकाच्या निदर्शनास येत होता. या सर्व बाबींचा परिणाम बघता पालकांनी आपल्या पाल्यांना शिवापूर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये प्रवेश घेऊन दिला आहे. फ्युचरिस्टिक एज्युकेशन किंवा एकविसाव्या शतकातील नागरिक घडवण्याच्या शाळेच्या प्रयत्नाचे हे एक महत्त्वाचे यश आहे असे येथील मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंदांना वाटते. यामुळे शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास दुणावला असून. पालकांनी आमच्यावर जो विश्वास दाखवला तो आम्ही सार्थ ठरवू. असे वचन त्यांनी पालकांना दिले आहे. या संदर्भात शिवापुर शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय धाडसे गावातील कर्तव्यदक्ष नागरिक किशोर धरमकार आणि शाळेची भूमिका पटवून देणाऱ्या मुख्याध्यापिका अश्विनी गावंडे व शिक्षिका सोनाली नालींदे यांच्या पालकांशी चर्चा या बाबींनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण; निंभोरा ग्राम पंचायतीचा अभिनव उपक्रम




दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३ :** गट ग्राम पंचायत निंभोरा येथील सरपंच प्रा. नितीन सुभाषराव ताथोड यांच्या प्रयत्नांमुळे ग्राम पंचायत निंभोरा अंतर्गत गावातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

शासनाकडून मुलांना पुस्तक, बूट, मोजे, कपडे मिळतात म्हणून ग्राम पंचायतीने जिल्हा परिषद शाळा आणि इतर शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांना दफ्तर, वॉटर बॉटल, पेन्सिल बॉक्स आणि टिफिन डब्बा प्रत्येकी १ नग या प्रमाणात साहित्याचे वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रमाला गोपालखेड केंद्र प्रमुख श्री अवताडे सर, गोसावी सर हे प्रमुख उपस्थित होते. सोबतच ग्राम पंचायत सरपंच प्रा. नितीन ताथोड, उपसरपंच आशा अवारे, सदस्य शीला सौन्दले, सुलोचना लांडे, गोवर्धन ओहे, दीपक इंदोरे, रमा ओहे, दादाराव दंदी ,ग्राम पंचायत कर्मचारी नितीन देहमुख, राजेश बोर्डे, ग्राम रोजगार सेवक नेहा ताथोड गावातील नागरिक सुरेश सुलताने, गुलाब पांडे, सुधाकर ताठे, देविदास गोंदचवर, शशी आवारे, धनंजय गावंडे आणि शाळेतील शिक्षक कर्मचारी आणि सर्व गावातील १ ली ते ७ मधील विद्यार्थी उपस्थित होते.

## टीओएस चित्रक ग्रुप अकोलातर्फे विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप

**अकोला :** सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या टिओएस चित्रक ग्रुप अकोला तर्फे किनखेड पुर्णा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, त्याचप्रमाणे त्यांना शहरी मुलांच्या तुलनेत शैक्षणिक साहित्याची कोणतीही कमी भासू नये या भावनेने काही सामाजिक संस्था आपले योगदान समाजाप्रती देत असतात. अशाच प्रकारे कार्य करणारे अकोला येथील टिओएस चित्रक ग्रुप अकोला हे समाजसेवी संघटन अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेच्या ग्रंथालयाकरिता पुस्तकांचे वाटप त्याचप्रमाणे विविध साहित्य देत असते. आज त्यांनी जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा किनखेड पूर्णा येथील २१५ विद्यार्थांना छत्र्यांचे वाटप केले. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहू लागला. ह्या पवित्र कार्यात टीओएस चित्रक ग्रुप अकोलाचे प्रा. डॉ. श्रीकांत उखळकर, प्रा.डॉ. सोनोने सर, पत्रकार प्रबोध देशपांडे, राजु उखळकर यांचा सहभाग होता.

# कळंबमध्ये बांधकाम कामगार नोंदणीत बोगसगिरी

## 'साई कॉम्प्युटर'वर धाड, मालकावर गुन्हा; ९० दिवसांचे बनावट अनुभव प्रमाणपत्र देणारे रॅकेट उघड

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.३:** बांधकाम कामगार म्हणून नोंदणी करण्यासाठी लागणारी ९० दिवसांच्या कामाची बनावट अनुभव प्रमाणपत्रे तयार करणाऱ्या एका रॅकेटचा कळंब येथे पर्दाफाश झाला आहे. कामगार विभागाने 'साई कॉम्प्यूटर' नावाच्या दुकानावर धाड टाकून, त्याचा मालक प्रज्वल शिरसकर याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.

बांधकाम कामगार नोंदणीतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी, कामगार उपायुक्त (अमरावती) चंद्रकांत राऊत यांनी दक्षता पथके स्थापन करून कारवाईचे आदेश दिले होते. याच मोहिमेअंतर्गत, कामगार अधिकारी रा. रा. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली, राजेश वनारे आणि सतीश देशमुख यांच्या पथकाने ही कारवाई केली. कळंब येथील 'साई कॉम्प्यूटर'मध्ये लोकांकडून जादा पैसे घेऊन बनावट प्रमाणपत्रे तयार केली जात असल्याची गुप्त माहिती या पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, पथकाने एक जुलै रोजी दुपारी कळंब पोलिसांच्या मदतीने 'साई कॉम्प्यूटर'वर छापा टाकला. या छाप्यात, नगर पंचायत, कळंबच्या अधिकाऱ्यांची सही असलेले एक कोरे अनुभव प्रमाणपत्र सापडले, ज्यावर खोटा जावक क्रमांक होता. या प्रमाणपत्राची नगरपंचायतीत पडताळणी केली असता, तो जावक क्रमांकच बनावट असल्याचे सिद्ध झाले. याशिवाय, इतर दोन कामगारांची प्रमाणपत्रेही बोगस असल्याचे समोर आले. या प्रकरणी, दुकानातील संगणक व इतर साहित्य जप्त करण्यात आले असून, मालक प्रज्वल शिरसकर याच्यावर भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अशी केली जात होती फसवणूक

संशयित आरोपी प्रज्वल शिरसकर हा बांधकाम कामगार नोंदणीसाठी आवश्यक असलेले ९० दिवसांचे कामाचे अनुभव प्रमाणपत्र बनावट पद्धतीने तयार करत होता. यासाठी तो लोकांकडून जादा पैसे घ्यायचा. त्याने नगर पंचायतीच्या शिक्क्याचा आणि अधिकाऱ्यांच्या सहीचा गैरवापर करून, खोट्या जावक क्रमांकासह ही प्रमाणपत्रे तयार केली. या बनावट कागदपत्रांच्या आधारे, तो शासनाची आणि गरजू कामगारांची दिशाभूल आणि फसवणूक करत होता.

### यांच्या पथकाने केली यशस्वी कारवाई

ही कारवाई कामगार उपायुक्त (अमरावती) चंद्रकांत राऊत यांच्या आदेशानुसार आणि कामगार अधिकारी रा. रा. काळे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. कारवाई करणाऱ्या पथकात राजेश वनारे आणि सतीश देशमुख यांचा समावेश होता. कळंब पोलिस ठाण्याचे सहाय्यक फौजदार राजेश चौधरी आणि पंच यांनी या कारवाईत महत्त्वाची मदत केली. या एकत्रित कारवाईमुळे हे रॅकेट उघडकीस आले.

## अकोला तालुक्यातील सरपंच आरक्षणाची बुधवारी सोडत

**अकोला :** सन २०२५ ते सन २०३० या पाच वर्षाच्या कालावधीत अकोला तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सरपंच पदाचे जातीनिहाय आरक्षण नव्याने निश्चित करावयाचे आहे. याकरिता जाहीर सोडत बुधवार दि. ९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता डी.बी.ए. हॉल, तहसील कार्यालय येथे आयोजित केली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग अंतर्गत महिलाकरिता व खुल्या प्रवर्ग अंतर्गत महिलांकरिता आरक्षणाची सोडतही आयोजित केली आहे.तरी सरपंच, तसेच महिला सरपंच पदाच्या सोडतीसाठी सर्व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आहे.


**जाहीर प्रसिद्धी**

मी मोहम्मद खाँ रफिक खाँ पठाण रा. टूनकी तालुका संग्रामपूर जिल्हा बुलढाणा असे जाहीर करतो की, माझे जुने पासपोर्ट (क्र.K१७३०५४१) मध्ये नाव MOHAMMAD KHAN RAFIK KHAN PATHAN असे होते. आज रोजी माझे आधारकार्ड नुसार नाव MOHAMMAD KHA RAFIK KHA PATHAN असे आहे. यापुढे सर्व व्यवहार याच नावाने होतील करिता प्रसिद्धी दिली आहे.

- आपला विश्वासू
MOHAMMAD
KHA RAFIK KHA PATHAN


# राज्य राखीव पोलीस दलात अकोल्याचा गौरव!

## गौरव देशमुख ठरला सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३ :** कठोर शारीरिक व मानसिक क्षमतेच्या कसोट्यांवर आधारित राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) प्रशिक्षणामध्ये अकोल्याचा गौरव संजयराव देशमुख याने संपूर्ण राज्यातील २१५ प्रशिक्षणार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक पटकावून 'सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी' हा प्रतिष्ठेचा बहुमान प्राप्त केला आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील एसआरपीएफ प्रशिक्षण केंद्रात झालेल्या दीक्षांत समारंभात गौरवला दोन पदके व 'रेजिमेंटल केन' देऊन सन्मानित करण्यात आले. राज्य राखीव पोलीस दलाचे अप्पर पोलीस महासंचालक राजकुमार व्हटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या समारंभात विशेष पोलीस महानिरीक्षक निसार तांबोली (नागपूर), पोलीस उपमहानिरीक्षक मोक्षदा पाटील (मुख्यालय, मुंबई), आणि पोलीस उपमहानिरीक्षक विजयकुमार मगर (पुणे परिक्षेत्र) हेही उपस्थित होते.

गौरव देशमुख याने केवळ शारीरिक शिस्तीमध्येच नव्हे, तर सेवाभाव, सोज्वळ वर्तन, सहकाऱ्यांशी स्नेहसंबंध जपण्याचे कौशल्य, आणि सर्वांगीण शिस्त या सर्व बाबींमध्ये आपली चमकदार कामगिरी सिद्ध केली. त्यामुळे तो वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आवडता प्रशिक्षणार्थी ठरला.सेवेसाठी सज्ज अमरावतीत मिळाली नियुक्ती

दीक्षांतानंतर गौरव देशमुख याची नियुक्ती राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ९, अमरावती येथे करण्यात आली आहे. त्याचं हे यश अकोला जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरले आहे.



### सामाजिक वारसा लाभलेला तरुण

गौरव हा आरोग्य व सामाजिक क्षेत्रातील अन्यायाविरुद्ध कार्य करणारे, लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाच्या सामाजिक सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष तसेच देशमुख समाजाचे कार्यकर्ते संजयबाप्पू कृष्णराव देशमुख (कंझारेकर) यांचा मुलगा आहे. सामाजिक जाणीव असलेल्या कुटुंबातून आलेल्या गौरवने, कष्ट आणि चिकाटीच्या जोरावर आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली आहे.


**जाहीर नोटीस**

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**श्रीमती डि.एम.पाटील यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधिश क.स्तर. बाळापुर, बाळापुर, अकोला**

प्रोसेस क्रं. १४०३
दिवाणी न्यायालय, बाळापूर
दिवाणी किरकोळ अर्ज/६५/२०२५
नीलकांता श्रीधर नकासकर वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : २९-०७-२०२५

अर्जदार:-१. श्रीमती निलकांता श्रीधर नकासकर वय अं.६७ वर्ष धंदा घरकाम
२.चक्रधर श्रीधर नकासकर वय अं.४२ वर्ष धंदा शेती
३. संदिप श्रीधर नकासकर वय अं.४१ वर्ष धंदा शेती
सर्व रा. नकाशी पो. देगाव ता.बाळापुर जि. अकोला

...विरूध्द..

गैरअर्जदार:- निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत श्रीधर उत्तमराव नकासकर हे दिनांक २०.११.२०१५ रोजी मौजे नकाशी ता.बाळापुर जि. अकोला येथे मरण पावले. मयत सुभद्राबाई उत्तमराव नकासकर ही दिनांक ०१.०७.१९८२ रोजी मरण पावले. वरील नमुद सर्व अर्जदार यांना मयत श्रीधर उत्तमराव नकासकर यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २९.०७.२०२५ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक २७.०६.२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

आदेशानुसार,

सहायक अधिक्षक (न्यायीक) दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर



**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी कंमाक -०७२५३-२६३२४६
Email adderss- tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी /म.स./कावि- २९८/२०२५

दिनांक ०८/०५/२०२५

**जाहिरनामा**

अर्जदार :- दिनेश विठ्ठलराव गावंडे रा. कार्ली ता. मानोरा जि. वाशिम ...विरुद...
गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली ता. मानोरा जि. वाशिम बनाम :- सर्व नागरिक

याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार दिनेश विठ्ठलराव गावंडे रा. कार्ली ता. जि. वाशिम येथील कायमचा रहिवासी असून त्यांना स्वतःचे मुलीचे नावाने जन्म नोंदीचा आदेशाची ग्राम पंचायत कार्यालय, काली येथे आवश्यकता आहे. अर्जदाराचे मुलीचे नामे वैष्णवी दिनेश गावंडे हिचा जन्म दिनांक २९/०९/२००९ रोजी अर्जदाराचे राहते घरी कार्ली ता. मानोरा जि. वाशिम येथेच झालेला आहे. परंतु ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली येथे गेले असता स्वतःच्या मुलीचे जन्म नोंदीचा रेकॉर्ड आढळला नाही. अर्जदाराकडून जन्म नोंद करण्यात आलेले नाही. त्यासाठी सचिव, ग्राम पंचायत कार्यालय, काली यांचे कडून जन्म नोंद नसल्याचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

याकरिता पुरावा म्हणून अर्जदारानी आधार कार्ड, शिधापत्रिका, पोलिस पाटिलाचा रहिवासी दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, सचिव, ग्राम पंचायत, कार्ली यांचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र या सोबत जोडलेले आहे. तरी आपण शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र या वरिल तारिख नमुद करून ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली येथे जन्म-मृत्यु नोंदणी कायदा सन १९६९ चे कलम १३ (३) २०२३ अन्वये जन्म नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे.

करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वतःचे मुलीचे जन्म मौजा कार्ली ता. मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त/ अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, कार्ली ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतः चे मुलीचे जन्म नोंदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवुन अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल. आज दिनांक ०८/०५/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

(डॉ. संतोष येवलीकर)
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा



**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी कंमाक -०७२५३-२६३२४६
Email adderss- tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी /म.स./कावि- ३७७/२०२५

दिनांक ०९/०६/२०२५

**जाहिरनामा**

अर्जदार :- श्रीराम सिताराम टिपरे रा. शेंदोना ता. मानोरा जि. वाशिम ...विरूध्द...गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना ता. मानोरा जि. वाशिम बनाम :- सर्व नागरिक

याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्रीराम सिताराम टिपरे रा. शेंदोना ता. मानोरा जि. वाशिम येथील कायमचा रहिवासी असून त्यांना स्वतःचे मुली/मुलाची नावाने जन्म नोंदीचा आदेश ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना ता. मानोरा जि. वाशिम येथे आदेश मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदाराचे स्वतः चे मुली/मुलांचे नामे हिरष श्रीराम टिपरे यांचा जन्म दिनांक ०५/०१/२०११ (२) पुनम श्रीराम टिपरे हिचा जन्म दिनांक ०५/०८/२००९ रोजी अर्जदाराचे राहते घरी शेंदोना ता. मानोरा जि. वाशिम येथेच झालेला आहे. परंतु ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना येथे गेले असता अर्जदाराचे स्वतःच्या मुली/मुलांचे जन्म नोंदीचा रेकॉर्ड आढळला नाही. अर्जदाराकडून जन्म नोंद अनावधानाने करण्यात आलेले नाही. त्यासाठी सचिव, ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना यांचे कडून जन्म नोंद नसल्याचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

प्रकरणात अर्जदारानी आधार कार्ड, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, सचिव, ग्राम पंचायत, शेंदोना यांचा अनुउपलब्धता प्रमाणपत्र, वंशावळ, सरपंच/पो. पाटिलचा रहिवासी प्रमाणपत्र या सोबत जोडलेले आहे. तरी शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र या वरिल तारिख नमुद करून ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना येथे जन्म-मृत्यु नोंदणी कायदा सन १९६९ चे कलम १३ (३) २०२३ अन्वये जन्म नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे.

करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वतःचे मुली/मुलांचे जन्म मौजा शेंदोना ता. मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त/ अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, शेंदोना ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतःचे मुली/मुलांचे जन्म नोंदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवुन अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल. आज दिनांक ०९/०६/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

(डॉ. संतोष येवलीकर)
तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा

# गिलने मोडला विराटचा विक्रम

## बर्मिंगहॅमच्या मैदानावर केली मोठी खेळी



**नवी दिल्ली: दि.३ प्रतिनिधी**

इंग्लंड दौऱ्यावर भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिल एका वेगळ्याच लयीत दिसत असून धावांचा पाऊस पाडतोय. त्याने सलग दुसऱ्या कसोटी सामन्यात शतक ठोकताना इंग्लंडच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. त्याच्यामुळेच पहिल्या दिवशी भारतीय संघाला ३०० धावांचा टप्पा ओलांडता आला. यानंतर दुसऱ्या दिवशीही गिलने उत्कृष्ट फलंदाजी केली आणि १५० धावांचा टप्पा पार करत विराट कोहलीला मागे टाकत इतिहास रचला आहे.गिलने दुसऱ्या दिवशी १५० धावां पूर्ण कसोटी क्रिकेटमध्ये नवा पराक्रम केला आहे. यासह तो बर्मिंगहॅमच्या मैदानावर सर्वात मोठी कसोटी खेळी खेळणारा भारतीय खेळाडू ठरला आहे.

त्याने विराट कोहलीचा विक्रम मोडला आहे. यापूर्वी कोहलीने २०१८ मध्ये इंग्लंडविरुद्ध बर्मिंगहॅमच्या मैदानावर १४९ धावांची खेळी साकारली होती. गिल आता बर्मिंगहॅमच्या मैदानावर १५० धावांची कसोटी खेळी करणारा पहिला भारतीय बनला आहे. यापूर्वी कोणत्याही भारतीय खेळाडूला हे जमले नव्हते.शुबमन गिलने २०२० मध्ये भारतीय कसोटी संघासाठी पदार्पण केले. तेव्हापासून तो भारतीय फलंदाजीच्या क्रमवारीत महत्त्वाचा दुवा बनला आहे. त्याने भारतीय संघासाठी सलामीवीर आणि तिसऱ्या क्रमांकावरही फलंदाजी केली आहे. सध्या विराट कोहलीच्या निवृत्तीनंतर तो चौथ्या क्रमांकावर खेळत आहे आणि या स्थानावर त्याने सलग दोन शतके ठोकली आहेत. त्याने आतापर्यंत भारतीय संघासाठी ३४ कसोटी सामन्यांमध्ये एकूण २१६३ धावा केल्या आहेत, ज्यात ७ शतके आणि तितक्याच अर्धशतकांचा समावेश आहे.कर्णधार शुबमन गिलने मागील सामन्यात १४७ धावांची खणखणीत खेळी केली होती. आता दुसऱ्या कसोटी सामन्यातही त्याने इंग्लंडच्या गोलंदाजांची दमछाक केली. कसोटी कर्णधार बनल्यापासून त्याच्या फलंदाजीत नवीन चमक दिसत आहे.

इंग्लंड दौऱ्यावर तो संघासाठी संकटमोचक ठरला आहे.दुसऱ्या कसोटी सामन्यात इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. ट

यानंतर भारतीय संघाची सुरुवात खराब झाली.मागील सामन्यात शतक ठोकणारा केएल राहुल यावेळी मोठी खेळी करू शकला नाही आणि अवघ्या २ धावांवर बाद झाला. त्यानंतर करुण नायरने ३१ धावा केल्या. पण यशस्वी जैस्वाल आणि शुबमन गिलने जबाबदारी सांभाळली. जैस्वाल ८७ धावांवर बाद झाला. दुसरीकडे, गिलने शानदार नाबाद १५० करत संघाची धावसंख्या ४०० च्या पुढे नेण्यात रवींद्र जडेजासह मोलाची भूमिका बजावली.



## श्रीलंकेच्या संघाने बांगलादेशला १६७ धावांवर गुंडाळले!

**नवी दिल्ली: दि.३ प्रतिनिधी**

श्रीलंका विरुद्ध बांगलादेश यांच्यामध्ये एकदिवसीय मालिकेला कालपासून सुरुवात झाली आहे. बांग्लादेशचा संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर आहे. पहिल्या सामन्यामध्ये श्रीलंकेच्या संघाने घरच्या मैदानावर बांग्लादेशला पराभुत करुन पहिला विजय नोंदवला आहे. या विजयासह श्रीलंकेच्या संघाने मालिकेचा पहिला विजय मिळवुन मालिकेमध्ये १-० अशी आघाडी घेतली आहे.श्रीलंका विरुद्ध बांगलादेश या सामन्यात श्रीलंकेचा संघाने नाणेफेक जिंकून पहिले फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. श्रीलंकेच्या संघाने पहिले फलंदाजी करत ४९.२ ओव्हरमध्ये २४४ धावा केल्या होत्या. यामध्ये श्रीलंकेच्या फलंदाजीबद्दल सांगायचे झाले तर संघाने पहिले दोन विकेट्स लवकर गमावले होते. निस्सांका हा एकही धाव न करता पॅव्हेलियन मध्ये परतला. मधुशुंका देखील स्वस्तात बाद झाला त्याने फक्त संघासाठी ६ धावा केल्या आणि विकेट्स गमावली.बांगलादेशच्या संघाने सुरुवात चांगली केली होती. कुशल मेंडीस याने संघाला सावरलं आणि संघासाठी ४५ धावा केल्या. कमींडू मेंडीस देखील फार काही चांगली कामगिरी करू शकला नाही. चारिथ असलंका याने संघाला संकटातून बाहेर काढलं आणि शतक झळकावले. त्याने १२४ चेंडूमध्ये १०६ धावा केल्या, यामध्ये त्याने ४ षटकार आणि ६ चौकार मारले. लियांगे याने संघासाठी ३१ चेंडूमध्ये २९ धावा केल्या तर रथनायके याने संघासाठी महत्त्वाच्या २२ धावा केल्या. हसरंगा याने संघासाठी २२ धावांची खेळी खेळली.श्रीलंकेच्या गोलंदाजीबद्दल सांगायचे झाले तर वानिंदू हसरंगा याने संघाला ४ विकेट्स मिळवुन दिले. त्याने तझीद हसन, लिटन दास, मेंहदी हसन मिराज, जाकेर अली यांना बाहेरचा रस्ता दाखवला. त्याने लिटन दास याला शुन्यावर बाद केलं. कमिंडू मेंडीस याने देखील कौतुकास्पद कामगिरी केली. त्याने संघासाठी ३ विकेट्सची कमाई केली. महेश तिक्षणा आणि असिथा फर्नांडो या दोघांनी संघाला प्रत्येकी १ विकेट मिळवुन दिला.

## वैभव सूर्यवंशीचा कहर इंग्लंडमध्येही कायम



**नवी दिल्ली: दि.३ प्रतिनिधी**

वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२५ चा हंगाम आपल्या बॅटने चांगलाच गाजवला होता. आता वैभव सूर्यवंशीने इंग्लंडच्या भूमीवरही आपला जलवा कायम राखला आहे. त्याने इंग्लंडमध्ये ९ षटकार मारून एक नवा विक्रम रचला आहे. १४ वर्षीय सूर्यवंशीने गेल्या आयपीएल हंगामात सर्वांना प्रभावित केले होते. आता तो इंग्लंडविरुद्ध च्या १९ वर्षांखालील सामन्यांमध्ये देखील धुमाकूळ घालताना दिसत आहे. इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात त्याने ३१ चेंडूंचा सामना करीत ८६ धावांची स्फोटक खेळी साकारली.भारत आणि इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघांमध्ये ५ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील तिसरा सामना खेळवण्यात आला. या सामन्यात टीम इंडियाने इंग्लंडचा ४ विकेट्सने पराभव केला आहे. आता भारतीय संघ मालिकेत २-१ ने आघाडीवर आहे. इंग्लिश संघाविरुद्धच्या या सामन्यात वैभव सूर्यवंशीने विश्वविक्रम रचला आहे.इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात ८६ धावांची स्फोटक खेळी करून, वैभव सूर्यवंशीने १९ वर्षांखालील खेळाडू म्हणून इतिहास नोंदवला आहे. त्याने या खेळीत एकूण ९ षटकार आणि ६ चौकारांची आतषबाजी केली आहे. यादरम्यान, वैभवचा स्ट्राईक रेट २७७ इतका झाला आहे. आता तो १९ वर्षांखालील एकदिवसीय सामन्यांच्या एका डावात सर्वाधिक षटकार मारणारा पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे. याशिवाय, वैभवने आणखी एक विक्रम देखील आपल्या नावावर केला आहे.

वैभव सूर्यवंशी १९ वर्षांखालील एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वात जलद अर्धशतक करणारा दुसरा भारतीय फलंदाज बनला आहे. इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यामध्ये वैभवने २० चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. एका डावात सर्वाधिक षटकार मारण्याच्या विक्रमाबद्दल सांगायचे झाले तर या विक्रमाची वैभव सूर्यवंशीच्या नावावर नोंद झाली आहे. यापूर्वी हा विक्रम राजा बावाच्या नावावर जमा होता.

## रियल माद्रिदची उपांत्यपूर्व फेरीत धडक



**नवी दिल्ली: दि. ३ प्रतिनिधी**

स्टार खेळाडू किलियन एम्बाप्पेच्या पुनरागमनाने उत्साहित रियल माद्रिदने फिफा क्लब वर्ल्डकपमध्ये बलाढ्य युव्हेंटसला १-० ने पराभूत करत उपांत्यपूर्व फेरीत दिमाखात प्रवेश केला. सामन्याच्या उत्तरार्धात गोंझालो गार्सियाने केलेला हेडरवरील गोल सामन्यात निर्णायक ठरला. येथील हार्ड रॉक स्टेडियमवर झालेल्या अटीतटीच्या सामन्यात रियल माद्रिदने मारलेली ही बाजी सनसनाटी ठरली.पहिल्या हाफमध्ये दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत रंगली. युव्हेंटसने सुरुवातीला आक्रमक खेळ करत रियल माद्रिदच्या बचावफळीवर दडपण आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, रियलचा गोलरक्षक थिबॉट कोर्टुआने काही उत्कृष्ट बचाव करत त्यांचे प्रयत्न अयशस्वी ठरवले. यानंतर रियल माद्रिदने सामन्यावर हळूहळू पकड मिळवली. ज्युड बेलिंगहॅम आणि फेडेरिको व्हॅल्व्हर्डे यांनी युव्हेंटसच्या गोलपोस्टवर जोरदार हल्ले चढवले; पण त्यांना यश आले नाही.दुसऱ्या सत्रात रियल माद्रिदने आपले वर्चस्व कायम ठेवले. अखेर सामन्याच्या ५४ व्या मिनिटाला त्यांना यश मिळाले. ट्रेंट अलेक्झांडर-अर्नोल्डने दिलेल्या अचूक क्रॉसवर गोंझालो गार्सियाने शानदार हेडर मारत चेंडूला जाळीचा रस्ता दाखवला आणि संघाला १-० अशी महत्त्वाची आघाडी मिळवून दिली. या सामन्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे रियल माद्रिदचा हुकमी एक्का, किलियन एम्बाप्पे याचे आजारपणातून सावरून मैदानात झालेले पुनरागमन. सामन्याच्या ६८ व्या मिनिटाला तो बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरला, तेव्हा उपस्थित ६२,००० हून अधिक प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्याचे स्वागत केले.

## आर अश्विनचा डबल धमाका: ११ चौकार, ३ षटकारांसह तुफान फटकेबाजी

**नवी दिल्ली: दि. ३ प्रतिनिधी**

तामिळनाडू प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेतील शेवटच्या टप्प्यातील सामन्यांना सुरूवात झाली आहे. या स्पर्धेतील एलिमिनेटरचा सामना दिंडीगुल ड्रॅगन्स आणि ट्रिची ग्रँड चोलस या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात दोन्ही संघांमध्ये रोमांचक लढत पाहायला मिळाली. या सामन्यात भारताचा माजी खेळाडू आर अश्विन चमकला. अश्विनने फलंदाजी आणि गोलंदाजीत दमदार कामगिरी केली. अश्विनने तुफान फटकेबाजी करत आपल्या संघाला क्वालिफायर २ मध्ये प्रवेश मिळवून दिला आहे. या सामन्यातील पहिल्या डावात ट्रिची ग्रँड चोलस संघाला २० षटकांअखेर अवघ्या १४० धावा करता आल्या. यादरम्यान दिंडीगुल ड्रॅगन्स संघाकडून गोलंदाजी करताना आर अश्विनने ४ षटकात २८ धावा खर्च करत ३ गडी बाद केले.गोलंदाजीत आपला दम दाखवल्यानंतर त्याने फलंदाजीला येऊन गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. आर अश्विन दिंडीगुल ड्रॅगन्स संघाकडून डावाची सुरूवात करण्यासाठी येतो. या सामन्यात त्याने अशी खेळी केली की, दिंडीगुल ड्रॅगन्स संघाने हा सामना एकहाती आपल्या नावावर केला. ज्यावेळी तो बाद होऊन माघारी परतला, त्यावेळी संघाला जिंकण्यासाठी अवघ्या ११ धावांची गरज होती. अश्विनने धावांचा पाठलाग करताना ४८ चेंडूत ११ चौकार आणि ३ षटकारांचा साहाय्याने ८३ धावांची तुफानी खेळी केली. या धावा त्याने १७२.९२ च्या स्ट्राईक रेटने केल्या.या सामन्यात दिंडीगुल ड्रॅगन्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.




## भारत-अमेरिका व्यापार करारावर होणार शिक्कामोर्तब




भारत आणि अमेरिका यांच्यात एक अंतरिम व्यापार करार होणार आहे आणि येत्या ४८ तासांत त्याबाबत मोठी घोषणा होऊ शकते. भारत-अमेरिका व्यापार करार अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या परस्पर शुल्कावरील बंदी घालण्याची अंतिम मुदत ९ जुलै रोजी संपत आहे आणि त्यापूर्वी दोन्ही देशांमधील हा व्यापार करार शिक्कामोर्तब होणार आहे. तथापि, सूत्रांच्या हवाल्याने असे म्हटले आहे की भारत कृषी क्षेत्रातील आपल्या अटींवर ठाम आहे.गेल्या काही दिवसांपासून भारत आणि अमेरिकेकडून दोन्ही देशांमधील व्यापार करारावर झालेल्या कराराबाबत निवेदने दिली जात आहेत. दरम्यान, सूत्रांनी सांगितले की व्यापार करारावरील चर्चा आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे आणि लवकरच त्याबाबत घोषणा केली जाऊ शकते.तथापि, भारत अमेरिकेसाठी कृषी आणि दुग्धजन्य क्षेत्र पूर्णपणे उघडणार नाही या आपल्या भूमिकेवर ठाम आहे; यासोबतच, भारताने कापड, रत्ने आणि दागिने, चामड्याच्या वस्तू, प्लास्टिक आणि रसायने यासारख्या कामगार-केंद्रित उद्योगांना अधिक प्रवेश देण्याची मागणी केली आहे.अमेरिकेची इच्छा आहे की भारताने अमेरिकेसाठी त्यांची कृषी आणि दुग्धजन्य बाजारपेठ उघडावी, जेणेकरून या क्षेत्राशी संबंधित अमेरिकन उत्पादनांना भारतासारखी मोठी बाजारपेठ मिळू शकेल. तथापि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार अमेरिकेने केलेल्या या मागणीसाठी अजिबात तयार नाही आणि ताज्या अपडेटनुसार, ते आपल्या भूमिकेवर ठाम आहे.

भारत काही अमेरिकन कृषी उत्पादनांवर १००% कर लादतो आणि अमेरिका तो बंद करण्याची मागणी करत आहे.

## ‘मेक इन इंडिया’ला ब्रेक लावण्याचा चीनचा प्रयत्न

**नवी दिल्ली: दि. ३ प्रतिनिधी**

भारतात आयफोन आणि ॲपल कंपनीची इतर उपकरणे उत्पादित करण्यासाठी ॲपल उत्सुक आहे. ॲपलचे सीईओ टीम कुक यांनी भारतात उत्पादन वाढविण्याचा मानस व्यक्त केला होता. यामुळे 'मेक इन इंडिया' उपक्रमाला बळ मिळत असतानाच आता याला ब्रेक लागण्याची भीती व्यक्त केली जात आहे. भारतात आयफोनची निर्मिती तैवानी कंपनी फॉक्सकॉनकडून करण्यात येते. या कंपनीत प्रमुख पदावर अनेक चिनी अभियंते आणि तंत्रज्ञ काम करीत होते; मात्र गेल्या काही महिन्यात फॉक्सकॉनने शेकडो चिनी कर्मचाऱ्यांची गच्छंती केली असून, त्यांना चीनमध्ये जाण्यास भाग पाडले आहे.

भारतातील फॉक्सकॉनच्या कारखान्यांमध्ये लवकरच आयफोन १७ या मॉडेलचे उत्पादन घेतले जाणार होते. यावर्षी सप्टेंबर महिन्यात हे मॉडेल बाजारात येईल, असे ॲपलने जाहीर केले होते. मात्र फॉक्सकॉनमधील चिनी कर्मचारी परतल्यामुळे आता उत्पादनाचा वेग मंदाविण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ब्लुमबर्गने दिलेल्या बातमीनुसार, गेल्या काही महिन्यात फॉक्सकॉनने ३०० चिनी कर्मचाऱ्यांना भारत सोडण्यास सांगितले. दोन महिन्यांपूर्वी हे आदेश देण्यात आले होते. भारत सरकारलाही याची कल्पना




देण्यात आली, मात्र निर्णयामागचे कारण सांगितले गेले नाही.चिनी कर्मचाऱ्यांऐवजी आता तैवान आणि व्हिएतनामचे कर्मचारी आणले जात आहेत. दरम्यान आयफोनची निर्मिती करणाऱ्या चिनी भाषेतील यंत्र आणि सॉफ्टवेअरला इंग्रजी भाषेत भाषांतरीत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जेणेकरून भारतीय अभियंते आणि इतर इंग्रजी भाषा जाणणारे कर्मचारी त्यावर काम करू शकतील.

फॉक्सकॉनला बदललेली यंत्रसामग्री काही महिन्यात मिळेल, असेही ब्लुमबर्गच्या बातमीत म्हटले आहे. चीनचे अभियंते आणि तंत्रज्ञ परत गेल्यामुळे आयफोनच्या उत्पादनाचा वेग मंदावणार असल्याचे सांगितले जाते. चीनचे अभियंते फक्त उत्पादनातच नाही तर भारतीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचेही काम करत होते. चीनच्या कुशल मनुष्यबळावर अवलंबून राहिल्यामुळे उत्पादन शुल्कातही भरमसाठ वाढ होत असल्याची माहिती ब्लुमबर्गच्या बातमीत देण्यात आली आहे.फॉक्सनने मनुष्यबळ कपात करण्यामागे चीनचा हात असल्याचे म्हटले जाते. चीनने आपल्या देशातील तंत्रज्ञान आणि कुशल मनुष्यबळ बाहेरील देशात जाऊ नये, यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचा एक भाग म्हणून या वर्षीच्या सुरुवातीला भारतासाह आग्नेय आशियातील देशांत तंत्रज्ञान जाऊ नये, यासाठी चीनने प्रयत्न सुरू केले होते.

याशिवाय चिनी अभियंते भारतातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देत असल्याबाबत चीनने नाराजी व्यक्त केली होती. चीनमधून तंत्रज्ञ, तंत्रज्ञान आणि उत्पादन करण्यासाठी लागणारी उपकरणे बाहेर जाऊ नयेत, यासाठीचे प्रयत्न सुरू झाले होते.दरम्यान भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने बिझनेस स्टँडर्डशी याविषयावर बोलताना सांगितले, ''आम्हाला यात कोणतीही अडचण दिसत नाही.

## जून महिन्यात मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राला उभारी

**नवी दिल्ली: दि. ३ प्रतिनिधी**

पावसाळा असूनही जून महिन्यात मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राची उत्पादकता वाढून १४ महिन्याच्या उच्चांकावर गेली आहे. जून महिन्यातील मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राचा परर्चेसिंग मॅनेजर इंडेक्स म्हणजे पीएमआय ५८.४ इतका मोजला गेला. मे महिन्यामध्ये हा निर्देशांक ५७.६ इतका मोजला गेला होता. देशातून आणि परदेशातून या क्षेत्राला मिळालेल्या ऑर्डरमध्ये वाढ होत असून या क्षेत्रामध्ये बरीच रोजगार निर्मिती झाली असल्याचे हा निर्देशांक तयार करणाऱ्या एचएसबीसीचे मुख्य अर्थतज्ञ प्रांजूल भंडारी यांनी सांगितले.

या क्षेत्रातने मंदीतून बाहेर पडण्याचे ठरविले असून बरीच मोठी जाहिरात मोहीम हाती घेतली आहे.त्यामुळे देशातून आणि परदेशातून ऑर्डर वाढल्या आहेत. किंबहुना जून महिन्यांमध्ये या क्षेत्रातून झालेली निर्यातही वाढली आहे. वीस वर्षात प्रथमच जून महिन्यात वाढलेल्या परदेशी ऑर्डर जास्त असल्याचे नमूद करण्यात आले. फेब्रुवारीनंतर प्रथमच कच्च्या मालाच्या किमती बऱ्याच कमी झाल्या आहेत. त्याचबरोबर या अगोदर वाढलेल्या किमतीनुसार मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राने आपल्या किमतीत वाढ केली आहे. त्यामुळे या क्षेत्राचे ताळेबंद नफादायक ठरण्याची शक्यता आहे.

व्यापार युद्ध, वाढलेली स्पर्धा आणि परदेशातील महागाई इत्यादी अडथळे असूनही या क्षेत्राने जून महिन्यात उत्तम कामगिरी केली असून आगामी काळात परिस्थितीत अधिक सुधारणा होण्याची शक्यता आहे. दरम्यानच्या काळामध्ये झालेल्या व्याजदर कपातीचा या क्षेत्राला लाभ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. देशातील ४०० कंपन्यांच्या पर्चेसिंग मॅनेजरकडून मिळविलेल्या माहितीच्या आधारावर हा निर्देशांक तयार करण्यात येतो.

## ओला, उबर, रॅपिडोला दुपटीने भाडेवसुलीला सरकारची मुभा

**नवी दिल्ली: दि. ३ प्रतिनिधी**

उबर, ओला आणि रॅपिडो या सारख्या सेवांना सर्वाधिक मागणी आणि वर्दळीच्या समयी मूळ भाड्याच्या दुप्पट भाडे आकारण्याची परवानगी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने बुधवारी दिली. यापूर्वी अशा प्रसंगी जास्तीत जास्त दीड पट भाडे, तर मागणी कमी असताना मूळ भाड्याच्या किमान ५० टक्के भाडे राखणे बंधनकारक करणारा नियम होता.रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने 'मोटर वाहने समूहक (ॲग्रीगेटर) मार्गदर्शक तत्त्वे २०२५' अशा शीर्षकाच्या नियमावलीत ही सुधारणा केली गेली आहे. यामध्ये म्हटले आहे की, समूहकाला मूळ भाड्यापेक्षा किमान ५० टक्क्यांपर्यंत किमानतम आणि उप-कलम (१७.१) अंतर्गत मागणीनुसार किंमत गतिशीलता राखून मूळ भाड्याच्या कमाल दुपटीपर्यंत भाडे आकारण्याची परवानगी असेल. शिवाय, इच्छित ठिकाणाहून प्रवाशांना वाहनांत प्रवासासाठी घेण्यासाठी कापलेले अंतर आणि वापरात आलेले इंधन अर्थात 'डेड मायलेज'ची भरपाई म्हणून भाडे न आकारण्याची किमान मर्यादा तीन किलोमीटर इतकी असेल, त्यापेक्षा जास्त अंतर कापावे लागल्यास ते मूळ भाड्यात समाविष्ट केले जाईल.




सुधारीत मार्गदर्शक तत्वांनुसार, संबंधित श्रेणी किंवा श्रेणीतील मोटार वाहनांसाठी राज्य सरकारने अधिसूचित केलेले भाडे हे समूहकांकडून सेवा घेणाऱ्या प्रवाशांना आकारले जाणारे मूळ भाडे असेल.

देशभरात या संबंधाने एकसमानता असावी यासाठी राज्यांना तीन महिन्यांच्या आत सुधारित मार्गदर्शक तत्वे स्वीकारण्याचा सल्ला देण्यात आला आहे.समूहकांना परवान्यासाठी अर्जाची एक-खिडकी मंजुरीची योजना सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारकडून एक संकेतस्थळ विकसित केले जाणार आहे, असेही या मार्गदर्शक तत्वांमध्ये म्हटले आहे. समूहकांना देय असलेले परवाना शुल्क ५ लाख रुपये असेल आणि परवाना जारी केल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी ते वैध असेल.

अजिंक्य भारत
# आपलं नागपूर
शुक्रवार, दि. ४ जुलै २०२५


पैसे बिमारी ठीक होने के बाद
उम्र की अधिकता और
बीपी शुगर से आई कमजोरी,
टायमिंग में कमी,
शुक्राणु की कमी,
निःसंतान, आदी सभी
रोगों का विशेष
आयुर्वेदिक पद्धती से इलाज. मनचाहा पॉवर
सफलता से प्राप्त करने हेतु संपर्क करें
धन्वंतरी आयुर्वेदिक
भारती कॉम्लेक्स नं.२ उद्योग भवन समोर,
दारव्हा रोड, यवतमाळ
8767418343

# मालमत्ता करात मोठी सूट
## नागपूर मनपाच्या तिजोरीत पहिल्या तिमाहीत विक्रमी कर संकलन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३ :** नागपूर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर सवलत योजनेला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला असून, या योजनेतून करदात्यांनी तब्बल ७ कोटी ८९ लाख रुपयांची सवलत मिळवली आहे. विशेष म्हणजे, ऑनलाइन पद्धतीने कर भरणाऱ्या नागरिकांनी सर्वाधिक, म्हणजेच पावणेसहा कोटी रुपयांच्या सवलतीचा लाभ घेतला आहे. या प्रतिसादामुळे मनपाच्या तिजोरीत पहिल्या तिमाहीत विक्रमी कर जमा झाला आहे.

मालमत्ता कर वसुली वाढवण्यासाठी, मनपा आयुक्त तथा प्रशासक अभिजित चौधरी यांनी १ एप्रिल ते ३० जून २०२५ या कालावधीत कर सवलत योजना जाहीर केली होती. याअंतर्गत, ऑनलाइन कर भरणाऱ्यांना १५ टक्के आणि ऑफलाइन कर भरणाऱ्यांना १० टक्के सवलत देण्यात आली. नागरिकांना सहजपणे कर भरता यावा, यासाठी 'एनएमसी ॲप' आणि 'व्हॉट्सॲप चॅटबॉट' सारख्या सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. आणि उपायुक्त मिलिंद मेश्राम यांनी या योजनेच्या




अंमलबजावणीवर विशेष भर दिला.या योजनेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ९६,९९३ करदात्यांनी ऑनलाइन पद्धतीने ४९ कोटी ९२ लाख रुपयांचा कर भरणा केला आणि ५ कोटी ७९ लाख रुपयांची सवलत मिळवली. तर, ९५,३३१ करदात्यांनी ऑफलाइन पद्धतीने ३५ कोटी रुपयांचा कर भरून, २ कोटी १० लाख रुपयांची सवलत मिळवली. ऑनलाइन सवलत मिळविण्यात लक्ष्मीनगर झोनने शहरात पहिला क्रमांक पटकावला, तर ऑफलाइन सवलत मिळविण्यात हनुमाननगर झोन आघाडीवर राहिला.

### 'गब्बर सिंग'ने केली कर वसुली!

**कर भरण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करण्याकरिता, मनपाने समाज माध्यमांवर एक सर्जनशील मोहीम राबवली. यात 'शोले' सिनेमातील 'गब्बर सिंग' आणि 'खट्टा मिठा' चित्रपटातील संदर्भांचा खुबीने वापर केला. 'कर भरणारा मी जबाबदार नागरिक' या टॅगलाइनखाली चालवलेल्या या मोहिमेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. याशिवाय, चौकाचौकात बॅनर आणि वस्त्यांमध्ये फिरत्या वाहनांद्वारेही जनजागृती करण्यात आली.**

### 'हे' झोन आघाडीवर

**ऑनलाइन पद्धतीने कर भरून सवलत मिळविण्यात लक्ष्मीनगर झोनने पहिला क्रमांक पटकावला. येथील १८,७३३ करदात्यांनी १.१६ कोटी रुपयांची सवलत मिळवली. तर, ऑफलाइन पद्धतीने सवलत मिळविण्यात हनुमाननगर झोन आघाडीवर राहिला, जिथे १६,१९४ करदात्यांनी ३०.५४ लाख रुपयांचा फायदा घेतला. मंगळवारी आणि लकडगंज झोननेही या योजनेत उत्तम कामगिरी केली.**

# गावातील प्रश्न १५ दिवसांत निकाली काढा
## जिल्हाधिकाऱ्यांनी साधला ग्रामस्थांशी संवाद

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३ :** ग्रामस्थांचे प्रश्न गावातच आणि तेही १५ दिवसांत निकाली काढा, असे सक्त निर्देश जिल्हाधिकारी डॉक्टर विपीन इटनकर यांनी दिले आहेत. 'समाधान दिवस' उपक्रमांतर्गत त्यांनी विविध गावांना भेटी देऊन प्रशासनाला अधिक गतिमान केले आहे.

जिल्हाधिकारी डॉक्टर विपीन इटनकर यांनी बुधवारी मौदा तालुक्यातील पावडदौना आणि कामठी तालुक्यातील गुमथळा येथे भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. "महिन्याच्या पहिल्या बुधवारी आलेले अर्ज तिसऱ्या बुधवारपर्यंत निकाली निघालेच पाहिजेत," असे त्यांनी गुमथळा येथे सांगितले. यावेळी सरपंच



शीला वांगे, उपविभागीय अधिकारी सचिन गोसावी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे, तहसीलदार दत्तात्रय निंबाळकर आदी उपस्थित होते. दरम्यान, काही जण जाणीवपूर्वक खोट्या तक्रारी करून ब्लॅकमेल करत असल्याचे निदर्शनास आले असून, अशा तक्रारी खपवून घेतल्या जाणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला. पावडदौना येथे आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

## थोडक्यात

### जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विशेष मोहीम

**नागपूर :** जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूरतर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त ४ जुलैपर्यंत विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. बारावी विज्ञान उत्तीर्ण झालेल्या आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले अर्ज कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, ज्या अर्जदारांच्या अर्जात यापूर्वी त्रुटी आढळल्या होत्या, त्यांनी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत कार्यालयात संपर्क साधून त्रुटींची पूर्तता करावी. या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीचे उपायुक्त तथा सदस्य मंगेश वानखडे यांनी केले आहे.

### साहित्यिक व कलाकारांसाठी सन्मान योजना

**नागपूर :** राज्य शासनाच्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार सन्मान योजनेसाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. या योजनेत पात्र कलाकारांना दरमहा पाच हजार रुपये मानधन दिले जाते. अर्ज 'आपले सरकार' या पोर्टलवर ३१ जुलैपर्यंत ऑनलाइन करता येणार आहे. यासाठी अर्जदाराचे वय ५९ वर्षांपेक्षा जास्त आणि वार्षिक उत्पन्न ६० हजारांपेक्षा कमी असावे. दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादा ४० वर्षे आहे. अर्जदाराचे कलेच्या क्षेत्रात किमान १५ वर्षांचे योगदान असणे आवश्यक आहे. अर्जासोबत वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्र यांसारखी आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

### येत्या सोमवारी लोकशाही दिन

**नागपूर :** नागपूर महानगरपालिकेतर्फे येत्या सोमवारी, ७ जुलै रोजी 'लोकशाही दिन' आयोजित करण्यात आला आहे. मनपा मुख्यालयातील पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृहात सकाळी १० वाजता नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण केले जाईल. शासनाच्या निर्णयानुसार, दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी हा उपक्रम राबवला जातो. विभागीय लोकशाही दिनात प्राप्त झालेल्या तक्रारीही येथे निकाली काढल्या जाणार आहेत. या दिनाला सर्व विभाग प्रमुख आणि दहाही झोनच्या सहायक आयुक्तांनी माहितीसह उपस्थित राहावे, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक अभिजीत चौधरी यांनी दिले आहेत.

### पार्वती मेश्राम यांचे निधन

**नागपूर :** गोपालनगरातील हरी अपार्टमेंट येथील रहिवासी पार्वती हरीशचंद्र मेश्राम (वय ८०) यांचे बुधवारी, २ जुलै रोजी निधन झाले. त्या सतीश मेश्राम यांच्या आई होत. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी, ३ जुलै रोजी सकाळी ९:३० वाजता अंबाझरी घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

## CAPTION — शेवटी...मला काय त्याचे !



**नागपूर :** मेडिकल चौक ते गणेशपेठ मध्यवर्ती बसस्थानक मार्गावरील हा रस्ता. अगदी दुभाजकाला लागून हा प्लास्टिक पाईप पडलेला आहे. यातून वीजवाहक केबल प्रवाहित असल्याचे प्राथमिकरित्या दिसून येते. मात्र, या पाईपवरून दररोज शेकडो वाहने जातात, विशेष मोठी चारचाकी! त्यातून वीज वाहक तार बाहेर पडल्यास होणा या हानीला जबाबदार कोण ? विद्युत विभाग, स्थानिक प्रशासन की नागरिक.

# गोरेवाडा प्राणीसंग्रहालयात लवकरच 'आफ्रिकन सफारी'; सामंजस्य करार संपन्न
## मुख्यमंत्री, वनमंत्र्यांच्या उपस्थितीत 'एनबीसीसी'सोबत करार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३ :** येथील बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालयात 'आफ्रिकन सफारी' विकसित करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी मुंबईत सामंजस्य करार करण्यात आला.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत, एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेड आणि एनबीसीसी इंडिया यांच्यात हा करार झाला. यानुसार, सुमारे ६३ हेक्टर जागेवर २८५ कोटी रुपये खर्चून आफ्रिकन सफारी उभारण्यात येणार आहे. हे काम १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. यात आफ्रिकन सिंह, चिंपांझी, गेंडा, जिराफ, झेब्रा यांसारख्या २२ प्रजातींचे प्राणी पर्यटकांना पाहता येतील. इंडियन सफारीनंतर आता आफ्रिकन सफारीच्या या दुसऱ्या टप्प्यामुळे नागपूर हे प्राणीसंग्रहालय पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

# शिक्षण, आरोग्य व महिला सक्षमीकरण क्षेत्रात प्रभावीपणे निधी वापरावा
## आयुक्त वसुमाना पंत : 'सीएसआर' निधीचा घेतला आढावा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर., दि. ३ :** कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधीचा उपयोग शिक्षण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरण यांसारख्या क्षेत्रात अधिक प्रभावीपणे करावा, असे निर्देश मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमाना पंत आणि वैष्णवी बी. यांनी दिले. त्यांनी विभागप्रमुखांची बैठक घेऊन आढावा घेतला.

या बैठकीत विविध विभागप्रमुख आणि सीएसआर प्रतिनिधी सहभागी झाले होते. "शिक्षण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरण यांसारख्या क्षेत्रांना सीएसआर निधीची खरी गरज आहे. त्यामुळे या निधीतून




अधिक विकासात्मक कामे करण्यावर भर द्यावा," असे वसुमाना पंत म्हणाल्या. त्यांनी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर सीएसआरबद्दलची माहिती आणि सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही माहिती तंत्रज्ञान अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीला समाज विकास विभागाच्या उपायुक्त डॉक्टर रंजना लाडे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भगत, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉक्टर दीपक सेलोकर यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.

# हेरिटेज संवर्धन समितीची आढावा बैठक
## राजीव गांधी सद्भावना दौडला परवानगी, हेरिटेज संवर्धन समितीची आढावा बैठक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३ :** नागपूर हेरिटेज संवर्धन समितीद्वारा शहरातील विविध हेरिटेज कामांचा आढावा घेण्यात आला. शहरातील विविध भागातील वारसा स्थळांच्या संदर्भात बुधवारी (ता.२) नागपूर हेरिटेज संवर्धन समितीची बैठक समितीचे अध्यक्ष अनुप कुमार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत मनपाच्या मनपा अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, मनपाचे मुख्य अभियंता मनोज तालेवार, समितीच्या सदस्या डॉ. मधुरा राठोड, डॉ. लीना रामकृष्णन, एएसआयचे अरुण मलिक, नगर रचना विभागाचे उपसंचालक आशीष मोरे, सहायक संचालक ऋतुराज



जाधव, नगर रचना विभागाचे सहसंचालक विजय शेंडे, पावन पाटील, आरएलडीएचे प्रतीक कृष्णा, कार्यकारी अभियंता अश्विनी एलचटवार, डॉ. संजय ठाकरे, प्रशांत भांडारकर यांच्यासह रेल्वे, एएसआय, एनआयटीचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत नागपूर शहरातील महत्त्वाच्या ऐतिहासिक आणि हेरिटेज स्थळांच्या सुशोभिकरण, पुनर्विकास आणि नवीन बांधकामांशी संबंधित अनेक प्रस्तावांवर हेरिटेज संवर्धन समिती चर्चा करण्यात आली. यात राजे बख्त बुलंदशहा समाधी स्थळाचे सौंदर्यीकरण, नागपूर रेल्वे स्थानक इमारतीचे पुनर्विकास, रेल्वेच्या शताब्दी उत्सव, शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्थेतील नवीन बांधकाम, मुंशी मंदिर, सोनेगाव तलाव, काशीबाई टेम्पल कॉम्पलेक्सच्या डॉक्युमेंटेशन प्रपोजल, एजी कार्यालय इमारत, राजीव गांधी सद्भावना दौड, कस्तुरचंद पार्क मैदानातील रावण दहन परवानगी, श्रीमंत राजे रघुजीराव भोसले महाल नवीन टाऊन हॉल कार्य या सर्व प्रस्तावांवर हेरिटेज संवर्धन समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत रेल भूमी विकास प्राधिकरणाद्वारे संगणकीय सादरीकरण करीत नागपूर रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास आणि दुरुस्ती कामासंदर्भात माहिती सादर करण्यात आली. दरम्यान, राजीव गांधी सद्भावना दौड आणि कस्तुरचंद पार्क मैदानातील रावण दहन कार्यक्रमाला परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

# नागपूर जिल्हा बनणार हरित-वनसमृद्ध
## २० लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित, 'हरित महाराष्ट्र' अभियानांतर्गत मोठी मोहीम

**नागपूर, दि. ३ :** 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या राज्यव्यापी अभियानांतर्गत, नागपूर जिल्ह्यात येत्या दोन महिन्यांत (जुलै-ऑगस्ट) तब्बल २० लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी विपीन इटनकर यांनी एका उच्चस्तरीय बैठकीत या मोहिमेचा आढावा घेतला आणि सर्व संबंधित विभागांना हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कामाला लागण्याचे निर्देश दिले आहेत.



राज्यात वृक्षाच्छादन वाढवण्यासाठी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर्षी १० कोटी वृक्ष लागवडीची मोहीम राबवण्याचे निर्देशित केले आहे. याचाच एक भाग म्हणून, नागपूर जिल्ह्याला २० लाख झाडे लावण्याचे लक्ष्यांक देण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत, इटनकर यांनी सांगितले की, "ही मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक विभागाने पुढाकार घेणे आवश्यक आहे." "महानगरपालिका, सर्व नगरपालिका, नगरपंचायती, ग्रामपंचायती, आरोग्य केंद्रे आणि शिक्षण संस्था यांसारख्या ठिकाणी प्राधान्याने वृक्ष लागवड झाली पाहिजे," असे ते म्हणाले. प्रत्येक विभागाने या मोहिमेसाठी एका नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करून, वनविभागाशी समन्वय साधावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी, उपवनसंरक्षक विनिता व्यास, मनपा अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या मोहिमेमुळे नागपूर जिल्हा अधिक हरित आणि वनसमृद्ध होण्यास मदत होणार आहे.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली बैठक

**जिल्हाधिकारी विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखालील या महत्त्वपूर्ण बैठकीला विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यात नागपूर वन विभागाच्या उपवनसंरक्षक विनिता व्यास, मनपा अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, सहाय्यक वन संरक्षक यश काळे आणि सामाजिक वनीकरणचे विभागीय वन अधिकारी एन. आर. राऊत यांचा प्रामुख्याने समावेश होता.**

नागपूर जिल्ह्यात आपल्या व्यवसायाला हवी नवी ओळख!
बातमी व जाहिरातीसाठी
आपले हक्काचे
व्यासपीठ
अजिंक्य भारत
आपला व्यवसाय, उत्पादन, सेवा किंवा कोणत्याही प्रकारची घोषणा नागपूर जिल्ह्यातील हजारो वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'दै. अजिंक्य भारत' हे एक प्रभावी माध्यम आहे. आपल्या सर्व प्रकारच्या जाहिराती
अत्यंत आकर्षक दरात प्रसिद्ध करा.
1 शैक्षणिक व क्लासेस
2 वास्तु खरेदी-विक्री
3 नोकरी विषयक
4 वाहन खरेदी-विक्री
5 वाढदिवस, अभिनंदन व शुभेच्छा
6 वैयक्तिक आणि व्यावसायिक घोषणा
अंकासाठी किंवा जाहिरात देण्यासाठी आजच संपर्क साधा.
संजय मुंदलकर
जिल्हा प्रतिनिधी, नागपूर
9552981514
Gmail - ajinkyabharat.nagpur@gmail.com
sannjay.mundalkar@gmail.com






अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, शुक्रवार, दि. ४ जुलै २०२५







# अकोटमधील टावरी मेडिकलवर गर्भपात प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३ :** टोल फ्री क्रमांक १०४ वर प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, अकोला जिल्ह्यातील पीसीपीएनडीटी विभाग आणि जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय तसेच औषध प्रशासन विभाग यांनी संयुक्तपणे अकोट येथील टावरी मेडिकलवर आज यशस्वी स्टिंग ऑपरेशन राबविले. सदर कारवाई ही वैद्यकीय गर्भपात कायदा, १९७१ च्या अंतर्गत करण्यात आली.



तपासादरम्यान सदर मेडिकलवर नियमबाह्य औषध विक्री व गर्भपातासाठी वापरली जाणारी औषधे बेकायदेशीररीत्या वितरित होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त (औषधे), अकोला यांच्या आदेशानुसार त्वरित कारवाई करत टावरी मेडिकलचा औषध विक्री परवाना रद्द करण्यात आला आहे.

ही संयुक्त कारवाई गर्भलिंग निदान व बेकायदेशीर गर्भपात रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा भाग असून, अशा अनधिकृत क्रियाकलापांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासन सतर्क असल्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. संबंधित मेडिकलचा तपशीलवार अहवाल वरिष्ठ स्तरावर सादर करण्यात येणार असून, आवश्यक तेथे गुन्हा दाखल करण्याच्या दृष्टीनेही प्रक्रिया सुरू आहे. प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, कोणतीही संशयास्पद माहिती असल्यास तातडीने टोल-फ्री क्रमांक १०४ वर कळवावी, जेणेकरून अशा बेकायदेशीर कृत्यांवर वेळीच लगाम घालता येईल.

> प्राप्त तक्रारीनंतर आमचे पथक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांसह अकोट येथे गेले. तेथे पाठवलेल्या ग्राहकास संबंधित मेडिकल स्टोअरकडून काही गोळ्या देण्यात आल्या, ज्या पूर्णतः खुल्या स्वरूपात आणि केवळ कागदात गुंडाळलेल्या अवस्थेत होत्या. सदर गोळ्या आम्ही ताब्यात घेतल्या असून, त्यांचे नमुने फॉरेन्सिक तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठवण्यात येणार आहेत. तपास पूर्ण होईपर्यंत संबंधित मेडिकल स्टोअरवर आम्ही औषध विक्रीवर तात्पुरता प्रतिबंध घातला असून, चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुढील अंतिम कारवाई करण्यात येईल.
>
> **- अनिल माणिकराव,**
> सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, अकोला.

> गोपनीय माहितीच्या आधारे आम्ही प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी केली. तपासणीदरम्यान गर्भपात प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित विभागाला तातडीने माहिती देऊन फूड अँड ड्रग्स प्रशासनाच्या मदतीने संयुक्त कारवाई करण्यात आली.
>
> **- डॉ. तरंगतुषार वारे,** जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला.

## जिल्ह्यातील ५३१ सरपंचपदांच्या आरक्षणाची बुधवारी नव्याने सोडत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३ :** आगामी पाच वर्षांच्या कालावधीसाठी जिल्ह्यातील ५३१ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांचे प्रवर्गनिहाय आरक्षण गेल्या ६ मे रोजी निश्चित करण्यात आले होते. तथापि, राज्यातील सरपंचपदांचे प्रवर्गनिहाय आरक्षण नव्याने निश्चित करण्यात आल्याची अधिसूचना १३ जून रोजी शासनामार्फत प्रसिद्ध करण्यात आली. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी जिल्ह्यातील सरपंचपदांचे प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित केले आहे. त्यानुसार जिल्ह्यातील ग्रामपंचायतनिहाय सरपंचपदांच्या आरक्षणाची नव्याने सोडत येत्या ९ जुलै रोजी काढण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत यापूर्वी ५ मार्च २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार सरपंचपदांचे आरक्षण निश्चित करण्यात आले होते. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिकाप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने ६ मे २०२५ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरून, गेल्या ५ मार्च रोजीची अधिसूचना अधिक्रमित करून, पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी सरपंचपदांच्या प्रवर्गनिहाय आरक्षणाची अधिसूचना राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत १३ जून रोजी नव्याने प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील सरपंचपदांचे आरक्षण १५ जुलैपर्यंत निश्चित करण्याचा ग्रामविकास विभागाचा जिल्हाधिकारी आदेश कार्यालयाला प्राप्त झाला होता. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील ५३१ सरपंचपदांचे प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित केले आहे. त्यानुषंगाने जिल्ह्यातील संबंधित सरपंचपदांच्या ग्रामपंचायतनिहाय आरक्षणाची नव्याने सोडत येत्या ९ जुलै रोजी जिल्ह्यातील सातही तालुक्याच्या ठिकाणी काढण्यात येणार आहे.

### २६७ सरपंचपदे महिलांसाठी आरक्षित

यापूर्वी जिल्ह्यातील ५३१ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांचे प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार जिल्ह्यातील ग्रामपंचायतनिहाय सरपंचपदांची आरक्षण सोडत दोन महिन्यांपूर्वीच गेल्या ६ मे रोजी जिल्ह्यातील सातही तालुक्याच्या ठिकाणी तहसील कार्यालयांमार्फत काढण्यात आली होती. त्यामध्ये ग्रामपंचायत व प्रवर्गनिहाय सरपंचपदांचे आरक्षण निश्चित करण्यात आले होते. आता नव्याने जिल्ह्यातील सरपंचपदांची आरक्षण सोडत येत्या ९ जुलै रोजी काढण्यात येणार आहे.

## झुंज रंगली...



**दोन सांडांमध्ये चांगलीच झुंज रंगली होती. कुणीही माघार घ्यायला तयार नसल्याने रणपिसे नगरात ही झुंज बघण्यासाठी पादचारी, वाहनधारकांची एकच गर्दी जमली होती. (विठ्ठल महल्ले)**

## अकोल्यात येत्या तीन महिन्यांत 'एमआरआय' मशीन

### आ. साजिदखान पठाण यांच्या प्रश्नावर आरोग्यमंत्र्यांचे आश्वासन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३ :** जिल्हा सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे गेली अनेक वर्षे एमआरआय मशीन उपलब्ध नसल्याने रुग्णांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात आज विधिमंडळाच्या प्रश्नोत्तराच्या तासात पश्चिम अकोल्याचे आमदार साजिदखान पठाण यांनी संतप्त स्वरात सरकारला जाब विचारला.

सतत विचारलेल्या प्रश्नांवर जर सरकारने पावले उचलली नाहीत तर आम्ही हे प्रश्न विचारावे तरी कशाला? असा प्रश्न उपस्थित करत आ. पठाण यांनी आपल्या नाराजीचा स्पष्ट सूर दाखवला. त्यांनी यापूर्वीही याच विषयावर प्रश्न उपस्थित केला होता, त्यावर आरोग्य शिक्षण मंत्री ना. हसन मुश्रीफ यांनी एमआरआय मशीन देण्याचे आश्वासन दिले होते; मात्र चार महिन्यांनंतरही कुठलीही ठोस कारवाई झाली नसल्याने आ. पठाण यांनी सभागृहात संताप व्यक्त केला. या मुद्द्यावर हस्तक्षेप करत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अर्थमंत्री डीपीसी (जिल्हास्तरीय नियोजन समिती) निधीतून यासाठी काही निधी राखीव ठेवण्यास तयार असल्याचे स्पष्ट केले. यावर आरोग्यमंत्री हसन मुश्रीफ यांनी पुढील तीन महिन्यांत अकोल्यात एमआरआय मशीन उपलब्ध करून देण्यात येईल, असे जाहीर करत पुढील अधिवेशनात या प्रश्नाची गरज भासणार नाही, अशी ग्वाही दिली.

## रामनगरमधील अनधिकृत बांधकामावर चालला महापालिकेचा हातोडा!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३ :** शहरातील वाढत्या अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी अकोला महानगरपालिका प्रशासनाने पुन्हा एकदा कारवाईचा बडगा उगारला आहे. गुरुवारी ३ जुलै रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार पूर्व झोन कार्यालय अंतर्गत येणाऱ्या रामनगर भागातील अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

श्रीमती ममता अन्वर सुर्या यांचे घर हे मंजूर नकाश्यापेक्षा अधिक बांधकाम करून वाढवले गेले होते, तसेच डॉ. राऊळ यांच्या घरासमोरील समास अंतरात अनधिकृतपणे भिंती व संरचना उभारण्यात आल्या होत्या. याशिवाय, त्या परिसरातील वाणिज्य वापराच्या इमारतींच्या समोर रस्त्यावर अतिक्रमण करून बांधकाम करण्यात आले होते. अशी माहिती मनपा प्रशासनाने दिली आहे, या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेत मनपाच्या पूर्व झोन कार्यालय, नगररचना विभाग आणि अतिक्रमण विभाग यांच्या पथकाने सदर ठिकाणी कारवाई केली.

ही कारवाई सहायक आयुक्त राजेश सरप, सहायक नगररचनाकार संदीप गावंडे, सहायक अतिक्रमण अधिकारी चंद्रशेखर इंगळे, तसेच कनिष्ठ अभियंते राहुल राऊत व अक्षय बोर्डे यांच्या उपस्थितीत पार पडली.

## पोलीस वसाहत असुरक्षित; मग शहर कसे सुरक्षित राहील?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३ :** अकोला शहरातील निमवाडी पोलीस वसाहतीमध्ये राहणाऱ्या महिला व महिला कर्मचारी यांच्यावर दि. २९ जून २०२५ रोजी रात्री १० ते ११ वाजण्याच्या सुमारास बाहेरून आलेल्या काही अनोळखी महिलांनी व पुरुषांनी एकत्रितपणे शिवीगाळ, धमकी, मारहाण व अश्लील वर्तन करत धुमाकूळ घातल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे वसाहतीतील महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधितांनी खदान पोलीस स्टेशनमार्फत संबंधित अनोळखी आरोपींविरुद्ध तक्रार अर्ज सादर केला आहे.

या तक्रारीनुसार, सुमारे १५१६ महिला पोलीस वसाहतीच्या मैदानात आपापल्या मुलांना खेळवित असताना ४५ अनोळखी महिला व पुरुष विनापरवाना पोलीस वसाहतीत प्रवेश करून महिलांवर अत्यंत अपमानास्पद, गलीच्छ आणि जातीवाचक शिवीगाळ करत धमकी देऊ लागले. त्यांनी महिलांवर अश्लील टिप्पणी केली. महिला कर्मचाऱ्यांनी त्यांना परवानगीशिवाय आत न येण्याची विनंती केली असता, त्या महिलांनी उद्धट वर्तन करत ''ये क्या तुम्हारे बाप की जगह है क्या?'' असे म्हणत उग्र प्रतिक्रिया दिली. याच वेळी त्यांनी फोन करून बाहेरून आणखी दोन ते तीन पुरुषांना पाचारण केले. त्यांनी मैदानात प्रवेश करत महिलांवर हल्ला चढवला. एका महिला कर्मचाऱ्याच्या कानशिलात मारण्याचा, दुसऱ्याच्या डोक्याचे केस ओढण्याचा प्रकार तर घडला. यापैकी एका पुरुषाने एका महिला कर्मचाऱ्याचा हात धरून तिच्यासोबत लज्जास्पद कृत्य केले. गलीच्छ, अपमानास्पद भाषा वापरत त्यांनी महिलांना मानसिक त्रास दिला. या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता, वसाहतीतील महिलांनी खदान पोलीस ठाण्यात लेखी अर्जाद्वारे तक्रार सादर केली असून, जर या व्यक्तींनी पुन्हा वसाहतीत प्रवेश करून त्रास दिला किंवा महिलांना, त्यांच्या मुलांना शारीरिक इजा पोहोचवली, तर संपूर्ण जबाबदारी या अनोळखी व्यक्तींवर राहील, असे महिलांनी नमूद केले आहे. या गंभीर प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधित महिलांवर आणि पुरुषांवर कायदेशीर कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही आणि पोलीस वसाहतीतील महिला व त्यांच्या कुटुंबीयांना सुरक्षित वातावरण मिळावे, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## प्रतिबंधित प्लास्टिक साठ्यावर धडक कारवाई; १४,५०० रुपयांचा दंड

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३ :** केंद्र शासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार अकोला महानगरपालिकेने प्रतिबंधित प्लास्टिक विरोधात कारवाईस सुरुवात केली आहे. मनपा आयुक्त व प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशाने व उपायुक्त गीता ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली झोननिहाय कारवाई करण्यात येत आहे. गुरुवारी ३ जुलै रोजी पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण झोनमध्ये महत्त्वाच्या बाजारपेठांमध्ये ही तपासणी मोहीम राबविण्यात आली. पूर्व झोनमधील मुख्य बाजार पेठ, पश्चिम झोनमधील जयहिंद चौक व किरणा बाजार, उत्तर झोनमधील टिळक रोड, कोठडी बाजार आणि जैन मंदिर रोड, तर दक्षिण झोनमधील मुख्य बाजारपेठ येथे दुकानांची तपासणी करण्यात आली. या कारवाईदरम्यान काही व्यापाऱ्यांकडे आणि फळ-भाजी विक्रेत्यांकडे बंदी घालण्यात आलेल्या कॅरी बॅग, प्लास्टिक कोटेड वस्तू, तसेच थर्माकोल व एकल उपयोग प्लास्टिकचा साठा आढळून आला. संबंधितांवर मनपाने कारवाई करत १४,५०० रुपयांचा एकूण दंड वसूल केला असून, हा साठा जप्त करण्यात आला आहे.

## विषारी तांदळाने निसर्ग हानी: आळवनी पर्याय शेतकऱ्यांसाठी ठरणार दुहेरी फायद्याचा!

### वाण्यांवर उपाय हवाच... पण पक्ष्यांचा बळी नको!

। विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. ३ :** शेतीमधील नुकसान टाळण्यासाठी शेतकरी अनेक उपाययोजना करतात. त्यातच वाण्यांचा (पाखरांचा) प्रकोप टाळण्यासाठी काही शेतकरी लॅम्बडासीहॅलोथ्रिन ५% ई.सी. हे अत्यंत विषारी कीटकनाशक तांदळावर फवारून ते तांदूळ शेतात टाकतात; परंतु या चुकीच्या पद्धतीमुळे फक्त वाण्यांचा मृत्यू होत नाही, तर हजारो निरुपद्रवी पक्ष्यांचाही नाहक बळी जात आहे.

या विषबाधित तांदळाचे दाणे फक्त वाणीच नाही, तर कबूतर, चिमण्या, सुतारपक्षी, रानकोंबड्या आणि इतर अनेक प्रकारचे पक्षीही खातात. परिणामी त्यांना तीव्र विषबाधा होते आणि त्यांचा मृत्यू होतो. सध्या अनेक ठिकाणी मृत पक्ष्यांची संख्या वाढत असल्याची नोंद वनविभागाकडूनही घेण्यात आली आहे.

तज्ज्ञांचा सल्ला : फवारणीचा पर्याय स्वीकारा.

या समस्येवर कृषी तज्ज्ञांनी एक पर्यायी मार्ग सुचवला आहे तो म्हणजे शेतात तांदूळ न फेकता थेट लॅम्बडासीहॅलोथ्रिन



५% ई.सी. औषधाची फवारणी करणे. या फवारणीमुळे केवळ वाण्यांचा प्रकोप कमी होणार नाही, तर शेतातील खोडकिडा, अळी, तुडतुडे यासारख्या अनेक किडींवरही नियंत्रण मिळेल. त्यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी फायदा मिळू शकतो. शेती आणि निसर्ग हे परस्परावलंबी आहेत. एकाचे रक्षण केल्याशिवाय दुसरे टिकू शकत नाही. म्हणूनच, निसर्ग संवर्धन ही केवळ एक जबाबदारी नसून, ती आपली शेती टिकवण्याची एक प्रभावी उपाययोजना आहे, हे शेतकऱ्यांनी लक्षात घ्यावे. यासंदर्भात कृषी विभागाने आणि पर्यावरण विभागाने जागरूकता मोहीम राबवावी, अशीही मागणी पुढे येत आहे. ''आयक्यू'' माहितीवर अनेकदा शेतकरी अंतिम निर्णय घाईत घेतात आणि त्यामध्ये अति प्रमाणात कीटकनाशकांचा वापर करतात. परिणामी, कीटक मरतात; पण निसर्गातील इतर उपयुक्त सूक्ष्मजीव, कीटक आणि पर्यावरणीय संतुलन यावरही गंभीर परिणाम होतो. या दुहेरी संकटातून शेतकऱ्याला वाचविण्यासाठी योग्य बियाण्यांची निवड, हवामान माहितीवर आधारित पेरणीचा कालावधी, तसेच शास्त्रशुद्ध कीड व्यवस्थापन पद्धतींचे पालन करणे अत्यावश्यक बनले आहे.

**निसर्ग संवर्धनाची गरज**

शेतकऱ्यांना आज पिकांचे संरक्षण करताना हवामान बदल, पाऊस, कीड, रोगराई अशा अनेक नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागतो, हे खरेच; पण निसर्गातील जैवविविधता टिकवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण, हीच जैवविविधता शेतीस पोषक ठरते. चिमण्या, सुतारपक्षी हे अळी, कीड खाऊन पिकांचे संरक्षण करतात, हे विसरता कामा नये.

**शेतकऱ्यांसाठी आवाहन**

त्यामुळे विषारी तांदूळ शेतात टाकणे थांबवून, फवारणीच्या मार्गाचा अवलंब करावा, असे तज्ज्ञांचे स्पष्ट मत आहे. यामुळे शेतकरी पिकाचे संरक्षणही करू शकतील आणि निसर्गाला हानी न पोहोचवता पर्यावरणाचा समतोलही राखू शकतील.

#### शेतकऱ्यांची दुहेरी कोंडी

सध्या राज्यभरात शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत संकटमय बनली आहे. एकीकडे पावसाचा लहरीपणा, तर दुसरीकडे बोगस बियाण्यांची खुलेआम विक्री यामुळे शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आलेला आहे. शेती हा त्याचा जीवनाधार असल्याने, कितीही कर्जबाजारी होऊन का होईना, शेतकरी खरीप पेरणीसाठी तयारी करतो, नव्या आशेने हिरवे स्वप्न रंगवता; मात्र दुर्दैवाने पेरणीनंतर अंकुर अवस्थेतच वाण्यासारख्या सूक्ष्म कीटकांद्वारे पिकांवर अचानक हल्ला चढतो. परिणामी, पिकांची वाढ खुंटते, पीक वाळते आणि संपूर्ण मेहनत वाया जाते. यामुळे शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढते. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी शेतकरी अनेकदा वेगवेगळ्या सल्ल्यावर किंवा तज्ज्ञांवर अवलंबून राहतो.

> दरवर्षी शेतकऱ्यांवर संकटांचे सावट गडद होत चालले आहे. कधी निसर्गाचा कोप, तर कधी बाजारात शेतमालाला न मिळणारा भाव या सर्वांचा परिणाम पिकाच्या उत्पन्नावर होत असतो. त्यातच रोगराई, कीडप्रकोप हे नेहमीचेच संकट बनले आहे. यावर्षी मात्र 'वाणा' या कीटकाने अक्षरशः झोप उडवली आहे. मी स्वतः यंदा ३५ एकर क्षेत्रावर सोयाबीन आणि तुरीची लागवड केली आहे. त्यापैकी सुमारे ५ ते ६ एकरांमध्ये वाण्यांचा इतका मोठा प्रादुर्भाव झाला आहे की, पिकांचे अंकुरच फस्त झाले आहेत. अशीच अवस्था परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतात दिसून येत आहे.
>
> **- डिगंबर काकड,**
> प्रगतिशील शेतकरी, पुनोती खुर्द .

> वाण्याच्या प्रकोपाबाबत कृषी विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या खरीप पूर्व मेळाव्यादरम्यान शेतकऱ्यांना प्रतिबंधक उपाययोजना व कीड नियंत्रणाची माहिती देण्यात आली होती. सध्या असलेले हवामान हे वाण्याच्या प्रजनन व प्रसारासाठी अत्यंत पोषक ठरत असल्याने, यंदा वाण्याचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी क्लोरोपायरिफॉस २०% ई.सी. हे कीटकनाशक १० लिटर पाण्यात ४० मिलीलीटर प्रमाणात मिसळून आळवनि करावी. विशेषतः ज्या क्षेत्रात वाण्याचा प्रकोप अधिक आहे, त्या ठिकाणी याचा तातडीने वापर करणे आवश्यक आहे; मात्र काही शेतकरी कीटकनाशकांचा वापर ढोबळमानाने किंवा अपुऱ्या माहितीवर आधारित करीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे पर्यावरणास हानी पोहोचण्याची शक्यता वाढते, तसेच उपयुक्त कीटक व निसर्गातील जैवसाखळीवरही त्याचे प्रतिकूल परिणाम होतात. त्यामुळे शास्त्रशुद्ध व समतोल उपाययोजनांचा वापर करणे हेच पर्याय आहे.
>
> **- डॉ. डी.बी. उंदिरवाडे,** विभाग प्रमुख कीटकशास्त्र विभाग,
> डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला.

अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा
बुलडाणा, शुक्रवार दि.४ जुलै २०२५ www.ajinkyabharat.com


## थोडक्यात

### पावसाची ओढ, जीवाला घोर: शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण!

**नरवेल :** जून महिना संपला जुलै महिना सुरू झाला तरीही काही भागात भरपूर प्रमाणात पाऊस झाला तर काही ठिकाणी अल्प प्रमाणात पाऊस पडत आहे. पावसाळा सुरू होऊन एक महिना झाला तरीही नरवेल गावात समाधान कारक पिकास योग्य प्रमाणात पाऊस पडत नाही. त्या शेतकरी उशिरा पेरणी करून छातीवर दगड ठेवून शेतकरी चड्यावर मूठ धरली आहे. मोला महागाचे बियाणे खत मातीत मिसळून एक प्रकारे जुगारच खेळ खेळून नशीब आजमावन्याचे शेतकरी प्रयत करत आहेत परंतु किती दिवस झाले तरीही नरवेल गाव शिवारात दमदार पाऊस पडत नाही ज्याचे कडे पाणी सुविधा उपलब्ध आहे ते आपल्या शेती स्पीकलर किंवा ठिबक सिंचन पद्धतीने देत आहे. या वर्षी नेहमी पेक्षा जास्त प्रमाणात पाऊस आहे असे म्हटले जात असल्याचे शेतकरी भरपूर प्रमाणात खत बी जमिनी मध्ये टाकले आहेत. परिणामी आता वरती पाहण्याची वेळ आली आहे. पाऊस पडत आहे फक्त सडा शिपल्यागत तेवढ्या पिकाचे नुकसान जास्त प्रमाणात होत आहे. रानटी जनावर हे जमिनीतून बी उकरून शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहे.

### युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर




**खामगाव :** बुलडाणा जिल्हा युवक काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष व महासचिव पदाधिकाऱ्यांच्या नियुत्या दि. २ जुलै रोजी जाहीर करण्यात आल्या आहेत. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे महासचिव मुकूल वासनिक, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, युवक काँग्रेसचे महाराष्ट्र कार्यकारी अध्यक्ष शिवराज मोरे, बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष माजी आमदार राहुल बोंद्रे यांच्या मान्यतेने युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष अनिकेत मापारी यांनी आज युवक काँग्रेस बुलढाणा जिल्हा उपाध्यक्षपदी अमित तायडे, जिल्हा महासचिवपदी वैभवसिंह पवार, गणेश वानखडे, विजय वाघ, सैय्यद जुबेर सैय्यद नसु, शुभम लांडे, गोविंदा वाघ यांची नियुक्ती केली आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांना खामगाव येथील काँग्रेस पक्षाच्या जनसेवा कार्यालयात नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले व त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी खामगाव तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहाण, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, गौतम गवई, स्वप्निल ठाकरे, किशोरआप्पा भोसले, सोपान वाकुडकर, सचिन जयस्वाल, सौरभ रिछारिया, छोटु पाटील, अनिल ठाकरे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**खामगाव :** पिंपळगाव राजा परिसरातील पांढरीचे शेत येथे एका नव्याने बांधलेल्या घराच्या जिन्यात १६ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मृतकाचे नाव विनायक महादेव राउत (वय १६ वर्ष जात माळी, रा. बसाडी बु., ता. नांदरा) असे आहे. याप्रकरणी त्याचा नातेवाईक संतोष बळीराम राउत यांनी खबर दिली आहे. दि. ०१ जुलै रोजी सायंकाळी ३.१५ वा. पूर्वी हा प्रकार घडला असून फिर्यादी हे खामगाव येथे काम करून शेताजवळ आले असता त्यांना चुलत भाऊ दिपक राउत याने माहिती दिली की विनायकने शेतामध्ये बांधलेल्या नव्या घराच्या जिन्यात चल्लांला दोरीने गळफास घेतला आहे. यावरून पिंपळगाव राजा पोलीस ठाण्यात कायम मर्ग क्र १८/२०२५, कलम १९४ २०२३ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. घटनास्थळी यांना पंचनामा केला असून पुढील तपास करीत आहेत.

### उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा तालुका शिबिर दौरा जाहीर

**बुलडाणा :** जिल्ह्यातील मोटार वाहन चालका, मालकाच्या सोईसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मोटार वाहन निरिक्षक यांचा जुलै ते डिसेंबर दरम्यान मासिक शिबीर दौरा जाहीर करण्यात आला आहे.या दौऱ्यात वाहन कर वसुली, मोटार वाहन नोंदणी, वाहन तपासणी, वाहन चालक अनुज्ञप्ती विषयी कामकाज केले जाणार आहे. शिबिर दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे : जुलै महिन्यात मेहकर येथे ४ व २१, देऊळगाव राजा येथे ८ व २३, लोणार येथे ११ व २५, चिखली १५ व सिंदखेड राजा येथे १७ रोजी तर ऑगस्ट महिन्यात मेहकर येथे ४ व २०, देऊळगाव राजा येथे ६ व २५, लोणार येथे ११ व २८, चिखली येथे १३ व सिंदखेड राजा येथे १८ ऑगस्ट रोजी होणार आहे. अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# ३० खाटांच्या रुग्णालयाचा जन आरोग्य योजनेत होणार समावेश

## पॅनलवर समावेशासाठी रुग्णालयांनी ऑनलाइन अर्ज करावा- जिल्हा शल्य चिकित्सक डॉ दत्तात्रय बिरासदार यांचे आवाहन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.३ :** जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील ३० पेक्षा जास्त खाटा असलेल्या रुग्णालयांचा तसेच एकल विशेषता असलेल्या १० खाटांच्या रुग्णालयांचा एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या पॅनलवर समावेश करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पॅनलवर समावेशासाठी इच्छूक रुग्णालयांनी संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.दत्तात्रय बिरासदार यांनी केले आहे.

या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळेल आणि जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम होतील.

**पात्र एकल विशेषता १० खाटांचे रुग्णालये:** नाक, कान, घसा, नेत्रविकार, अस्थिव्यंग आणि पोलिट्रॉमा, भाजणे, बालरोग शस्त्रक्रिया, कर्करोग उपचार युनिट्स, नवजात आणि बालरोग वैद्यकीय व्यवस्थापन युनिट्स, हिमोडायलिसिस मूत्रपिंडशास्त्र युनिट्स

**योजनांचा उद्देश**

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही केंद्र सरकारची ही योजना देशभरातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार प्रदान करते. यामध्ये १३५६ प्रकारच्या गंभीर आजार, शस्त्रक्रिया आणि रुग्णालयात दाखल होण्याच्या खर्चाचा समावेश आहे.

महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना ही महाराष्ट्र सरकारची ही योजना राज्यातील पात्र लाभार्थ्यांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार देते. यामध्ये १३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया आणि विशेष उपचारांचा समावेश आहे.

**पात्रता निकष**

३० पेक्षा जास्त खाटा असलेली रुग्णालये आणि वर नमूद केलेल्या विशेषता असलेली १० खाटांची एकल विशेषता रुग्णालये, जी राष्ट्रीय स्वास्थ्य प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य आरोग्य हमी सोसायटी निकषांची पूर्तता करतील, ती एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनांच्या पॅनलवर समावेशासाठी पात्र ठरतील. यामध्ये आधुनिक वैद्यकीय उपकरणे, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी आणि उच्च दर्जाची रुग्णसेवा यांचा समावेश आहे.

**लाभ:** पॅनलवरील रुग्णालयांमध्ये या दोन्ही योजनांतर्गत लाभार्थ्यांना मोफत उपचार मिळतील. यामुळे गंभीर आजारांवरील उपचार परवडणारे होतील आणि रुग्णांचे आर्थिक भार कमी होईल.

**अर्ज प्रक्रिया:** रुग्णालयांनी पॅनलवर समावेशासाठी संकेतस्थळांवर ओनलाइन अर्ज करावा. तसेच, बुलढाणा जिल्हा रुग्णालय जिल्हा समन्वयक किंवा जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याशी संपर्क साधून अधिक माहिती मिळवता येईल. बुलढाणा जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभाग सर्व पात्र रुग्णालयांना, मग ते ३० पेक्षा जास्त खाटांचे असोत किंवा १० खाटांचे एकल विशेषला रुग्णालये असोत, एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी किंवा पॅनलवर समावेशासाठी, कृपया बुलढाणा जिल्हा रुग्णालय (भोंडे सरकार चौक, बुलढाणा, दूरध्वनी क्रमांक ७३०४५८८०१४ यावर संपर्क साधावा जिल्ह्यातील रुग्णालयांनी पॅनलवर समावेशासाठी स्वतः पात्रता तपासावी आणि संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

## नांदुरा-जळगाव रोडवर गांजा जप्त; आरोपी अटकेत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**नांदुरा दि.३:** नांदुरा जळगाव जामोद रोडवरील लक्ष्मी नगराजवळ गांजा घेवून जात असलेल्या मुक्ताईनगर तालुक्यातील तरुणाला नांदुरा पोलिसांनी रंगेहात पकडून त्याच्या जवळून ५.२६३ किलो गांजा व साहित्य असा एकूण ८६ हजार २५० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई नांदुरा पोलिसांनी २ जुलै रोजी रात्री ३ वाजताच्या सुमारास केली आहे. कुऱ्हा काकोडा ता. मुक्ताईनगर येथील योगेश सुरेश चौधरी याच्या ताब्यात उपरोक्त गांजा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यामुळे पोलिसांनी नांदुरा ते जळगाव जामोद रोडवरील उमेश गणोदे यांच्या बांधकाम जागेच्या बाजुला असलेल्या लक्ष्मीनगर लेआऊट नजीक छापा टाकला. यावेळी योगेशला गांजासह ताब्यात घेतले. सदर गांजाची किंमत ७८ हजार ७५० रुपये व मोबाईल अंदाजे किंमत ७ हजार रुपये, साहित्या असा एकूण ८६ हजार २५० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत सरकारतर्फे नांदुरा पोस्टेचे सहाय्यक फौजदार मिलींद जवंजाळ मिलींद जवंजाळ यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी आरोपी योगेश विरुध्द कलम गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मानवी मेंदुवर परीणाम करणारे पदार्थ अधिनियम एनडीपीएस नुसार गुन्हा दाखल केला.

## विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवली पाहिजे- डॉ.खेडेकर



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**दे.मही दि.३ :** यशाला कोणताही शॉर्टकट नसतो यश मिळवण्यासाठी जीवनात जिद्द चिकाटी व सातत्या असणे आवश्यक आहे शालेय विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर बंद करून आपल्या आवडत्याा क्षेत्रात यश संपादन करावे त्यााचबरोबर आपल्या आई वडिलांच्या कष्टाची जान ठेवावी असे मार्गदर्शन सहकार विद्या मंदिर येथे मंगळवार रोजी डॉक्टर डे च्या निमित्ताने बालरोग तज्ञ शिवशंकर खेडेकर यांनी केले सहकार विद्या मंदिर येथे डॉक्टर डे साजरा करण्यात आलाफ

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शिवशंकर खेडेकर, तर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच ज्योत्सनाताई वसुदेव शिंगणे ,रमेश चंद बेगानी, डॉ जे पी ताठे, डॉक्टर मनोहर शिगने, डॉ सुभाष शिंगणे ,डॉ महेश दंदाले, डॉ.भूषण वानखेडे, डॉ. किशोर गीते, डॉ. सचीन सोनसळे डॉ .विजय खेडेकर सचिन खरात, राम प-हाड यांची प्रमुख उपस्थिती होती डॉक्टर असोसिएशनच्या वतीने डॉक्टर डे च्या निमित्ताने निबंध स्पर्धा वृक्षारोपण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार असे विविध कार्यक्रमांचे आयोजन सहकार विद्या मंदिर येथे करण्यात आले. तसेच डॉक्टर असोसिएशनच्या वतीने स्वर्गीय डॉक्टर शरद काकडे यांच्या स्मृत्यर्थ व ''डॉक्टर डे '' च्या निमित्ताने सेवा गौरव पुरस्कार डॉ.रमेशचंद बेगानी यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

## आषाढी एकादशी सोहळ्यानिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांचे काँग्रेसकडून स्वागत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.३ :** आषाढी एकादशी सोहळ्या निमित्त शेकडो वारकरी व भाविकांना घेवून विठ्ठल दर्शन एक्स्प्रेसची पहिली फेरी आज दि.३ जुलै रोजी खामगाव रेल्वे स्थानकावरून पंढरपूरकडे रवाना झाली. यावेळी खामगाव तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने वारकऱ्यांचे भक्तीभावात स्वागत करण्यात आले.

सर्वप्रथम टाळ, मृदंगाच्या गजरात वारकरी दिंडी काढून विठ्ठलनामाचा गजर करण्यात आला. त्यानंतर पंढरपूर जात आलेल्या वारकरी, भाविक व जोडप्यांचा यथोचित सत्कार करण्यात येवून त्यांना फराळाचे वितरण करण्यात आले तसेच सर्व भाविक भक्तांचा प्रवास सुखाचा होवो व सर्वांच्या मनोकामना पुर्ण होवू दे अशी प्रार्थना विठुरायाला करण्यात आली. यावेळी खामगाव विधानसभा मतदार संघ समन्वयक ज्ञानेश्वरदादा पाटील, राजाराम काळने, तेजेंद्रसिंह चौहान, अजय तायडे, गौतम गवई, स्वप्निल ठाकरे, ज्ञानेश्वर शेजोळे, किशोरआप्पा भोसले, मो. वसीमोद्दीन, शे. जुल्कर शेख चांद, अतुल सिरसाट, श्रीमती सीमाताई ठाकरे, सरबजीतकौर सलुजा, सौ.माया तिवारी, सौ.इशा गुप्ता, जिल्हा सरचिटणीस गजाननराव वाकूडकर, अनंतराव ताठे, पांडुरंग रखोंडे, मधुकर चोपडे, श्रीकृष्ण मोरे, अमित तायडे, गजाननराव ढोरे, सचिन जैस्वाल, कैलास साबे, शुभम लांडे, साहिलबाप्पू देशमुख, सौरभ रिछारिया, रामदास गावंडे, अशफाक भाई, छोटू राजपूत यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




## मोरे यांना राज्यस्तरीय बहुजनरत्न जीवन गौरव पुरस्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**सिंदखेडराजा दि.३ :** बहुजन महापुरुष यांच्या विचारावर विविध क्षेत्रात तसेच पत्रकार कार्यक्षेत्रामध्ये खंबीरपणे उत्तुंग कामगिरी करून बहुजन समाजाचे कल्याणासाठी उल्लेखनिय कार्य करणारे पत्रकार प्रताप मोरे यांची बहुजनरत जिवन गौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आले आहे असे प्रसिध्दी पत्रकाद्वारे संस्थेचे संपादक प्रशांत डोंगरदिवे यांनी कळविले. .

ऋणानुबंध समाज विकास संस्था द्वारा संचालित तुकाराम आश्रय वृद्धाश्रम, सुलोचना माहेरघर (महिला आश्रम), लताईबाई अनाथालय, भोकर ता. चिखली जि. बुलढाणा आयोजित मान कर्तृत्वाचा.. सन्मान नेतृत्वाचा राज्यस्तरीय बहुजन रत सन्मान सोहळा २०२५ बहुजन महापुरुष यांच्या विचारावर विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तीला दिला जातो. आपण बहुजन चळवळीत आत्मविश्वासाने आणि जिद्दीने आपले ध्येय साध्य करीत आहात. आपल्या कार्यक्षेत्रामध्ये खंबीरपणे उत्तुंग कामगिरी करून बहुजन समाजाचे कल्याणासाठी सतत धडपड करत आहात याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. संघर्षातून मिळणारे यश मोठे आहे. यामुळे आपली सदर राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली आहे. तसेच लोकप्रतिनिधी, जेष्ठ पत्रकार, शासकीय अधिकारी व जेष्ठ सामाजिक नेते यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा दि. ०६ जुलै २०२५ शिवाजी विज्ञान वा कला महाविद्यालय (श्री शिवाजी सिनियर कॉलेज) चिखली जि. बुलडाणा येथे संपन्न होणार आहे. या राज्यस्तरीय बहुजनरत जिवन गौरव पुरस्काराने पत्रकार प्रताप मोरे हे सन्मानित होणार असल्याने परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

## नगरसेवक चवरे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी उसळला जनसागर!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि.३** कधी आयुष्याच्या संघर्षात एक हात पुढे करून मदतीसाठी उभे राहिलेले 'बंडूभाऊ', आज हजारो हातांनी आशीर्वाद घेणारे झालेत. त्यांच्या चेहऱ्यावर अजूनही तोच साधेपणा आहे, डोळ्यात तीच माणुसकी आहे, आणि हृदयात लोकांसाठी झपाटून काम करण्याची तीच जिद्द आहे.

मलकापूर नगरपरिषदेचे नगरसेवक सुहास चवरे (बंडुभाऊ) यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जो प्रेमाचा महापूर उसळला, तो केवळ एक राजकीय कार्यकर्त्याचा गौरव नव्हता, तर एका सत्यानिष्ठ, संवेदनशील आणि लोकाभिमुख व्यक्तिमत्वाच्या जीवनमूल्यांचा सन्मान होता. बंडुभाऊ हे माणुसकीचे प्रतीक म्हणून ओळखले जातात. गरजवंतांच्या मदतीसाठी सदैव तत्पर, तरुणांमध्ये प्रेरणास्थान, आणि शहराच्या विकासासाठी झपाटलेले नेतृत्व अशी त्यांची सर्वसामान्य लोकांमध्ये प्रतिमा आहे. युवक, महिला, व्यापारी, वयोवृद्ध नागरिक साऱ्यांनी मनापासून वाढदिवसाच्या शुभेच्छा देत, त्यांचं पुढचं जीवन आरोग्यदायी व यशस्वी होवो अशी प्रार्थना केली.

## तालुका क्रीडा मैदानाला संरक्षक भिंतीसाठी निधी मंजूर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.३ :** शेगाव शहरात जिल्हा क्रीडा विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या तालुका क्रीडा संकूलाच्या मैदानामध्ये करण्यात आलेले अतिक्रमण काढून त्या ठिकाणी काटेरी तारेचे कुंपण बांधण्यात आले होते. परंतु आता जिल्हा नियोजन समितीकडून त्यावर संरक्षक भिंत उभारण्याकरिता दीड कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे.

सदर वादग्रस्त असलेल्या जागेची सुरक्षा करणे तालुका क्रीडा विभागाला सोपे जाणार आहे शेगाव शहरातील मुरारका हायस्कूलला लागून असलेल्या मैदानावर तालुका क्रीडा विभागाने त्यावर धावपट्टी, आणि इंडोअर गेम खेळण्याकरता रूम सुद्धा बांधण्यात आल्या होत्या. परंतु त्यानंतर शासनाकडून या क्रीडा मैदानाला विकसित करण्याकरता कोणताही निधी न मिळाल्याने सदर मैदान हे त्याा काळात शासनाकडून दिलेल्या सिल्वर पॅकेज पर्यंत मर्यादित होते आणि अनेक वर्षापासून ते तशाच स्वरूपात असल्याने त्याा ठिकाणी जवळपास १९२ अतिक्रमणधारकांनी आपली घरे बांधली होती आणि त्याालाही अनेक वर्ष झाल्याने सदर मैदानावरील अतिक्रमण काढणे हा मुद्दा अतिशय गंभीर स्वरूपाचा झाला होता. परंतु त्याा संदर्भात शासनाने कठोर भूमिका घेत ४ मार्च २०२५ मध्ये या मैदानावर असलेले संपूर्ण अतिक्रमण पोलीस प्रशासनाच्या मदतीने काढले व त्याा ठिकाणी काटेरी तारेचे कुंपण आणि स्मशानभूमी च्या बाजूने असणाऱ्या संरक्षक भिंत असे मिळून कुंपण बांधलेले आहे. परंतु या ठिकाणाहून काढलेल्या अतिक्रमण धारकापैकी काही लोक या काटेरी तारेचे कुंपण आणि संरक्षण भिंतीला कापण्याचे आणि तोडण्याचे काम करीत असल्याचे निदर्शनास आल्याने तालुका क्रीडा अधिकारी यांनी शेगाव पोलीस स्टेशनला ६ मे २०२५ रोजी शेगाव पोलीस स्टेशनला तक्रार सुद्धा करण्यात आली होती. त्याामुळे या क्रीडा मैदानावर पुन्हा अतिक्रमण होते की काय असा प्रश्न उपस्थित झाला होता. या गोष्टीची दखल घेऊन जिल्हा नियोजन मंडळाकडून या मैदानाला संरक्षक भिंत बांधण्याकरता २० मे २०२५ ला दीड कोटी रुपये ची मंजुरात देण्यात आल्याने आणि त्यााला प्रशासकीय मान्यता ही मिळाल्याने या मैदानाला लवकरच संरक्षक भिंत उभारण्याचे काम करण्यात येणार आहे.

## नि: स्वार्थी समाजसेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांना जपणे काळाची गरज - ॲड.शेळके

### तरुणाईच्या कार्यगौरव पुरस्काराचे थाटात वितरण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.३ :** लोक भूमिका घेत नाही.कोणतीही असो, डावी की उजवी... या बाजूने की त्याा बाजूने, पण भूमिका घेतली पाहिजे. भूमिका न घेणारे लोक प्रसंगी घातक ठरले आहे. सुनील सपकाळ यांनी सामाजिक भूमिका घेत दीर्घकाळ कार्य केले. निस्वार्थ भावनेने समाजसेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांची मुळातच कमी आहे. जे आहेत त्यांना जपणे आपली सामाजिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन शिवसेना राज्य प्रवक्त्याा जयश्रीताई शेळके यांनी केले.

सामाजिक कार्यकर्ते सुनील सपकाळ यांना तरुणाई फाउंडेशन च्या वतीने घोषित करण्यात आलेल्या कार्यगौरव पुरस्काराचे वितरण जिजाऊंचे तेरावे वंशज शिवाजीराजे जाधव,पत्रकार गणेश निकम, कैलास राऊत यांच्या हस्ते एक जुलै रोजी देशमुख गढी हातेडी या ठिकाणी आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी राजे जाधव होते. तर शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, भाऊसाहेब शेळके, जिल्हा बँकेचे सीईओ डॉ.अशोकराव खरात, डॉ. अरविंद कोलते,प्रा. डी एस लहाने, मुक्तारसिंग भाऊ राजपूत,बाबासाहेब भोंडे, पी डी सपकाळ, सदानंद देशमुख,कर्नल जतकर,डॉ. शोन चिंचोले,माजी सभापती दिलीपराव जाधव, एडवोकेट जयसिंगराजे, डॉ.गजानन पडघन, डॉ. विकास बाहेकर,अनंत शिरसाट,साहित्यिाक सुरेश साबळे, शाहिनाताई पठाण ,नंदिनी टरपे, पद्माताई लांजेवार,पत्रकार संदीप वानखेडे,-गणेश उबरहंडे,अमोल रिंढे,सुजित देशमुख,अनिल गाढे,विजय घ्याल, मोहम्मद सोफियान आदी उपस्थित होते.




जिल्ह्यात विशेष सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना जिल्हा भूषण व कार्य भूषण पुरस्कार तरुणाई फाउंडेशन देऊळगाव मही च्या वतीने दरवर्षी देण्यात येतो.यावर्षी साठी सुनील सपकाळ यांची निवड करण्यात आली होती. सत्काराला उत्तर देताना सुनील सपकाळ यांनी कार्य गौरव मिळाल्याबद्दल आभार व्यक्त केले. चांगल्या गोष्टीच्या पाठीशी उभे राहणे, चांगल्या विचारांना बळ देणे हे विचार बुलढाणा जिल्ह्यात आणि शहरांमध्ये आजही तेवत असल्याचे ते म्हणाले. त्याानंतर मान्यवरांच्या हस्ते कार्य गौरव पुरस्काराचे थाटात वितरण करण्यात आले. यावेळी शहरातून विविध क्षेत्रातील नामवंत मंडळी आवर्जून उपस्थित झाली होती.

अजिंक्य भारत
# आपलं वाशिम
शुक्रवार, दि. ४ जुलै २०२५



## थोडक्यात

### अकोला-जालना वाशिम मार्गे ४ जुलैला एक रेल्वे फेरी



**वाशिम :** प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने हुजूर साहिब नांदेड -आदिलाबाद, जालना अकोला आणि जालना नगरसोल अशा तीन एकतर्फी विशेष गाडीची प्रत्येकी एक फेरी सुरू करण्याचा निर्णय घेतला. वाशिममार्गे जालना - अकोला ही रेल्वेगाडी ४ जुलै रोजी रात्री ९ वाजता जालना येथून सुटेल आणि परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम मार्गे अकोला येथे ५ जुलै रोजी सकाळी ५:३० वाजता पोहोचेल.

### मूग, उडदाचा पेरा घटला तर हळद लागवड वाढली



**वाशिम :** मृग नक्षत्रात मूग, उडदाची पेरणी पोषक मानली जाते; परंतु यंदा जिल्ह्यात मृग नक्षत्रात पेरणीयोग्य पाऊस न झाल्याने ३० जून अखेर मूग व उडद-ाच्या पेरणीत ८८ टक्क्यांनी घट झाल्याचे पेरणी अहवालावरून समोर आले. दुसरी-कडे, यंदाच्या खरीप हंगामात हळदीचे पेरणी क्षेत्र वाढले आहे. जिल्ह्यात मूग ३४९२ हेक्टर तर उडदाची पेरणी ४०१० हेक्टरवर अपेक्षित आहे. ३० जूनअखेर जिल्ह्यात मूग ४२७ हेक्टरवर (१२.२३ टक्के) तर उडदाची पेरणी ४६५ हेक्टरवर (११.६० टक्के) झाली होती.

### मोप येथील दोन वादग्रस्त रस्ते सामंजस्याने निकाली

**रिसोड :** शेतरस्त्यावर अतिक्रमण झाल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारीनंतर तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी पुढाकार घेत शेतकऱ्यांच्या अडचणी दूर केल्या. मोप (ता. रिसोड) येथील तीनपैकी दोन वादग्रस्त रस्ते प्रकरणे २ जुलै रोजी सामंजस्याने निकाली काढली. जयश्री भीमराव मोरे व इतर १ विरुद्ध अरुण केरू मोरे व गीता दिलीप नरवाडे या प्रकरणांमध्ये महसूल प्रशासनाच्या हस्तक्षेपामुळे संबंधित शेतरस्ते मोकळे करण्यात आले.

### अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत सुधारणा करा!

**वाशिम :** यंदाच्या इयत्ता अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत स्थानिक विद्यार्थ्यांवर अन्याय होत असून, ही प्रक्रिया तातडीने दुरुस्त करून स्थानिक शाळांमध्ये स्थानिक विद्यार्थ्यांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी राष्ट्रवादीच्या महिला जिल्हा अध्यक्ष वैशाली मेश्राम यांनी केली आहे. सध्याच्या प्रवेश प्रक्रियेमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना त्यांच्या जवळच्या शाळांऐवजी ३० ते ३५ किमी अंतरावर असलेल्या शाळांमध्येच प्रवेश मिळत आहे. या प्रकारामुळे अनेक विद्यार्थी, विशेषतः मुली, शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका निर्माण झाला आहे.
पालकही आपल्या मुलींना दूर पाठवण्यास तयार नसल्याने त्यांचे शिक्षण अर्धवट राहू शकते, अशी भीतीही आहे. यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी वैशाली मेश्राम यांनी केली.

### रस्त्याअभावी जनुनावासी त्रस्त: अन्यथा आंदोलनाचा इशारा

**शेलूबाजार :** जिल्ह्यात जलसंधारणात सर्वोत्कृष्ट गाव म्हणून गौरव झाल्यानंतरही गावाला जोडणारा प्रमुख रस्ता अद्यापही दयनीय अवस्थेत आहे. जनुना खुर्द गावाला चोरद गावाशी जोडणारा काटेपूर्णा अभयारण्यातून जाणारा एकमेव रस्ता खड्ड्यांनी भरलेला असून, पावसात चिखल व उन्हात धुळीचे वादळ यामुळे नागरिकांना दररोज अत्यंत कठीण प्रवास करावा लागतो. शाळेची चौथीपर्यंतच सुविधा असल्याने पाचवीपासूनचे विद्यार्थी चोरद व शेलूबाजार येथे शिक्षणासाठी जीव धोक्यात घालून प्रवास करतात. शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा खडतर प्रवास सुरू आहे. शासनाच्या पातळीवरून रस्ता सुधारण्यासाठी ठोस पावले उचलली जात नसल्याने गावकऱ्यांमधून संताप व्यक्त होत आहे.

# वेग मर्यादा ओलांडली: वाहनधारकांना ६४ लाखांचा दंड!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३ :** भरधाव वेगाने वाहन चालविणाऱ्यांवर लगाम लावण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग पोलिसांकडून स्पीड गनच्या माध्यमातून कडक कारवाई करण्यात येत आहे. या अंतर्गत १ जानेवारी ते जून २०२५ या सहा महिन्यांच्या कालावधीत तीन हजार २१३ वाहनचालकांना तब्बल ६३ लाख ८० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. ही कारवाई जिल्ह्यातील स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गासह राष्ट्रीय महामार्गावर करण्यात आली आहे.

रस्ते मोकळे असोत वा नसोत, अनेक चालक अत्याधुनिक गाड्या अतिवेगात चालवत असतात. अशा गतीमुळे वाहनांवरील नियंत्रण सुटते आणि अपघाताचे प्रमाण वाढते. काही वेळा पादचाऱ्यांना अथवा अन्य वाहनांना धडक बसते. त्यामुळे अशा घटनांना आळा घालण्यासाठी स्पीड गनच्या माध्यमातून ही कारवाई केली जात आहे.

या अंतर्गत जिल्ह्यात समृद्धी महामार्गासह इतर राष्ट्रीय महामार्गावर १ जानेवारीपासून १७ जूनपर्यंत वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या ३ हजार २१३ वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे महामार्गावरील वाहनांच्या वेगाला लगाम बसल्याचे दिसत आहे. जिल्ह्यातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गासह अन्य राष्ट्रीय महामार्गावर दोन इंटरसेप्टर वाहने सतत गस्त घालतात. या वाहनांमध्ये स्पीड गनच्या साहाय्याने वाहनाचा वेग, वेळ आणि क्रमांक अचूक टिपला जातो. गती मर्यादेपेक्षा अधिक वेग आढळल्यास थेट ई-चालानद्वारे दंड आकारला जातो, अशी माहिती महामार्ग पोलीस अधीक्षक यशवंत सोळंके यांनी दिली. वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना वाहन क्रमांकाशी लिंक असलेल्या मोबाइलवर दंडाची नोटीस पाठवली जाते. यामध्ये एक लिंक दिली जाते जिच्यामार्फत ऑनलाइन दंड भरता येतो. निर्धारित वेळेत दंड न भरल्यास कोर्टाची नोटीस पाठवली जाते . दंड भरण्याची ऑनलाइन सुविधा असली तरी केवळ ४० टक्केच वाहनचालक दंड भरतात. उर्वरितांकडून दंड वसूल करण्यासाठी प्रत्येक शुक्रवारी महामार्गावर नाकाबंदी केली जाते. यावेळी नियमभंग करणारे वाहन सापडल्यास तातडीने दंड वसूल केला जातो.



### वेगमर्यादेचे निकष वेगवेगळे

महामार्गावर वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ही वेगमर्यादा वेगवेगळ्या महामार्गावर कमी-अधिक आहे. समृद्धी महामार्गावर कारसाठी प्रतितास १२० कि.मी., मालवाहू वाहनांसाठी प्रतितास ८० कि.मी. तर वाशिम अकोला महामार्गावर कारसाठी ताशी ८० कि.मी. वेग मर्यादा आहे.

### वाहनांची नवी मालिका, पसंतीच्या क्रमांकासाठी तीनपट शुल्क

वाशिम : उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशिम येथे दुचाकी वाहनांसाठी एमएच-३७, एएल ही नवीन नोंदणी क्रमांक मालिका लवकरच सुरू होत आहे. याद्वारे वाहनधारकांना त्यांच्या पसंतीचे आकर्षक क्रमांक राखीव ठेवण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. वाहन मालिका सुरू होण्याच्या दिवशी कार्यालयात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने प्रशासनावर ताण येतो तसेच नागरिकांनाही त्रास सहन करावा लागतो. यामुळे, नागरिकांचा त्रास टाळण्यासाठी आणि त्यांना पसंतीचे क्रमांक सहजतेने मिळावेत, यासाठी तीनपट विहित शुल्क भरून राखीव क्रमांकासाठी अर्ज करण्याची सुविधा देण्यात आली आहे. लिलाव प्रक्रियेत क्रमांक आरक्षित झाल्यानंतर वाहन क्रमांक राखीव झाल्याबाबत एसएमएसद्वारे सूचना पाठविण्यात येईल. त्यानंतर पाचव्या दिवशी कार्यालयात येऊन पावती घेणे आवश्यक आहे. एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून ३० दिवसांत नोंदणीसाठी वाहन सादर न केल्यास नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही.

## डॉ. अण्णाभाऊ साठे जिल्हास्तरीय जयंती उत्सव कार्यक्रमाची बैठक

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३ :** गेल्या अनेक वर्षांपासून माहुरवेश येथे मातंग समाजाचे श्रद्धास्थान व प्रेरणास्थान असलेले साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होते. तसेच जयंतीच्या अनुषंगाने विविध सामाजिक कार्यक्रमही राबविल्या जातात. त्या अनुषंगाने सकल मातंग समाजबांधवांच्यावतीने बुधवार, २ जुलै रोजी स्थानिक मन्नासिह चौकातील नाथ मंगल कार्यालयात जिल्हास्तरीय जयंती उत्सव कार्यक्रमाची बैठक मातंग बांधवांच्या भरगच्च उपस्थितीत पार पडली.

बैठकीला अध्यक्षस्थानी संजय वैरागडे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून विनोद जोगदंड, प्रशांत तायडे, जगदीश मानवतकर, नारायण डाखोरे, जगदीश इंगळे, अनिल कांबळे, राजू धोंगडे, विजय लोंढे, प्रल्हाद लगड, संतोष आवारे, विकास दाभाडे, मोहनराज दुतोंडे, भगत खडसे, दिपक साठे आदींची उपस्थिती लाभली. यावेळी सर्वानुमते आगामी १ ऑगस्टला साजरी होणाऱ्या जिल्हास्तरीय जयंती उत्सव कार्यक्रमाची कार्यकारिणी गठीत करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी श्रावण खडसे, उपाध्यक्षपदी अजय रणखांब, विनोद आवारे, सचिवपदी बबलु गायकवाड, सहसचिव विशाल बायवार, कोषाध्यक्षपदी ॲड. राजेंद्र गायकवाड, सदस्यपदी सुनील डाखोरे, मनोज खडसे, मंगेश गायकवाड, नितीन अढाव, लक्ष्मण पाटोळे, विराट बांगर, गजानन देवकते, गणेश खंदारे, अजय खंदारे अशी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. डॉ. अण्णाभाऊ साठे यांचा जयंती उत्सव अधिक व्यापक, भव्य आणि सुसंगठित करण्यासाठी सर्वांचे योगदान आवश्यक असल्याचे प्रतिपादन नवनियुक्त अध्यक्ष श्रावण खडसे यांनी पद स्वीकारताना केले. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकाऱ्यांचा सकल समाजबांधवांच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला सुरज खडसे, रवी खडसे, आकाश कुचेकर, गोलु वाणी, अंबादास जोगदंड, शैलेश खडसे, तुषार खडसे यांच्यासह सकल मातंग समाजबांधवांची बहुसंख्येने उपस्थिती होती.




## आषाढीसाठी एकत्रितपणे बस आरक्षित केल्यास गावातून थेट पंढरपूर

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३ :** यंदाच्या आषाढी एकादशीसाठी भाविकांना एसटी महामंडळाने खास सुविधा दिली आहे. भाविकांनी गट तयार करून एकत्रितपणे बस बुक केल्यास त्यांच्या गावातून थेट पंढरपूरपर्यंत लालपरी सोडण्यात येणार आहे. याशिवाय प्रवासही तुलनेने स्वस्त असणार आहे. भाविकांनी त्याचा लाभ घेण्यासंबंधी जनजागृती केली जात आहे.
जिल्ह्यातून १०० हून अधिक बस आषाढीनिमित्त पंढरपूरकडे रवाना केल्या जाणार आहेत. बसची बुकिंग प्रक्रिया जिल्ह्यातील एसटी आगारांमध्ये सुरू झाली असून महिलांसाठी यंदाही तिकीट दरात ५० टक्के सवलत लागू राहणार आहे.
एकूण बसचे भाडे किलोमीटर किंवा तास या दोन्ही घटकांनुसार आकारले जाईल. एकत्रित गट तयार करून आगारप्रमुखांशी संपर्क साधल्यास गावातून थेट पंढरपूरसाठी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे.

## अवघ्या चार दिवसात पोलिसांनी चोरट्याला केले जेरबंद

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ३ :** : पार्सल डिलिव्हरीदरम्यान चोरट्याने कॅमेरा लंपास केल्याप्रकरणी मानोरा पोलिसांनी बुधवारी (दि. २) आरोपीला अटक केली. त्याच्याकडून एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वसंतनगर येथील अंकित बेंद्रे हा युवक दिग्रस (जि. यवतमाळ) येथील डिलिव्हरी प्रा. लि. या कंपनीत डिलिव्हरी बॉय म्हणून कार्यरत आहे. २८ जून रोजी मानोरा येथे पार्सल घेऊन आलेल्या अंकितचा एका नामांकीत कंपनीचा कॅमेरा मानोरा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ चोरीस गेला होता. यासंदर्भात बेंद्रे यांनी मानोरा पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली होती. प्रकरणाचा तपास करताना मानोरा पोलिसांनी २ जुलै रोजी विशाल पुंडलिक चव्हाण या आरोपीला ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान त्याने चोरीची कबुली दिली. त्याच्याकडून ४०,९९८ किमतीचा कॅमेरा, गुन्ह्यात वापरलेली ६० हजार रुपये किमतीची दुचाकी आणि सात हजार रुपयांचा मोबाइल असा एकूण १,०७,९८८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.
ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, ठाणेदार प्रवीण शिंदे, डीबी पथकातील कर्मचारी मदन पुणेवार, मनीष अगलदरे, रोहन तायडे, फिरोज शेख आणि सायबर विभागाचे किशोर इंगोले यांच्या संयुक्त पथकाने केली. चोरीप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.



## उत्पन्नाच्या दाखल्यासाठी तलाठ्यांकडून दारिद्र्य रेषा प्रमाणपत्राची मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरूळपीर, दि. ३ :** मंगरूळपीर तहसील अंतर्गत संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थ्यांना दरवर्षी प्रमाणे हयातीचे दाखले मागविले जात आहेत. हयातीचे दाखले मागविणे व त्यासोबत आधारकार्ड व बँकेचे पासबुकाची झेरॉक्स घेणे, याबाबत वाद नाही; परंतु हयातीचे दाखल्यासोबत प्रत्येक लाभार्थ्यास २१,००० रु. चा उत्पन्नाचा दाखला मागविल्या जात आहे. २१,००० रु. च्या उत्पन्नाच्या दाखल्यासाठी तलाठी यांच्याकडून दारिद्र रेषेचे प्रमाणपत्राची मागणी केली जात आहे. या जाचक अटी रद्द कराव्या ,अशी मागणी शेख नवेद यांनी उपविभागीय अधिकारी यांना ३ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.
अशा लाभार्थ्यांना तलाठी व त्यांच्या कार्यालयात काम करणारे खासगी कर्मचारी दलाल यांच्यामार्फत मोठ्या प्रमाणात आर्थिक लुबाडणूक करून उत्पन्नाचे दाखले दिले जात आहेत. जे लाभार्थी दलालामार्फत उत्पन्नाचे दाखले मिळविण्यास असमर्थ आहेत, त्यांची ससेहोलपट होत आहे. ज्यावेळेस संजय गांधी लाभार्थी योजनेचे अर्ज पात्र केले जातात, तेव्हा त्यांच्याकडून आवश्यक दाखले मागविले जातात. संजय गांधी योजनेचे लाभ घेणारे लाभार्थी हे विधवा, परित्यक्ता, दुर्धर आजाराचे रोगी, इ. लाभार्थ्यांचे उत्पन्न दरवर्षी कुठून वाढणार? मग त्यासाठी हयातीच्या दाखल्यासोबत उत्पन्नाचे दाखले मागण्यांचे कारण काय? आणि मागितलेच तर त्यासाठी दारिद्र्य रेषेचे प्रमाणपत्राची जाचक अट कशासाठी? केवळ दलाल व तलाठी कार्यालयात काम करणारे खासगी लोकांचे भल्यासाठी अशा जाचक अटी लावल्या जातात काय? असा सवाल केल्या जात आहे. संजय गांधी योजनेच्या लाभार्थ्यांना हयातीचे दाखल्यासोबत उत्पन्नाचे दाखल्याची अट तत्काळ रद्द करावी, अन्यथा संजय गांधी योजनेच्या लाभार्थ्यासह आपले उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.




# समन्वयाने काम करून मुदतीत अपूर्ण कामे पूर्ण करा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३ :** जिल्ह्यातील विविध विकास योजनांची अंमलबजावणी व अपूर्ण कामांची पूर्तता या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात २ जुलै रोजी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत डॉ. भारत बास्टेवाड यांनी विविध शासकीय यंत्रणांना समन्वयाने काम करून विहित मुदतीत अपूर्ण कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.
यावेळी रोहयो विभागाचे राज्य समन्वयक अभय तिजारे, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, उपजिल्हाधिकारी रोहयो कैलास देवरे, सर्व तहसीलदार, सर्व बिडीओ यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.
बैठकीत सन २०२२-२३ व २०२४-२५ या कालावधीत विविध यंत्रणांनी केलेल्या आणि अपूर्ण असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यात रोहयो, घरकुल, सिंचन विहीर, फळबाग, रस्ते, ग्रामपंचायत योजना, रेशीम, वनविभाग, कृषी, जलसंधारण व जलसंपदा विभागांची कामे विशेषतः अधोरेखित करण्यात आली.
डॉ. बास्टेवाड यांनी सांगितले की, ''रोहयो'' ही ग्रामविकासाची मुख्य आधाररचना आहे. त्यामुळे त्यावर विशेष भर देत कामे वेगात पूर्ण करावीत. त्यांनी आगामी नियोजनाची माहितीही घेतली आणि कामांमध्ये गती आणण्यावर भर दिला. दरम्यान, त्यांनी दिलेल्या सूचनांनुसार पुढील गोष्टींवर तातडीने कृती करण्याचे आदेश देण्यात आले आहेत: सर्व अपूर्ण कामांची कुशल निधीसाठी विहित प्रपत्रांद्वारे मागणी करण्यात यावी. फळबाग, सिंचन विहीर व रस्त्यांची कामे प्रथम प्राधान्याने पूर्ण करावीत. सर्व संबंधित यंत्रणांनी कामावर विशेष लक्ष केंद्रित करून कामे गतीने पूर्ण करावीत.
या बैठकीत प्रशासनाच्या विविध विभागांचे अधिकारी, संबंधित योजनांचे समन्वयक उपस्थित होते. दिलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.




## चर्मकार ऐक्य परिषदेचा मुंबईत 'महा एल्गार मोर्चा'

### ला. वसंतराव धाडवे यांचे सहभागी होण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३ :** चर्मकार समाजाच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी १० जुलै रोजी सकाळी ११ वाजता आझाद मैदान मुंबई येथे महा एल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा चर्मकार संघटनांचे शिखर संघटन असलेल्या चर्मकार ऐक्य परिषद, महाराष्ट्र राज्याच्यावतीने आयोजित करण्यात आला आहे. तरी या मोर्चामध्ये जास्तीत जास्त समाजबांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन चर्मकार ऐक्य परिषदेचे कार्याध्यक्ष ला. डॉ. वसंतराव धाडवे यांनी केले आहे.



महा एल्गार मोर्चा महाराष्ट्र शासनाचे मातंग, ढोर, मोची, चांभार, भंगी जातींकडे होत असलेले दुर्लक्ष, नावापुरतीच राहिलेली समाज विकासाची महामंडळे, महामंडळाचे जुने कर्ज सरसकट माफ करावे, मुंबईसह इतर सर्व शहर, जिल्हा, तालुका, गावात गटई कामगारांना बैठा पीच परवाना व बीज भांडवल, विमा लाभ देणे, समाजाच्या निधीवर शासनाने दरोडा टाकू नये, बार्टीप्रमाणे शासनाने गुरु रविदास संशोधन व प्रशिक्षण केंद्र सुरू करावे, अशा अनेक समाजाच्या न्याय्य हक्क व विकासाच्या मागण्यांसाठी हा मोर्चा काढला जाणार आहे. तरी या मोर्चामध्ये जास्तीत जास्त समाजबांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन चर्मकार ऐक्य परिषदेचे कार्याध्यक्ष ला. डॉ. वसंतराव धाडवे यांनी केले आहे.

अजिंक्य भारत
# आपला जिल्हा
अकोला । शुक्रवार, दि. ४ जुलै २०२५


## थोडक्यात

### भेंडीमहाल येथे वसंतराव नाईक यांची जयंती साजरी




**पिंजर :** पिंजरनजीक असलेल्या भेंडीमहाल येथे हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची ११२ वी जयंती भेंडीमहाल येथे १ जुलै रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला तांड्याचे नायक व कारभारी सेवालाल महाराज मंदिराचे पुजारी बाबूसिंग महाराज यांच्यासह गावातील ज्येष्ठ मंडळी उपस्थित होती. यामध्ये पिंजर सर्कलचे गोरसेना उपाध्यक्ष रोशन पवार, अजय जाधव, अमोल चव्हाण, शंकर राठोड, ज्ञानेश्वर सोनुने, शिवाजी जाधव, रोशन जाधव, शुभम राठोड, नवल चव्हाण, अनिकेत राठोड, बबलू पवार, अभिषेक राठोड, आदी उपस्थित होते.

### गावकऱ्यांनी केला आदर्श शिक्षकाचा निवृत्तीनिमित्त सत्कार



**बाळापूर:** तालुक्यातील उरळ खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचे श्रीमान युवराज खंडारे हे शिक्षक २ जुलै रोजी आपल्या सेवेतून सेवानिवृत्त झाल्याने गावातील नागरिक तसेच शाळेतील शिक्षक , शिक्षिका, विद्यार्थी यानी खंडारे या सेवानिवृत शिक्षकांना निरोप देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

शिक्षकांनी गेल्या २०१० पासून एकाच गावात आपली शिक्षण शेत्रातील सेवा प्रदान केल्याने अनेक विद्यार्थी नोकरी, राजकारणी, तसेच उत्कृष्ठ शेतकरी म्हणून त्यांना घडविले. पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्यांनी संस्कारक्षम शिक्षणही मुलांना दिले. त्यांची सेवानिवृत्ती होणे हे आजी, माजी विद्यार्थ्यांसोबत गावातील नागरिकांना भावूक करणारा क्षण होता. त्यांनी आपला सेवाकाळ पूर्ण केला. गावातील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने त्यांचा सेवानिवृत्तीचा सत्कार कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी ह.भ.प. गोपाळ महाराज उरळकर यांच्या हस्ते सत्कार तसेच सरपंच अनिल तायडे, ग्रा.प. सदस्य दीपक गोल्हर, रामधन घोगरे , वजिरे , प्रमोद बगळे , गोपाल पोहरे आणि संपूर्ण गावकरी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# सावत्र वडिलाने ९ वर्षीय दर्शनला कायमचे संपविले

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

## संशयाने नाते झाले कलंकित



**अकोट, दि. ३ :** संपत्ती, स्त्री, या भोवतीच हत्या प्रकरणे फिरत असतात. त्यामुळे पोलीस तपासाला सुरुवात करताना सर्वप्रथम याच दिशेने करतात. याच मालिकेत एका निरागस ९ वर्षीय दर्शनला कायमचे संपविले.

अकोटमध्ये एक धक्कादायक प्रकार घडला आहे. ९ वर्षीय अल्पवयीन दर्शनचा निर्घृणपणे खून करून मृतदेह अकोला आणि अमरावती जिल्ह्याच्या सीमेवरील जंगलात फेकून देण्यात आला.

सावत्र वडिलांनी मित्राच्या मदतीने दर्शनची गळा आवळून निर्घृणपणे हत्या केली. भविष्यात आपल्या संपत्तीत हिस्सा मागणार, या संशयातून सावत्र बापाने हत्याकांड घडवून आणले. दर्शन वैभव पळसकर असे हत्या करण्यात आलेल्या मुलाचे नाव आहे. आकाश साहेबराव कान्हेरकर हा बाप आहे. तर गौरव वसंतराव गायगोले व बाप असे दोघेही राहणार हिरापूर, ता. अंजनगाव सुर्जी जिल्हा अमरावती या दोघांनाही अकोट पोलिसांनी अटक करून त्यांच्याविरुद्ध खुनाचे गुन्हे दाखल केले आहे. दर्शन हरविला असल्याची तक्रार त्याच्या आईने दिली असून,

२ जुलै रोजी सकाळी साडे ८ वाजताच्या सुमारास कुणालाही न सांगता दर्शन घराबाहेर निघून गेला. आईच्या तक्रारीवरून तपास सुरू असतानाच सावत्र वडिलांवर पोलिसांना संशय आला. कारण अकोट शहरातल्या चौकातील नुकतेच लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरात वडिलांसोबत मुलगा जात असताना दिसून येत आहे. त्यामुळे पोलिसांनी सावत्र वडिलांची कसून चौकशी केली असता सावत्र बाप आकाश आणि त्याचा मित्र गौरव या दोघांनी दर्शनला दुचाकीवर नेत त्याचा खून केला आहे.

त्यानंतर दर्शनचा मृतदेह अमरावती व अकोला जिल्ह्याच्या सीमेवरील जंगल परिसरात टाकून दिला आणि त्याला कायमचे संपविले असल्याची बाब समोर आली.

या घटनेची माहिती पोलिसांना समजताच पोलिसांनी काल रात्रीपासून जवळपास १२ तास जंगल परिसरात शोधमोहीम राबवित मुलाचा मृतदेह शोधून काढला आहे.या शोध मोहिमेमध्ये ७ पोलीस अधिकारी आणि ६० पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. दरम्यान, सद्यस्थितीत मृतदेह शवविच्छेदनासाठी अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे, अशी माहिती आयपीएस अधिकारी अनमोल मित्तल यांनी दिली.

### ३०० रुपयांसाठी हत्याकांडात झाला सहभागी

मिळालेल्या माहितीनुसार गौरव गायगोले याने ३०० रुपयांसाठी त्याचा मित्र अर्थातच मारेकरी सावत्र बापाला हत्याकांडात मदत केली. दोघांनी मिळून दर्शनचा खून केला आहे. मात्र शवविच्छेदनाच्या अहवालानंतरच सर्व बाबी समोर येतील, असेही पोलिसांनी सांगितले.

### सिसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे उघड झाला गुन्हा

सिसीटीव्ही कॅमेरा दक्ष अधिकारी म्हणून काम करतो, हे कित्येकदा सिद्ध झाले आहे. अकोट शहरातील चौकाचौकात आणि व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानांमध्ये सिसीटीव्ही कॅमेरे बसविलेले आहेत. त्यामुळे शहरातील प्रत्येकाची हालचाल कॅमेऱ्यात कैद होत आहे. या प्रकरणातही सिसीटीव्ही कॅमेऱ्याची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. या कॅमेऱ्यात मुलगा बापासोबत जात असताना दिसत असल्यामुळे पोलिसांचा संशय बळावल्याने अधिक चौकशी झाली आणि खून आणि खुनाचे मारेकरी सहजपणे पोलिसांना शोधता आले.

# मौजे ढगा ग्रामस्थांच्या जमिनीवर अतिक्रमण

## अतिक्रमण हटविण्याची ग्रामस्थांची ग्रामपंचायतकडे मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोट, दि. ३ :** तालुक्यातील करतवाडी (आ) ग्रामपंचायतमध्ये येणाऱ्या मोजे ढगा गावातील ४ एकर जमीन ही दर्यापूर मार्गाला लागलेल्या कैलास बाबा मंदिरासमोर आहे. ही जागा ढगा ग्रामस्थांच्या उपयोगासाठी आहे; मात्र त्या जमिनीच्या आजूबाजूला असलेल्या शेतकऱ्यांनी गुपचूप अतिक्रमण केले आहे.

संपूर्ण चार एकरची जमीन अतिक्रमण मध्ये फस्त झाली आहे. त्या जमिनीचे वर अतिक्रमण केलेल्या स्थानिक शेतकऱ्यांनी जवळून अतिक्रमण काढून घेण्यात यावे, अशी मागणी ढगा ग्रामस्थांनी ग्रामपंचायत करतवाडी सचिव यांच्याकडे केली. करतवाडी ग्रामपंचायतने जमीन मोकळी करून चार एकर जमिनीवर असणारे अतिक्रमण काढून मुक्त करावे व ढगा वासियांच्या सुपूर्द करावे, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांच्यावतीने केली आहे.

दर्यापूर मार्गावरील कैलास बाबा मंदिरासमोर ढगा ग्रामस्थांची चार एकर जमीन आहे. त्या जमिनीच्या आजूबाजूला असलेल्या शेतकऱ्यांनी जमिनीवर अतिक्रमण केले आहे. ग्रामस्थांच्या वापरासाठी उपयोगी असणाऱ्या जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून ढगा ग्रामस्थांना देण्यात यावी.

**-कैलास आकाराम इंगळे, ग्रामस्थ ढगा.**

ढगा ग्रामस्थांची चार एकर जमीन दर्यापूर रोडला लागून कैलास बाबा मंदिरासमोर आहे. त्या जमिनीच्या आजूबाजूला असणाऱ्या शेतकऱ्यांनी जमिनीवर हळुवारपणे अतिक्रमण केलेले आहे. त्या जमिनीचे दस्तऐवज प्राप्त होताच अतिक्रमण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

**- आर. एम.राऊत,सचिव, गट ग्रामपंचायत,करतवाडी (आ)**

# विदर्भ केसरीसाठी दोन विद्यार्थ्यांची निवड

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**पातूर : दि. ३ :** विदर्भ कुस्तीगीर संघाच्यावतीने आयोजित ३९ व्या विदर्भ केसरी कुमार मुले व मुली कुस्ती स्पर्धा निवड चाचणी नुकतीच अकोला येथे पार पडली. प्रभात किड्स येथे पार पडलेल्या या निवड चाचणीत पातूरच्या किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या दोन विद्यार्थ्यांनी जिल्ह्यातून बाजी मारली आहे.

३५ किलो वाजनगटातून इयत्ता आठवीचा विद्यार्थी रुद्र परमाळे, तर ३६ किलो वजन गटातून इयत्ता सातवीची विद्यार्थिनी सोनल ठाकरे या दोन विद्यार्थ्यांनी अकोला जिल्ह्यातून बाजी मारत १४ वर्षा आतील या वजन गटातून पहिल्यांदा पातूर तालुक्याला हा बहुमान मिळाला आहे. पुसद येथे होणाऱ्या विदर्भ केसरी कुस्ती स्पर्धेसाठी पातूरचे हे दोन विद्यार्थी वजन गटातून अकोला जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. यावेळी विदर्भ कुस्तीगीर संघाचे जिल्हाध्यक्ष चंदू सिरसाट, सचिव विदर्भ केसरी युवराज गावंडे, प्रभात किड्सचे संचालक डॉ. गजानन नारे, विदर्भ कुस्तीगीर संघाचे अनिल कांबळे, सौरभ सिरसाट, भोजरासिंह बायस यांनी विजयी स्पर्धेकांचा सत्कार केला. पातूरच्या विजयी झालेल्या या दोन विद्यार्थ्यांचा सत्कार किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे व कार्यकारी संचालिका ज्योत्स्ना गाडगे यांनी दोन विद्यार्थ्यांचा सत्कार केला. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शाळेचे क्रीडा शिक्षक अक्षय तायडे यांचासुद्धा सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे, नरेंद्र बोरकर, नितु ढोणे, संकल्प व्यवहारे, हरिष सौंदळे, बजरंज भुजबटराव, अविनाश पाटील, अक्षय तायडे, प्रतीक्षा भारसाकळे, प्रियंका चव्हाण, पूजा खंडारे, रेश्मा शेंडे, इकरा आदिबा खान, साक्षी वानखडे, शुभांगी बोरकर, दीपाली घोरे, दिव्या गव्हाळे, नयना पटोणे, प्रिया चक्रे, रुपाली पोहरे, कल्पना वानेरे, सुकेशिनी वाहूरवाघ, शुभम पोहरे, मधुकर बोदडे आदींनी परिश्रम घेतले.

# शाहबाबू विद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**पातूर : दि. ३ :** शाहबाबू विद्यालयात १ जुलै रोजी राही सर यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात राष्ट्रीय हरित सेना,विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमात विविध प्रकारची फळझाडे, फुलझाडे आणि छायादार वृक्षांची लागवड राही सरांच्या हस्ते करण्यात आली, तसेच विद्यार्थ्यांना वृक्ष रोप वाटपसुध्दा करण्यात आले. राही सरांनी पर्यावरणाचे महत्त्व पटवून देत सर्वांना दरवर्षी एक झाड लावण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले.विद्यालयाचे प्राचार्य मुजीबुल्लाह खान, पर्यवेक्षक मोहसीन खान,प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक असगर,सद्दीक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यासह पालकवर्गही या उपक्रमात सहभागी झाला होता.

वृक्षारोपणानंतर सर्वांनी एकत्र येऊन सरांना शुभेच्छा दिल्या आणि कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण झाली असून, समाजात सकारात्मक संदेश पोहोचविण्यात आला.

### रेशन दुकानदार कमिशनपासून वंचित

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मूर्तिजापूर: दि. ३ :** तालुक्यातील रेशन दुकानदारांना गेल्या सहा महिन्यांपासून शासनाकडून कमिशन मिळत नसल्याने, धान्य वितरण करण्यासाठी व कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नसल्याने उपासमारीची वेळ आली आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत रेशन दुकानदारांना गाव पातळीवर विविध प्रकारच्या धान्याचे वितरण करावे लागते. तालुक्यातील १६३ रेशन दुकानांतर्गत धान्याचे वितरण करण्यात येते. रेशन दुकानदारांना प्रतिक्विंटल १५० रुपये कमिशन मिळते. सुरुवातीच्या काळात दरमहा तीन महिन्यांनंतर दुकानदारांना कमिशन मिळत होते; परंतु तालुक्यातील रेशन दुकानदारांना जानेवारी २०२५ पासून शासनाकडून कमिशन मिळत नसल्याने धान्य वितरण करण्यासाठी लागणारा खर्च व कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी पैसा उपलब्ध नसल्याने सदर खर्च कुठून करावा, या विवंचनेत रेशन दुकानदार असून, त्यांच्यावर उपासमारीची पाळी येत असल्याने रेशन दुकानदार कमालीच्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. शासनाने तत्काळ त्यांचा निधी वितरण करावा जेणेकरून त्यांच्या कुटुंबावर आघात होणार नाही.

# विविध शाळांमध्ये इको ब्रिक्स निर्मिती उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद





## निमित्त प्लास्टिक मुक्ती दिनाचे

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला : दि. ३ :** प्लास्टिक मुक्ती दिनाचे औचित्य साधून अकोल्यातील विविध शाळांमध्ये इको ब्रिक्स निर्मिती व प्लास्टिक कचरा व्यवस्थापन या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करून इको ब्रिक्स तयार करण्याचा संकल्प केला. या उपक्रमामुळे प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धन या दोन्ही बाबतीत सकारात्मक पाऊल उचलण्यात आले आहे.

कार्यक्रमातून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देण्यात आला असून, विद्यार्थ्यांनी यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नीलेश देव, अनिल बिडवे, पल्लवी कुलकर्णी यांच्या सक्रिय सहभागाने अमृत कलश विद्यालय, मा रेणुका मराठी प्राथमिक शाळा, बाल शिवाजी प्राथमिक व माध्यमिक शाळा, ज्ञानदर्पण इंग्लिश स्कूल, प्रभात किड्स स्कूल, स्कूल ऑफ स्कॉलर्स अकोला, जुबिली इंग्लिश स्कूल, जिजाऊ कन्या शाळा, विवेकानंद इंग्लिश स्कूल अकोला या शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करून इको ब्रिक्स तयार करण्याचा संकल्प केला. अकोला महानगरपालिका, अहिल्यादेवी महिला शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ अकोला, तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी अकोला, पूर्णम इकोविजन फाउंडेशन पुणे, संत गाडगेबाबा सेवा समिती अकोला तसेच नीलेश देव मित्र मंडळ अकोला यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्वेता शिरसाट ,सपना म्हात्रे, उमेश शिरसाट, पल्लवी कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

### प्लास्टिक मुक्ती दिन उत्साहात साजरा



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला : दि. ३ :** आज ३ जुलै २०२५ रोजी न्यू खेतान नगर स्थित ज्ञानदर्पण इंग्रजी शाळेत प्लास्टिक मुक्ती दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला काब्रा यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच अध्यक्षस्थान शाळेच्या संचालिका सौ पल्लवीताई कुलकर्णी व सिद्धेश कुलकर्णी यांनी भूषवले. या कार्यक्रमात सर्वांनी प्लास्टिक बॉटलचे संकलन केले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सिंगल युझ प्लास्टिक, कॅरीबॅग बंद कराअसा संदेश देणारी पथनाटिका सादर केली. प्लास्टिक बंदी वर विविध विद्यार्थ्यांनी भाषणे दिली. त्यानंतर विद्यार्थी व शिक्षकांनी मिळून पृथ्वी मातेच्या स्वच्छतेची शपथ घेतली. प्लास्टिक बंदीचे घोषवाक्य देत आपली शाळा आजूबाजूचा परिसर आणि संपूर्ण अकोला प्लास्टिक मुक्त करण्याचा संकल्प केला.कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना प्लास्टिक निर्मूलनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे संचालन संगीता सोनोने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक सौ .मंदा भाकरे तसेच शाळेच्या प्रशासकीय प्रमुख अनिता कुलकर्णी दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

**Classified**
पाहिजेत
bigbasket शोधत आहे
पिकर्स आणि पॅकर्स
डिलेव्हरी एक्झिकेटीव्ह
स्थळ : अग्रसेन भवनासमोर, न्यू राधा कृष्ण प्लॉट, अकोला
संपर्क : अजीम खान - 7276424617
दरमहा रु. 30,000 पर्यंत कमवा
आकर्षक साप्ताहिक प्रोत्साहन
आता अर्ज करा आणि कमाई सुरू करा!
DN 673033

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा

बुलडाणा, शुक्रवार ४ जुलै २०२५ www.ajinkyabharat.com



# विठ्ठल दर्शनासाठी खामगावहून 'हरीभक्तांची' रेल्वे पंढरपूरकडे रवाना

## केंद्रीय राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांच्या हस्ते हिरवी झेंडी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि. ३ :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने वारकऱ्यांच्या सोयीसाठी आज खामगाव येथून 'विठ्ठल दर्शन एक्सप्रेस' ही विशेष रेल्वे मोठ्या जयघोषात आणि भक्तीमय वातावरणात पंढरपूरकडे रवाना झाली.

या पहिल्या फेरित एकूण १६२९ भाविक सहभागी झाले होते. रेल्वेला केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते खामगाव रेल्वे स्थानकावरून हिरवी झेंडी दाखवून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी माजी आमदार दिलीपकुमार सानंदा, सागर फुंडकर उपस्थित होते.

या वारकऱ्यांना खामगावकरांनी 'विठ्ठल विठ्ठल जय हरि विठ्ठल'च्या गजरात हजारोंच्या संख्येने निरोप दिला. स्टेशन परिसरात भक्तीरसात न्हालेली गर्दी, टाळ-मृदुंगाच्या गजरात गाणारे वारकरी, व विविध संघटनांकडून करण्यात आलेले अल्पोपहार व पाण्याचे वाटप यामुळे संपूर्ण परिसर भक्तिभावाने न्हालेला होता.

गेल्या सात वर्षांपासून खामगावहून आषाढी एकादशीसाठी ही विशेष रेल्वे सेवा सुरु असून यंदाही बुलढाणा जिल्ह्यासह परिसरातील भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार, या पहिल्या फेरितून विभागाला ६ लाख ३२ हजार ३५ रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले असून यामध्ये सर्वसाधारण, राखीव व वातानुकूलित तिकिटांचा समावेश आहे. या पवित्र यात्रेच्या आयोजनासाठी व व्यवस्थापनासाठी स्थानिक, सामाजिक संस्था आणि प्रशासन यांचे योगदान उल्लेखनीय होते.

# जनआक्रोश मोर्चाच्या तयारीसाठी महाविकास आघाडीचे नेते मतदारसंघ पिंजून काढणार

## माजी मंत्री डॉ.शिंगणे,माजी आ.बोंद्रे, शिवसेनेचे मेहेत्रे संवाद साधणार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**दे.राजा दि.३:** महाविकास आघाडीच्या वतीने सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील ज्वलंत प्रश्नांच्या संदर्भात राज्य सरकारचे दुर्लक्ष होत असल्यामुळे जन आक्रोश मोर्चाचे आयोजन सिंदखेड राजा येथे दि.१४ जुलै रोजी करण्यात आले आहे.

या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे प्रमुख माजी मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे माजी आमदार तथा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे आणि शिवसेनेचे सह संपर्कप्रमुख छगनदादा मेहेत्रे संयुक्तपणे मतदार संघातील सर्व जिल्हा परिषद सर्कल व पंचायत समिती सर्कल मध्ये दौरा करून जनतेशी संवाद साधणार आहेत. दि.५ जुलै पासून ते १०जुलै पर्यंत महाविकास आघाडीचे प्रमुख नेते व पदाधिकारी पूर्ण मतदार संघ पिंजून काढणार आहेत. जनआक्रोश मोर्चाची जय्यत तयारी करण्याचा चंग महाविकास आघाडीने बांधला असून सावखेड तेजन पंचायत समिती सर्कलची बैठक दि.५ जुलै रोजी सकाळी नऊ वाजता अंचली येथे वर्दडी पंचायत समिती सर्कलची बैठक दुपारी बारा वाजता वर्दडी येथे, सोनोशी पंचायत समिती सर्कल दुपारी तीन वाजता जांभोरा येथे, किनगाव राजा पंचायत समिती सर्कलची बैठक सायंकाळी पाच वाजता किनगाव राजा येथे, दि.७ जुलै रोजी सकाळी अकरा वाजता दुसरबीड येथे, बिबी किनगाव जट्टू खळेगाव या सर्कलची बैठक दुपारी चार वाजता बिबी येथे, दि.८ जुलै रोजी साखरखेर्डा सवडद सर्कलची बैठक सकाळी नऊ वाजता साखरखेर्डा येथे, शेंदुर्जन सर्कलची बैठक दुपारी बारा वाजता शेंदुर्जन येथे, मलकापूर पांगरा सर्कलची बैठक दुपारी तीन वाजता मलकापूर पांगरा येथे, दरेगाव सर्कलची बैठक सायंकाळी पाच वाजता खैरव येथे, दि. ९ जुलै रोजी शेळगाव आटोळ सर्कलची बैठक सकाळी नऊ वाजता मिसाळवाडी येथे, मेरा बुद्रुक मेरा खुर्द सर्कलची बैठक दुपारी बारा वाजता मेरा येथे, अंढेरा सर्कलची बैठक दुपारी तीन वाजता अंढेरा येथे, आणि देऊळगाव मही सर्कलची बैठक सायंकाळी पाच वाजता देऊळगाव मही येथे, दि.१० जुलै रोजी डिग्रस सर्कलची बैठक सकाळी नऊ वाजता डिग्रस येथे, सिनगाव जहागीर सर्कलची बैठक दुपारी बारा वाजता सिनगाव जहागीर येथे, जवळखेड सर्कलची बैठक दुपारी तीन वाजता जवळखेड येथे, आणि सावखेड भोई सर्कलची बैठक सायंकाळी पाच वाजता सावखेड भोई येथे होणार आहे. सलग पाच दिवस चालणाऱ्या दौऱ्यामध्ये नियोजित सर्कलच्या ठिकाणी वेळेवर महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि शिवसेनेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वेळेवर हजर रहावे असे आवाहन महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### शासकीय आयटीआय प्रवेश प्रक्रिया सुरु

**बुलडाणा-** सेवागिरी बाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोताळा येथे प्रवेश सत्र २०२५-२६ करीता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून यंदा विजतंत्री या नवीन व्यवसाय अभ्यासक्रमास शासन मान्यता प्राप्त झाली आहे. या अभ्यासक्रमासाठी एकूण २० जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत.याशिवाय, संस्थेत चालू वर्षासाठी वायरमन, फिटर, आयसीटीएसएम, प्लंबर, वेल्डर, कोपा, शिवणकाम (ड्रेसमेकिंग), ब्युटी पार्लर (कॉस्मेटोलॉजी) हे एक व दोन वर्षीय अभ्यासक्रमही प्रवेशासाठी खुले असून इच्छुक विद्यार्थ्यांसाठी उत्तम संधी उपलब्ध झाली आहे. प्रवेशासाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने अधिकृत संकेतस्थळावर भरता येणार आहे. सर्व पात्र उमेदवारांना मोठ्या संख्येने ऑनलाईन अर्ज करून प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे प्राचार्य एस. डी. गंगावणे यांनी केले आहे.

### ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत ८ जुलैला

**खामगाव :** ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दि. १३ व १६ जून २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार तसेच जिल्हाधिकारी कार्यालयांच्या दि. १७ जून २०२५ रोजीच्या सुधारित अधिसूचनेनुसार बुलडाणा तालुक्यातील ६६ ग्रामपंचायतींतील सरपंच पदांचे आरक्षण सोडत ८ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा निवडणूक इमारत, तहसील कार्यालयाजवळ, चिखली रोड, बुलडाणा येथे काढण्यात येणार आहे. या सभेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुला प्रवर्ग यांसाठी सरपंच पदांचे आरक्षण सोडत काढली जाणार आहे.

### इसमावर प्राणघातक हल्ला

**खामगाव :** स्थानिक बसस्थानकासमोर ओवेस खान रहीम खान (वय २२, रा.ताज नगर) व त्याचा मित्र शेख मुजम्मील शेख सलाउद्दीन (२५) हे दोघे १ जुलै २५ रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास चहा पित असतांना हेदर खान अनवर खान (वय ३८, रा. हरीफैल) याने शेख मुजम्मील यांना शिवीगाळ केला व जाये मारण्याच्या उद्देशाने डोक्यात लोखंडी पाइप मारून गंभीर जखमी केले. तसेच इमरान खान अनवर खान (वय ४०, रा.हरीफैल) याने सुध्दा लोखंडी पाईपने मारहाण केली. याप्रकरणी ओवेस खान रहीम खान यानी शहर पोस्टेला फिर्याद दिली फिर्यादीवरून पोस्टमध्ये उपरोक्त दोन्ही आरोपीविरूध्द कलम ५०९. ३५९ (२), ३ (५) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पीएसआय लबडे करीत आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १८०० – २३५० |
| गहू | २४५० – २५२५ |
| तुर | ५७०० – ६६०० |
| हरभरा | ४६५० – ५७३६ |
| सोयाबीन | ३७०० – ४३५० |
| भुईमुग | ५२५० – ६०२५. |
| तीळ. | ८०५० – ८०५० |
| मलाई चना | ५२००–५२०० |

# मासे पकडण्यास गेलेल्या युवकाचा विजेच्या धक्याने मृत्यू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.३ :** गावालगत वाहणाऱ्या मन नदीच्या काठी मासे पकडण्यासाठी गेलेल्या तरुणाचा दुर्दैवी मृत्यु झाला. ही घटना बुधवारी दुपारी ३ च्या सुमारास घडली.

रमेश गणेश जाधव (वय २५) असे मृत तरुणाचे नाव असून, तो मांडवा फॉरेस्ट येथील रहिवासी होता. प्राथमिक माहितीनुसार, रमेश मासेमारीसाठी नेहमीप्रमाणे मन नदीकाठी गेला होता. मात्र काही वेळातच त्याला विजेचा धक्का बसल्याची शक्यता व्यक्त होत आहे. स्थानिक ग्रामस्थांनी त्याला गंभीर अवस्थेत नदीतून बाहेर काढून तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र देऊळगाव साखरशा येथे नेले, मात्र डॉक्टरांनी त्याला खामगाव येथे संदर्भित केले तेथेच डॉक्टरांनी मृत घोषित केले. मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट झालेलं नाही. विजेच्या धक्क्यामुळे मृत्यू झाला असल्याचा प्राथमिक अंदाज आहे, मात्र नेमकी कारणमिमांसा करण्यासाठी पोलीस तपास सुरू आहे.

# सिद्धिविनायक तंत्रनिकेतनला शैक्षणिक सर्वेक्षणात सर्वोत्तम मानांकन प्राप्त

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.३:** स्थानिक वसुंधरा बहूद्देशीय सामाजिक संस्था संचालित सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस खामगांव रोड शेगाव ला शैक्षणिक सर्वेक्षणात सर्वोत्तम मानांकन प्राप्त झाले आहे. राज्यातील सर्व त्रां निकेतनांचा गुणात्मक दर्जा पडताळण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ दरवर्षी नियमित शैक्षणिक सर्वेक्षणाची प्रक्रिया राबविते.हे सर्वेक्षण तंत्रशिक्षण मंडळाच्या कार्यकक्षेतील व तंत्र शिक्षण मंडळाने नेमणूक केलेल्या तज्ञ समितीकडून केले जाते. शैक्षणिक गुणवत्तेवर आधारित या सर्वेक्षणात संस्थेचा शैक्षणिक दर्जा, संस्थेतील शैक्षणिक सोयी सुविधा, प्रयोगशाळांची सुसज्जता, गुणवत्ता धारक शिक्षक व त्यांची निकषानुसार आवश्यक संख्या, दरवर्षीचा संस्थेचा गुणात्मक व संख्यात्मक निकाल, प्रवेशित विद्यार्थी संख्या इत्यादी बाबींवर आधारित ही समिती तपासणी करते.

या संस्थेचे अशा प्रकारचे सत्र २०२४-२५ चे बाह्य शैक्षणिक सर्वेक्षण २४ मार्च रोजी पार पडले. या सर्वेक्षणाचा अहवाल महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे नुकताच ०२ जुलै रोजी जाहीर केला आहे. जाहीर झालेल्या निकालामध्ये या महाविद्यालयास व प्रत्योक विभागास ''व्हेरी गुड'' असे मानांकन प्राप्त झाले आहे. संस्थेतील तंत्रनिकेतनास मिळालेल्या या मानांकनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सागर फुंडकर आणि तसेच संस्थेचे उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री ना. अँड आकाश फुंडकर यांनी समाधान व्यक्त करीत उत्तरोत्तर संस्थेचा शैक्षणिक दर्जा अधिक गुणात्मक करण्याचा मनोदय व्यक्त केला.

# पुन्हा अतिक्रमण करू नका अन्यथा साहित्य जप्त होईल : न.प.चा इशारा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.३:** नगर पालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेली अतिक्रमण निर्मूलन मोहीम सुरूच राहणार असून कुणीही पुन्हा त्याच जागेवर अतिक्रमण करू नये, अन्यथा साहित्य जप्त अथवा नष्ट केले जाईल तसेच संबंधिताबर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा न.प. प्रशासनाने एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिला आहे.

नगर पालिकेच्यावतीने राबविण्यात आलेली अतिक्रमण निर्मूलन मोहीम थांबलेली नसून सुरूच राहणार आहे. त्यामुळे कुणीही पुन्हा त्या जागेवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करू नये, तसेच अतिक्रमण हटाव मोहिमे दरम्यान ज्यांची दुकाने काढण्यात आली, त्यांनी त्वरित आपले साहित्य घेऊन जावे अन्यथा सदर साहित्य जप्त केले जाईल अथवा जागेवर नष्ट केले जाईल. दरम्यान ज्या भागातील अतिक्रमण काढणे बाकी आहे, त्या भागात मोहीम राबविली जाणार आहे. त्यांनी त्वरित स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून होणारे संभाव्य नुकसान टाळावे, असे आवाहन नगर पालिका अतिक्रमण विभाग प्रमुख यांनी केले आहे.

# ब्रिटीशकालीन विश्रामगृहाची इमारत पाडकाम प्रकरण ; कार्यकारी अभियंत्याला दिले निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि.३** ब्रिटीशकालीन सार्वजनीक बांधकाम विभागाच्या विश्राम गृहाच्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी जिल्हाधिकारी यांनी तब्बल ८० लाखाचा निधी मंजुर केला असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी रातोरात्र प्रताप करत इमारत पाडली. कुठल्याही प्रकारच्या शासकीय परवानग्या नसतांना केवळ तोंडी आदेशावर विश्रामगृह पाडण्यात आल्याचे लेखी उत्तर काँग्रेस पक्षाला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिले. यानंतर पुन्हा चिखली व तालुका शहर काँग्रेसने आक्रमक होत सार्वजनिक बांधकाम विभागाने परवानगीचे व इतर कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावे, अशी मागणी ३ जुलै रोजी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद आहे की, चिखली येथील ब्रिटीशकालीन सार्वजनीक बांधकाम विभागाच्या विश्राम गृहाची इमारतीच्या दुरूस्तीसाठी जिल्हाधिकारी यांनी तब्बल ८० लाखाचा निधी मंजुर केला होता. त्यामुळे सदर इमारतीचे जतन होवुन पुढील पिढयांसाठी ती सुरक्षीत राहील अशी अपेक्षा होती. परंतु सदर इमारत आपल्या विभागाकडुन रातोरात पाडण्यात आली आहे. यांसदर्भात चिखली काँग्रेस कमिटीने ३० जुन रोजी आपल्या विभागाच्या चिखली कार्यालयात घेराव आंदोलन सुध्दा केले आहे. चिखली येथील उपविभागीय अभियंता यांना सदर प्रकरणी विचारणा केली असता त्यांनी तोंडी आदेश देवून सदर इमारत पाडण्यात आल्याचे सांगुन वेळ काढून नेण्याचा प्रयत्न केला.

यावेळी चिखली तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ,रामभाऊ जाधव, शहर अध्यक्ष राहुल सवडतकर, समन्वयक प्राध्यापक राजू गवई सर, डॉक्टर मोहम्मद इसरार, कुणाल बोंद्रे, प्राध्यापक निलेश गावंडे सर, रोहन पाटील,व्यंकटेश रिंढे यांची उपस्थिती होती.

# सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या मागण्या मान्य; आमरण उपोषणाची यशस्वी सांगता

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**जळगाव जा. दि.३:** डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृहाचा रस्ता डांबरीकरण करावा व हायमास्ट लाईट बसवावे या मागण्यांसाठी वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलन बुलढाणा जिल्ह्याच्यावतीने बुलंद आवाज उठवण्यात आला. जिल्हाध्यक्ष मोहित दामोदर यांनी दि. ३० जूनपासून आमरण उपोषण सुरू केले होते. मागील वर्षभर प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करूनही प्रतिसाद न मिळाल्यामुळे हे टोकाचं पाऊल उचलण्यात आलं होतं.

आंदोलनाच्या दुसऱ्याच दिवशी दि.१ जुलै रोजी प्रशासनाने याची तात्काळ दखल घेत मा. तहसीलदार, जळगाव जामोद यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने लेखी आश्वासन दिले. त्यानुसार, दीड महिन्याच्या आत डांबरी रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल आणि तत्काळ पर्यायी व्यवस्था म्हणून खडक टाकून कच्चा रस्ता तयार केला जाईल, असे नमूद करण्यात आले. या लेखी आश्वासनानंतर आमर उपोषणाची सांगता करण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडी आघाडीचे उत्तर जिल्हाध्यक्ष देवाभाऊ हिवराळे, दक्षिण जिल्हा अध्यक्ष निलेशभाऊ जाधव, फुले-आंबेडकर विद्वात सभेचे राज्य समन्वयक प्रा.मनोजजी निकाळजे, विशाखाताई सांवग, युवा आघाडी अनिल वाकोडे, छायाताई बांगर, प्रा.दिलीप कोकाटे, ॲड.रागिणीताई तायडे, मंगलाताई पारवे, गौतम इंगळे, गिरीश उमाळे, आजाबराव वाघोदे, जगदिश हातेकर, गौतम सुरवाडे, संतोष गवई, प्रशांत अवसरमोल, रतन नाईक, सुनील बोदडे, फुले आंबेडकर विद्वत सभा, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# बनावट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान ; शेतीचे पंचनामे करा : शिवसेना उबाठाचे निवेदन



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.३:** तालुक्यामधे बनावट बियाण्यांच्या विक्रीमुळे असंख्य कास्तकारांवर दुबार पेरणीचे संकट ओढल्या गेले आहे. याबाबत दिपक चांभारे पाटील मलकापुर तालूकाप्रमुख यांच्याकडे प्रचंड लेखी व मौखिक तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या.

त्यात प्रामुख्याने ''दिव्य रत कंपनीचे सोयाबिन - फुले किमया ७५३, सोयाबीन - फुले दुर्वा ९९२''; ''अग्रो जेनेटिक्स प्रा. लि. कंपनीचे सोयाबीन - ग्रीन लिम्का जिएलए- ५५११''; ''सुफलाम सिड्स प्रा. लि. कंपणीचे सोयाबीन - सम्राट'' व ईतर बियाण्यांचा उल्लेख आहे. मलकापूर तालुक्यातील दुबार पेरणीचे संकट ओढल्या गेलेल्या कास्तकारांच्या जमिनीचे (तहसील विभाग, तालुका कृषी अधिकारी, गट विकास अधिकारी व जि. प. कृषी अधिकारी) यांच्या मार्फत संयुक्त रित्या पंचनामे करण्याचे आदेश तत्काळ करावे. तसेच शेतकऱ्यांना बनावट बियाणे विक्री करणाऱ्या कृषी केंद्र मालक व कंपनीवर कायदेशीर कठोर कार्यवाही त्वरित करावी. आशा आशयाचे निवेदन शिवसेना उबाठा मलकापुर तालुका प्रमुख दिपक चांभारे पाटील यांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांना दिले.

शेतकरी, शेतमजुर यांचा जर न्यायचा–हक्काचा प्रश्न निर्माण होत असेल तर आम्ही कदापी खपून घेणार नाही. मी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना आव्हान करतो की बनावट बियाण्यामुळे जर आपले नुकसान झाले असेल तर आमच्याशी संपर्क साधा अँड. साहेबरावजी मोरे यांच्या मदतीने कायदशीर लढा देण्याचे ठरविले आहे, तसेच मलकापूर उबाठा शिवसेना नेहमी जनसेवेकरिता कटिबद्ध आहे.

दिपक चांभारे पाटील
शिवसेना, तालुकाप्रमुख,

# गैर कायदेशीर सोलर प्लांटला आझाद हिंद ताला ठोकणार

## ओ २ सोलर प्लांट मुद्दा पावसाळी अधिवेशनात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मोताळा दि. ३ :** मोताळ्यातील गैरकायदेशीर रित्या उभा करण्यात आलेल्या ओ २ सोलर प्लांट कंपनी संचालक आणि आरोपींना पाठीशी घालणाऱ्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी,नियमानुसार कायदेशीर तथा प्रशासकीय कारवाई करावी,आरोपींना पुरावे नष्ट करण्यापूर्वी अटक करावे, फिर्यादी बदलून नियमानुसार गुन्ह्यांची नोंद करावी, यासह इतर मागण्यांसाठी आझाद हिंद शेतकरी संघटनेच्या वतीने तीन जुलैला राज्यपाल, मुख्यमंत्री, गृहमंत्री, आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांसह संबंधित विभाग प्रमुखांना ई-मेल द्वारे निवेदन सादर करीत कारवाई करण्याची मागणी केली आहे.

गैर कायदेशीर रित्या उभारण्यात आलेल्या सोलर प्लांटची जिल्ह्यातील एकाही लोकप्रतिनिधीने पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्याची तसदी घेतली नाही. यावर खंत व्यक्त करीत प्रश्न उपस्थित करण्याची जाहीर मागणी आझाद हिंद ने केली आहे. तर आठ दिवसात नियमानुसार कायदेशीर कारवाई न झाल्यास गैर कायदेशीर रित्या सुरू करण्यात आलेल्या ओ २ सोलर प्लांटला टाळा ठोकण्याचा इशारा आझाद हिंद शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. सतीशचंद्र रोठे पाटील यांनी दिला आहे. शासन प्रशासनाला सादर केलेल्या निवेदनामध्ये मोताळा नगरपंचायत अंतर्गत येणाऱ्या बहुचर्चित अनधिकृत ओ २ सोलर प्लांट संचालक आणि नगरपंचायत मोताळाच्या नगराध्यक्ष सह पाच सदस्य आणि कर्मचाऱ्यांवर बनावट दस्तऐवज बनवणे, शासनाची दिशाभूल करणे, मुख्याधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करणे, बनावट शिक्के तयार करणे, प्रकरणी अपराध क्रमांक २८३/२०२५ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे. परंतु सदर गुन्हे नोंदविताना त्यामध्ये भादवी कलम ४७१,१२० ब दाखल नसून मूळ तक्रारदार फिर्यादीला बाजूला सारून स्वतः चौकशी अधिकारीच फिर्यादी झाले आहे. तर फिर्याद नोंदविताना घटनाक्रम ११/०३/२०२३ ते १८/०३/२०२३ असा चुकीचा नोंदविण्यात आला आहे. वास्तविक घटनाक्रम बनावट ना हरकत बनविण्यापासून त्याचा लाभ आणि तक्रार नोंदविणे पर्यंत असणे कायदेशीर दृष्ट्या क्रमाप्राप्त आहे. यासह बनावट ना हरकतवर देण्यात आलेली आर्थिक परवानगी नुकतीच उपविभागीय अधिकारी मलकापूर यांनी अध्यादेशाद्वारे रद्द केली आहे. परंतु सदर परवानगी आदेश रद्द करीत असताना मलकापूर उपविभागीय कार्यालयाची दिशाभूल करणे, फसवणूक करणे प्रकरणी प्रशासकीय तथा कायदेशीर कारवाई करणे सुद्धा कर्मप्राप्त आहे. अद्यापही इतर सह आरोपी यांचा तपास लागलेला नाही मुख्य आरोपींना अटक करण्यात आली नाही. आदी प्रमुख मागण्यांच्या पूर्ततेसाठी आझाद हिंदणे आठ दिवसांचा अल्टिमेट शासन प्रशासनाला देत अनधिकृत ओ २ सोलर प्लांटला ताला ठोकण्याचा इशारा निवेदनातून दिला आहे.

अजिंक्य भारत

आपलं अमरावती

शुक्रवार, दि. ४ जुलै २०२५

## थोडक्यात

### दवाखान्यासमोरून दुचाकी लंपास

**अमरावती :** कामानिमित्त आलेल्या अनिकेत नारायण श्रीनाथ (२७, रा. अमरावती) यांनी त्यांची दुचाकी (एमएच २७ - सीजे ५४४८) समर्थ चौकातील एका दवाखान्यासमोर उभी केली. अज्ञाताने ती चोरून नेली. तिची अंदाजे किंमत ३५ हजार रुपये आहे. याबाबत राजापेठ पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास राजापेठ पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ पोलीस करीत आहे.

### अवैध दारू विक्रेत्यावर पोलिसांची कारवाई

**अमरावती :** शेगाव नाका चौकात अंडा गाडीवर एक जण अवैधरित्या देशी दारूची विक्री करीत असल्याची गुप्त माहिती गाडगे नगर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी कारवाई करीत रविंद्र सुखदेवराव वरघट (५२) याच्याविरुद्ध ६५ (ई) इंतर्गत गुन्हा दाखल करीत त्याच्या ताब्यातून एकूण १ हजार ४७० रुपयांची देशी दारू जप्त केली. पुढील तपास गाडगेनगर पोलीस करीत आहे.

### वलगाव पोलिसांची वरली जुगारावर धाड

**अमरावती :** चांदूर बाजार फाट्यावर एका दुकानामागे जुगार सुरू असल्याची गुप्त माहिती वलगाव पोलिसांनी मिळाली. त्यांनी कारवाई करीत रोख ७६० रुपये जप्त करीत सैय्यद मोहसीन सैय्यद मुसा (४८) याच्यावर जुगार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला.

### रेल्वे स्टेशन चौक परिसरात लुटले एकाला

**अमरावती :** अकोला येथून आलेल्या एकाला रेल्वे स्टेशन चौकात सोडून देण्याच्या बहाण्याने दोघांनी १७ हजारांनी लुटल्याची घटना रेल्वे स्टेशन चौकात घडली. याबाबत पंकज कमलकिशोर अग्रवाल (४२, रा. अकोला) यांनी कोतवाली पोलिसात थाबाचत तक्रार दिली. घटनेच्या वेळी फिर्यादीने दोन अज्ञातांना रेल्वे स्टेशन कुठे आहे याबाबत विचारणा केली. त्यांनी त्याला दुचाकीवर बसवून चौकात सोडून देण्याची बतावणी केली. मात्र, त्याला एका गल्लीत नेत तोंड दाबून त्याच्याजवळील १७ हजार रुपये चोरून पळ काढला पोलिसांनी दोन अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### विषारी औषध प्राशन करून युवकाची आत्महत्या

**वरूड :** वरूड ते नागपूर रोडवरील रोशनखेड गावाजवळ असणाऱ्या रेल्वेगेट जवळील गुल्हाने ले-आऊट परिसरात बुधवार २ जुलै रोजी सकाळच्या सुमारास एका युवकाचा मृतदेह आढळून डे आल्याने एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच नागरिकांची घटनास्थळी गर्दी दिसून आली. घटनास्थळी ग्लायसेल नावाचे शेतीसंबंधित विषारी औषध व त्यांची दुचाकी मिळून आल्याने ही हत्या नसून आत्महत्या असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. रा. हातुर्णा अशी या आत्महत्या केलेल्या युवकाची ओळख पटली असून त्याने विषारी औषध प्राशन करून आपली जीवनयात्रा संपवल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

### नानासाहेब धुळे यांना बंधू शोक

**अमरावती :** अजिंक्य भारतचे अचलपूर तालुका प्रतिनिधी तथा लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे अचलपूर तालुका अध्यक्ष नानासाहेब धुळे यांचे कनिष्ठ बंधू भाऊसाहेब धुळे वय ४० यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनमुळे नानासाहेब धुळे यांच्या कुटुंबावर अचानक कोसळलेल्या दु:खात अजिंक्य भारत परिवार, अमरावती जिल्हा पत्रकार महासंघ सामील आहे. त्यांना ईश्वर या दु:खातून लवकर सावरो. तसेच संघटने तर्फे मृतक भाऊसाहेब धुळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# पेट्रोलने भरलेल्या टँकरने महिलेला चिरडले!

## महिलेचा जागीच मृत्यू : उड्डाण पुलावर झाला अपघात

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३ :** शहरातून गेलेल्या उड्डाण पुलावर आज दुपारच्या सुमारास भीषण अपघात झाला. यात पेट्रोलने भरलेल्या टँकरने दुचाकीला जोरदार धडक देत महिलेला उडविले. यात दुचाकीस्वार महिलेचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर उड्डाण पुलावर वाहतूक काही वेळ खोळंबली होती. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत वाहतूक सुरळीत केली.

शहरातील इर्विन चौक ते राजकमल चौकापर्यंत असलेल्या उड्डाण पुलावर ही अपघाताची घटना घडली. या अपघातात वर्षा खाळगे असे या मृत महिलेचे नाव असून अमरावती शहरातील अर्जुन नगर परिसरातील रहिवासी आहे. दरम्यान महिला स्कुटीने जात असताना पेट्रोलने भरलेल्या ट्रॅकरने त्यांच्या गाडीला जोरदार धडक दिली. या धडकेत महिला खाली पडल्यानंतर ट्रॅकरच्या चाकाखाली सापडल्या व त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आला असून असून कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला. तर पोलिसांनी अपघातग्रस्त ट्रॅकर ताब्यात घेतला असून सिटी कोतवाली पोलीस पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केल्या जात आहे.






## लिफ्ट देण्याचा बहाना करून रक्कम हिसकविणारा अटकेत



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३ -** लिफ्ट देण्याच्या बहाण्याने एका व्यापाऱ्याला गोड बोलून त्याच्याकडील १७ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना अमरावती शहरातील रेल्वेस्थानक परिसरात घडली. या प्रकरणी सिटी कोतवाली पोलिसांनी एका आरोपीला अटक करून त्याच्याकडून रोकडसह गुन्ह्यात वापरलेली मोपेड जप्त केली आहे.

फिर्यादी पंकज कमलकीशोर अग्रवाल (वय ४२, अकोला) यांनी १ जुलै रोजी सिटी कोतवालीत तक्रार दाखल केली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० जून रोजी सकाळी सुमारे ७ वाजता सोयाबीन घेण्यासाठी मालकाने त्यांना १७ हजार रुपये दिले होते. मात्र, पावसामुळे खरेदी न झाल्याने त्यांनी ती रक्कम परत आणण्याचे ठरवले. संध्याकाळी ६ वाजता अमरावती बसस्थानकाजवळील परिसरात असताना दोन अनोळखी व्यक्ती त्यांच्याजवळ आले. त्यांनी त्यांच्याशी ओळख करून देत रेल्वे स्थानकाच्या दिशेने घेऊन जाण्याची तयारी दर्शवली. त्यामुळे पंकज हे त्यांच्यासोबत पांढऱ्या रंगाच्या एक्सेस कंपनीच्या मोपेडवर (क्रमांक एमएच २७ सीएस ५७६९) बसले. त्यानंतर त्यांनी मोपेड वाहन उस्मानिया मशिदीपासून हमालपुरा रोडकडे नेले आणि एका गल्लीमध्ये पोहोचल्यावर मागे बसलेल्या आरोपीने त्यांना झटकून खाली फेकले आणि दुसऱ्या साथीदारासोबत त्यांच्याकडील रोकड जबरदस्तीने काढून घेऊन दोघे पळून गेले. फिर्यादीने प्रसंगावधान राखत त्या मोपेडचा फोटो मोबाईलमध्ये टिपला होता. याच आधारे पोलिसांनी तपास करून आबीद खान आदिल खान (वय ३५, रा. नालसापुरा, अमरावती) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून १७ हजार रुपयांची रोख रक्कम व अंदाजे ७० हजार रुपये किमतीची मोपेड असा एकूण ८७ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

## सोमवारी महिला लोकशाही दिन

**अमरावती -** जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार ७ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. महिलांनी त्यांच्या तक्रारी विहित नमुन्यात व आवश्यक कागदपत्रांसह सादर कराव्यात. तसेच लोकशाही दिनाला प्रत्यक्ष उपस्थित राहावे.

## बडनेरा पोलिसस्टेशन हद्दीत दोन घरे, तर कोतवालीत फोडले गोदाम

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३ :** अज्ञात चोरट्यांनी बडनेरा पोलीस क्षेत्रात दोन घरे, तर कोतवाली पोलीस ठाण्यांतर्गत एक गोदाम फोडून एकूण ५ लाख ६ हजार २६५ रुपयांचा ऐवज लंपास केला. पोलिसांनी या घटनेची नोंद घेतली असून चोरट्यांचा शोध सुरू आहे. या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भानखेडा खुर्द येथील संजय अंबादास शिंदे (३५) यांनी काही दिवसांपूर्वी त्यांच्या एका नातेवाईकाकडून २ लाख रुपये उसणे घेतले होते. ते पैसे तसेच २० ग्रॅम सोन्याची चैन, १४ ग्रॅमच्या दोन अंगठ्या व १० ग्रॅमची सोन्याची पोथ असा एकूण १ लाख ६२ हजारांचे दागिने घरी ठेवून ते कामानिमित्त परिवारासह बैतूल (म. प्र.) येथे गेले. दरम्यान त्यांच्या चुलत भावाने त्यांना घरी चोरी झाल्याची माहिती दिली. त्यांनी घरी येवून पाहणी केली असता, अज्ञाताने घराचा कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश करीत कपाटातील एकूण २ लाख ६२ हजारांचा ऐवज चोरून नेल्याचे लक्षात आले. याबाबत त्यांनी बडनेरा पोलिसात तक्रार नोंदवली. चोरीची दुसरी घटनाही याच पोलीस ठाण्यांतर्गत राय आशियाना, जुनी वस्ती येथे घडली. घरी कुणीही नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करीत बेडरुममधील लोखंडी आलमारीत ठेवलेले सामान अस्ताव्यस्त करीत रोख ९ हजार ५०० रुपये, तसेच सोने व चांदीचे दागिने असा एकूण ५१ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. याबाबत फिर्यादी आशिष सुभाषराव गजभिये (३३) यांच्या नातेवाईकाने त्यांना माहिती दिली.

# शहरात ऑनलाईन लॉटरीचा सट्टा जोरात!

## तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दररोज लाखोंची उलाढाल!

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.३ -** शहरात काही दिवसांपूर्वी राजकमल चौकात ऑनलाईन लॉटरीच्या दुकानावर पोलिसांकडून धाड टाकत मोठे रॅकेट उघडकीस आणले होते. मात्र त्याच वेळी 'ऑनलाईन लॉटरी' या नावाखाली 'भिंगरी सट्टा' हा जुगाराचा नवीन प्रकार शहरात जोरात सुरू असल्याचे समोर आले आहे. हा सट्टा दर एक मिनिटाला 'ओपन' केला जातो आणि तो कंप्युटरच्या सहाय्याने भिंगरी फिरवून चालवला जातो. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून भिंगरीवर पैसे लावण्याचा हा सट्टा आता खुलेआम चालत असून, शहरातील अनेक भागांत या व्यवसायाची मुळे खोलवर गेलेली दिसत आहेत.



### भिंगरीसाठी खास सॉफ्टवेअर

या भिंगरी सट्ट्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे दर 60 सेकंदांनी सट्टा 'ओपन' होतो. एका संगणकावर भिंगरी फिरवली जाते आणि त्यावर नागरिकांकडून आकडे लावले जातात. यामध्ये काही ठिकाणी मोबाइल ॲप्सचा, तर काही ठिकाणी खास बनवलेल्या सॉफ्टवेअरचा वापर करून हे 'डिजिटल जुगार' चालवला जातो. दहा ते वीस रुपयांपासून ते हजारो रुपयांपर्यंतचे सट्टे लावले जात असून, काहीजण यामध्ये एकाच दिवशी हजारोंचा नफा मिळवत आहेत तर काहीजण आपली संपूर्ण कमाई गमावत आहेत.

### लाखोंची नाही, कोटींची उलाढाल

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दररोज या भिंगरी सट्ट्यातून लाखोंची नाही तर कोटी रुपयांची उलाढाल होत आहे. सट्टा चालकांकडून 'कमिशन'च्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर रक्कम गोळा केली जाते. काही सट्टा चालक तर अलगद मार्गाने पैशाची अफरातफर करत ब्लॅक मनी वळवण्याचं कामही करत असल्याचा संशय व्यक्त होत आहे. या सट्ट्याविरोधात काही ठिकाणी पोलिसांनी धाडी टाकून कारवाई केली, मात्र अनेक ठिकाणी हा व्यवसाय काही स्थानिक राजकीय प्रतिनिधीच्या संरक्षणाखाली सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. अशा ठिकाणी पोलिसांची कोणतीही ठोस कारवाई दिसून आलेली नाही. त्यामुळे हा सट्टा अव्याहतपणे सुरू राहिला असून अनेक तरुण, विशेषत: बेरोजगार वर्ग यामध्ये अडकलेला आहे.

### अनेक कुटूंब उद्ध्वस्त

या सट्टयामुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाली असून, काही ठिकाणी तरुणांनी कर्ज काढून सट्टयात पैसे गुंतविले आणि नंतर आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले असल्याच्या घटनाही राज्यात घडल्या आहेत. त्यामुळे सट्टा चालवणाऱ्यांवर केवळ धाडी न टाकता, त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक झाले आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पुन्हा सरकारची डोकेदुखी वाढणार!

## ७ जुलै पासून 'सातबारा कोरा कोरा कोरा' यात्रेला प्रारंभ | बच्चू कडूंच्या नेतृत्वात शेतकरी हितासाठी संघर्ष यात्रा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३ :** राजकारणापेक्षा शेतकऱ्यांचे प्रश्न मोठे मानणाऱ्या बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा रस्त्यावर उतरून सरकारला आव्हान दिलं आहे. ७ जुलै रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांची जन्मभूमी पापळ येथून सुरू होणारी '७/१२ कोरा कोरा कोरा यात्रा' ही केवळ पदयात्रा नसून, ती शेतकरी व कष्टकरी वर्गाच्या न्यायहक्कासाठीचा ऐतिहासिक आवाज ठरणार आहे.

या ७ दिवसीय यात्रेचा शुभारंभ बुधवार दि. ७ जुलै रोजी पापळ येथून होणार असून, १४ जुलै रोजी चिलगव्हाण (स्व. साहेबराव करपे पहिल्या शेतकरी आत्महत्येचे गाव) येथे या यात्रेचा समारोप होईल. १३८ किलोमीटरचे अंतर पार करताना ही यात्रा तब्बल २३ गावांमधून मार्गक्रमण करणार असून, प्रत्येक ठिकाणी सभा, चर्चा, जनसंवाद व आंदोलनात्मक थांबे नियोजित आहेत.अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सत्ताधाऱ्यांकडून मोठी आशा होती मात्र या सरकारने शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फेरून शेतकऱ्यांना संकटात टाकले आहे.

जगाचा पोशिंदा आजही अनेक संकटांचा सामना करून आपल्या कुटुंबाचा होईल तसा उदरनिर्वाह करत आहे.सरकार काहीतरी मार्ग काढेल या भ्रमात ते आहेत. काही शेतकरी मात्र दुर्दैवाने आजही आत्महत्येसारखा निर्णय घेऊन आपले जीवन संपवित आहेत त्यामुळे शेतकरी वर्गाला आता बच्चू कडू यांच्या या यात्रेकडून आस लागलेली असून जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण विदर्भातून शेतकरी वर्ग या यात्रेमध्ये सामील होणार आहे.



पदयात्रेच्या माध्यमातून केवळ नारे देण्यापेक्षा ग्रामीण भागातील कणाहीन झालेल्या प्रश्नांना पुन्हा एकदा धार देण्याचा प्रयत्न बच्चू कडू करत आहेत. यात्रा जरी १३८ किलोमीटरची असली, तरी शेतकऱ्यांच्या संघर्षाचा मार्ग यापेक्षा कितीतरी मोठा व कठीण आहे. आता 'सातबारा कोरा कोरा'चा नारा केवळ घोषवाक्य न राहता, परिवर्तनाची दिशा ठरेल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. प्रत्येक गावात स्थानिक प्रश्न, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे कुटुंबीय, विधवा, बेरोजगार तरुण, मनरेगा कामगार, मेंढपाळ व मच्छीमार यांच्या स्वतंत्र धोरणावर, वंचितांचे संघटन यावर देखील चर्चा होणार आहे.

### असा असणार यात्रेचा मार्ग

- ७ जुलै : पापळ ते दोनद - सुसंवाद सभा
- ८ जुलै : उंबरडा बाजार, लोहा, तरगोडी, मानकी येथे मुक्काम
- ९ जुलै : मानकी, वखार, तळेगाव, दारव्हा - प्रश्नमंजुषा, संवाद
- १० जुलै : वखार, तिवरी, लाइखिंड - जनआव्हान, सभा
- ११ जुलै : तिवरी, चिरकुटा, तुपटाकळी - सभा व मुक्काम
- १२ जुलै : तुपटाकळी, बसमतनगर, काळी दौलत - प्रश्नसत्र
- १३ जुलै : काळी दौलत, माकडखिंडी, गुंज - शेवटचे सत्र, समारोप
- १४ जुलै : गुंज ते चिलगव्हाण - ऐतिहासिक समारोप सभा

### शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

७ जुलै पासून सुरू होणाऱ्या सातबारा कोरा कोरा कोरा या यात्रेमध्ये बच्चू कडू यांच्या शेतकऱ्यांसाठी काही प्रमुख मागण्या असणार आहेत. ज्यामध्ये सक्तीची कर्जवसुली त्वरित थांबवावी,१०० टक्के कर्जमाफी लागू करावी,आत्महत्या रोखण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावेत,मनरेगा मजुरीत वाढ व ग्रामीण रोजगार विस्तार करावा,दिव्यांग, विधवा, युवकांसाठी नोकरी व सुरक्षा योजनांची अंमलबजावणी , मेंढपाळ व मच्छिमार यांच्या समस्या व धोरण , ग्रामपंचायत कर्मचारी ई. मागण्या घेऊन बच्चू कडू हे शासनाला सळो की पळो करून सोडणार आहेत.

## माजी आमदार विरेंद्र जगताप यांच्यावर असंवैधानिक भाषेचा वापर केल्याचा आरोप



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि.३ :** माजी आमदार विरेंद्र जगताप यांनी २ जुलै २०२५ रोजी धामणगाव रेल्वे तहसील कार्यालयात निवेदन देण्यासाठी भेट दिली असता, त्यांनी काही अधिकाऱ्यांशी असंविधानिक व धमकीच्या स्वरूपात भाषा वापरल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेल्या सामूहिक निवेदनात, जगताप यांनी फॉर्म ७ बाबत झालेल्या मतदारांच्या नोंदीवरून उपस्थित अधिकाऱ्यांना शिवीगाळ करत धमकावल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. विशेषत: निवडणूक नायब तहसीलदार वसंत पडवळ यांना उद्देशून केलेली भाषा अत्यंत आक्षेपार्ह असल्याचे निवेदनात नमूद आहे. तहसील कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत अशा प्रकारची असंविधानिक भाषा वापरणे हा अत्यंत गंभीर मुद्दा असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या प्रकरणी प्रशासन काय भूमिका घेतं, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे. जगताप यांनी मी याच भाषेत बोलणार तुम्ही ३५३ अंतर्गत केस करून दाखवा अशी धमकी दिली. निवेदन देतेवेळी तहसीलदार विजय लोखंडे, तहसीलदार संजय करकल, तहसीलदार रविंद्र कांडजे, तहसीलदार पूजा माटोडे, तहसीलदार मयूर कळसे, तहसीलदार अभय घोरपडे, रामदास शेळके, अजितकुमार येते, एल.एस. तिवारी, व्ही.बी. वानखडे, सुधीर धावडे आदि उपस्थित होते.



# ७, ८ जुलैला ७२५ ग्रा.पं.मध्ये सरपंचपदांसाठी आरक्षण सोडत

## ओबीसी प्रवर्गाच्या ५४ जागा वाढणार | धारणी, चिखलदरा तालुक्यातील एसटी प्रवर्गाला धक्का नाही

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३ :** जिल्ह्यात एप्रिलमध्ये काढण्यात आलेले सरपंचपदाचे आरक्षण शासनाकडून रद्द करण्यात आल्याने आता नव्याने आरक्षणाची प्रक्रिया राबविली जात आहे. १२ तालुक्यांतील ७२५ ग्रामपंचायतींमध्ये ७, ८ जुलै रोजी कार्यक्रम लावण्यात आला आहे. नव्या आरक्षणात ओबीसीच्या जागा ५४ ने वाढणार आहे. तर खुल्या प्रवर्गातील जागा घटणार आहे. सपाटीसह धारणी आणि चिखलदरा या दोन तालुक्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील जागा कायम ठेवून नव्याने आरक्षण जाहीर केले जाणार आहे.

जिल्ह्यातील ८४१ ग्रामपंचायतींमध्ये मागील पंचवार्षिकात २०२० ते २०२५ पर्यंत सरपंच आरक्षण काढले होते. याची मुदत ५ मार्च रोजी संपुष्टात आल्याने जिल्ह्यात २३ व २४ एप्रिल रोजी १४ तालुक्यांतील ८४१ ग्रामपंचायतींमध्ये सरपंचपदाकरिता आरक्षण सोडत काढण्यात आली. दरम्यान, न्यायालयाच्या एका निर्णयामुळे ओबीसी प्रवर्गाच्या जागा



२७ टक्क्यांच्या प्रमाणात घेण्याचे आदेश देण्यात आले आहे. त्यामुळे यापूर्वी एप्रिलमध्ये घोषित करण्यात आलेले सरपंचपदाचे आरक्षण शासनाकडून रद्द करण्यात आले आहे. आता सरपंचपदाकरिता पुन्हा नव्याने प्रक्रिया राबविली जाणार आहे. धारणी आणि चिखलदरा या दोन तालुक्यात ११६ ग्रामपंचायती असून येथे अनुसूचित जमातीकरिता सरपंचपद राखीव असणार आहे. येथील आरक्षणाला कोणताही धक्का न लावता तसेच सपाटीवरील एसटी व एससी प्रवर्गाचे आरक्षण कायम ठेवून नवे आरक्षण काढले जात आहे. या आरक्षणात जिल्ह्यात ओबीसीच्या 54 जागा वाढणार आहे. त्यामुळे ओबीसीला 196 तर खुला प्रवर्गातील जागा घटून 338 होणार आहे. 7 जुलै रोजी सहा आणि 8 जुलै रोजी सहा या प्रमाणे 12 तालुक्यांतील आरक्षण सोडत काढली जाणार आहे.

### आरक्षणाचे वेळापत्रक

अमरावती, भातकुली, चांदूर रेल्वे, मोर्शी, दर्यापूर व अचलपूर या सहा तालुक्यांतील आरक्षण सोडत ७ जुलै रोजी काढली जाणार आहे. तर नांदगाव खंडेश्वर, तिवसा, धामणगाव रेल्वे, वरूड, अंजनगाव सुर्जी व चांदूरबाजार या तालुक्यांत 8 जुलै रोजी आरक्षण सोडत काढली जाणार आहे. याकरिता नियंत्रण अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी व प्राधिकृत अधिकारी म्हणून तहसीलदार कामकाज पाहणार आहे.

# महिनाभरात ५ लाख ६२ हजार ६२० हेक्टरवर पेरणी आटोपली

## सोयाबीनची सर्वाधिक पेरणी | कापसाची पेरणी दुसऱ्या क्रमांकावर

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३ :** जिल्ह्यात जूनमध्ये ५ लाख ६२ हजार ६२० हेक्टरवर पेरणी आटोपली आहे. याची टक्केवारी ८२ टक्के आहे. लागवडीमध्ये शेतकऱ्यांनी सोयाबीनलाच पहिली पसंती दर्शवित २ लाख १३ हजार ६०४ हेक्टरवर पेरणी केली आहे. दुसऱ्या क्रमांकावर कापसाची १ लाख ९८ हजार २९८ हेक्टरवर पेरणी झाली आहे.

जिल्ह्यात मान्सून सुरू झाला. परंतु, सुरुवातीला दमदार पावसाने हजेरी लावली नाही. १५ जूननंतर मात्र काही तालुक्यांत पावसाने हजेरी लावली आणि रखडलेल्या पेरणीला पुन्हा गती आली. मागील आठवड्यात ५० टक्क्यांवर असलेला पेरणीचा आकडा ८२ टक्क्यांवर पोहोचला आहे. ९२ पैकी बऱ्याच महसूल मंडळांत समाधानकारक पाऊस झाल्याने तेथे ९० टक्क्यांच्यावर पेरणी आटोपली आहे. धारणी, अमरावती आणि चांदूर रेल्वे या तीन तालुक्यांत ९० टक्क्यांच्यावर पेरणी झाली आहे. अचलपूर तालुक्यात सर्वात कमी ६१ तर तिवसा आणि दर्यापूर तालुक्यात



केवळ ६८ ते ६५ टक्के पेरणी झाली आहे. त्यामुळे या भागांत दमदार पावसाची प्रतीक्षा लागली आहे. जिल्ह्यात ६ लाख ८ हजार ९९२ हेक्टरवर पेरणीचे नियोजन केले असताना महिनाभरात ५लाख ६२ हजार ६२० हेक्टरवर पेरणी आटोपली आहे. यामध्ये सोयाबीन सर्वाधिक २ लाख १३ हजार ९२१ हेक्टरवर तर कापसाची १ लाख ९८ हजार २९८ हेक्टरवर पेरणी करण्यात आली आहे.

### तालुकानिहाय पेरणीची टक्केवारी

धारणी ९५.८१, चिखलदरा ८७.४४, अमरावती ९१.७५, भातकुली ८६२, रेल्वे ९२.१, तिवसा ६५.७९, मोर्शी ८६.१७, वरुड ८०.१५, दर्यापूर ६८.६६, अंजनगाव सुर्जी ९०.८, अचलपूर ६१.१३, चांदूरबाजार ८३.०१, धामणगाव रेल्वे ८७.७०, एकूण ८२.३८

# विद्यापीठात ‘ब्राह्मी लिपी’ कार्यशाळेचे आयोजन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संस्कृत विभागातर्फे दि. १४ व १५ जुलै, रोजी राष्ट्रीय लिपी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

भारताच्या प्राचीन लिपींचा अभ्यास करण्याची ही एक सुवर्णसंधी असून, सदर कार्यशाळेत ब्राह्मी लिपीचे वाचन व लिखाण शिकवले जाईल. ही एक विनामूल्य ऑफलाइन कार्यशाळा असून, यासाठी नावनोंदणी सुरु झाली आहे. केवळ ५० जागा उपलब्ध असल्याने इच्छुक विद्यार्थ्यांनी त्वरित आपली जागा निश्चित करावी, असे आवाहन संस्कृत विभागाच्या समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख यांनी केले आहे.

या कार्यशाळेत सहभागी होऊन भारताच्या समृद्ध लिपी परंपरेची माहिती करून घ्यावी व कार्यशाळेचा जास्तीतजास्त लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे. अधिक माहितीकरीता समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

# वन्यप्राण्यांमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई द्यावी

## शेतकऱ्यांचे मुख्य वनसंरक्षक व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि. ३ :** या वर्षी वरुण राजा शेतकऱ्यांवर प्रसन्न असल्याने सुरळीत पावसामुळे पेरलेल्या बि-बियाण्यांचे वेळवरच शेपट्यात रुपांतर झाले. मात्र वन्यप्राण्यांनी मिळेल त्या मार्गाने शेतांमध्ये शिरुन या रोपट्यांची तुडवण केली व यामुळे शेतकऱ्यांच्या लाखो रुपये किंमतीच्या बि-बियाण्यांचे नुकसान झाले. याबाबत शेतकऱ्यांनी आ.रवी राणा यांचे कडे पाठपुरावा केला असता. शेतकऱ्यांच्या पिक नुकसान भरपाईला देण्याचे आश्वासन आ.रवि राणा यांनी दीले.

बडनेरा मतदार संघात येणाऱ्या पार्डी (देवी), उदखेड, वडगाव जिरे,अऱ्हाड कुऱ्हाड, भानखेड, मोगरा, गोविंदपुर , भानखेड (खु)



मोगरा, हातला, अमरापुर, कस्तुरा , वदड, मासोद , इंदला , पिंपळखुटा, कोंडेश्वर इत्यादी भागातील ४ हजार हेक्टर शेतजमीन पिकाअभावी विरान पडली आहे. या भागात विस्तृत वनक्षेत्र असल्याने वन्यप्राण्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. याकरिता वन्यप्राण्यांच्या व शेतजमीनीच्या संरक्षणार्थ वनविभागाने वनक्षेत्राकरीता तार कंपाऊडतर तर शेतीकरिता कंपाउंडची मागणीही आमदारांनी वनाधिकारी व मुख्य वनसंरक्षक अधिकाऱ्यांकडे केली आहे. शेतकऱ्यांना त्वरीत नुकसान भरपाई मिळाल्यास शेतकऱ्यांना दुबार पेरणी करता येईल. तसेच त्याचबरोबर वनक्षेत्र व शेतीकरिता संरक्षण कंपाउंडचे नियोजनही तेवढेच महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांकरीता याबाबींची पूर्तता वेळेवर झाल्यास युवा स्वाभिमान संघटना आक्रमक पवित्रा घेणार असल्याचेही वक्तव्य युवा -स्वाभीमान संघटनेचे सर्वेसर्वा रवी राणा यांनी व्यक्त केले आहे. यावेळी निवेदन देताना युवा स्वाभिमान तालुका अध्यक्ष अजय घुले, उपाध्यक्ष उमेश डकरे, पार्डी सरपंच अक्षय मेश्राम, सरपंच मोगरा -कस्तूरा सुधाकरराव काळे , भानखेड (खु.) सरपंच नितनवरे, सरपंच भानखेडा ( बु.) गुणवंत मेश्राम, उद्धवराव कराळे, मनोहर मारोडकर, प्रवीण अरक, दिलीप पाटिल, जगदीश अंबडकार अजाबराव गंगात्रे, सुरेश इंदाने व

अंजनगाव बारी जि .प.सर्कल मधील सर्व शेतकरी मंडळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धारणी, दि. ३ :** जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा कुसुमकोट बु. येथे 26 जून 2द्य रोजी थोर समाजसुधारक छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती विजया झाडे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यांच्यासह शिक्षक शिवाजी क्षिरसागर, पंचफुला मुंढे, करुणा गुजरकर, अनिता भिलावेकर, योगिता वानखडे व शितल लहाने यांनी पूजनात सहभाग घेतला. मुख्याध्यापिका विजया झाडे यांनी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर भाष्य करताना त्यांच्या शैक्षणिक योगदानाचा आढावा घेतला. त्यांनी मोफत वसतीगृहे, खेड्यापाड्यातील



शाळा, शिक्षण सक्तीचे कायदे, तसेच सतीप्रथा, हुंडाप्रथा यांसारख्या सामाजिक कुप्रथांचे उच्चाटन कसे केले, याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यांप्रमाणेच मुख्याध्यापिका विजया झाडे कार्यरत असून त्या अतिदूरगम आदिवासी भागात कार्यरत असताना आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना शाहू महाराजांसह थोर पुरुषांच्या कार्याचे महत्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना समजून सांगतात. ते एवढ्या करीताच की जसे राष्ट्रपिता महात्मा गांधींनी सांगितले होते की बाल्यअवस्थेत लहान मुलांवार केलेले संस्कार टिकून राहतात त्या प्रमाणे मुख्याध्यापिका विजया झाडे ह्या प्रत्येक महापुरुषांच्या जयंत्या आपल्या शाळेत उत्साहाने साजऱ्या करतात हे उल्लेखनीय! त्यांच्या हातून घडून गेलेले विद्यार्थी आजही आदराने त्यांचे नाव आजही घेतात हे विशेष! कार्यक्रमाचे संचालन पंचफुला मुंढे यांनी केले तर आभार प्रदर्शन अरुणा गुजरकर यांनी मानले. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# प्रयोगशील शेतकऱ्यांचा कृषी विभागाकडून सन्मान

## पंचायत समीतीमध्ये कृषी दिन साजरा

अजिंक्य भारत

महाराष्ट्र शासन चे कृषी विभाग पंचायत समिति,व तालुका कृषी अधिकारी,अंजनगांव सुर्जी यांचे संयुक्त विद्यमाने हरीतक्रांतीचे प्रणेते कै. वसंतराव नाईक, माजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे जयंती निमीत्य व कृषी दिन दि.१ जुलै रोजी तालुक्यातील महीला व पुरुष शेतकऱ्याचा सन्मान करण्यात आला.

शेतीमध्ये विवीध प्रयोग व नवनवीन पध्दतीचा अंगीकार करत भरघोस विक्रमी उत्पादन घेत तथा आधुनिक शेतीशास्त्रांचा अंगीकार करत शेतीमध्ये आर्थीक उत्पादनवाढीसह सुलभ संकंल्पना तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी रुजवल्या त्या शेतकऱ्यांचा यावेळी सन्मानपत्र शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला ज्यात तालूक्यातील राहूल सहारे, पंकज साबळे, आशीक अन्सारी, विकी खारोळे, संजय काळमेघ, निखील वरोकार, साहेबराव राऊत, उमेश काकड, नूतन राऊत, प्रविण




बोके,मंगेश बाभुळकर,कविता राऊत,लता ढोकणे,रविद्र वानखडे,हे शेतकरी सन्मानास पात्र ठरले कार्यक्रमाचे तर कृषी सहायक स्वपनील पुंडकर,किशोर पद्मने ,अजीत चित्रकार यांचा सुद्धा सत्कार यावेळेस करण्यात आला.ता. कृषी अधिकारी नरेंद्र वसुकर यांनी शेतकऱ्यांना शेती क्षेत्रातील कार्य निश्चितच कौतुकास्पद व ईतरांसाठी प्रेरणादायी आहे.

शेती क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल कृषी दिनाचे औचित्य साधून ज्या प्रयोगशिल शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात येत आहे त्यामाध्यमातुन ईतर अनेक शेतकऱ्यांना सुद्धा त्यातुन स्फुर्ती मिळेल असे मनोगत व्यक्त करीत पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना पुढील वाटचालीकरीता हार्दिक शुभेच्छा दिल्या यावेळी सहायक गटविकास अधिकारी कल्पना जायभाए,तालूका कृषी अधिकारी नरेंद्र वसूकर,निलेश घोडेराव आत्मा अध्यक्ष,कृषि अधिकारी अश्विन राठोड ,दिपक राऊत सुनील सुर्यवंशी हे आधीकारी ऊपस्थित होते तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठि तालूका कृषी कार्यालय व पंचायतसमीतीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# वारसांना अपघात विम्याचा १.२१ कोटींचा धनादेश सुपूर्द



अजिंक्य भारत

महाराष्ट्र पोलीस दलाचे पोलिस कॉन्स्टेबल संदीप देविदासराव चौधरी यांच्या वारसांना अपघात विम्याचा १ कोटी २१ लाख रुपयांचा धनादेश ॲक्सिस बँक शाखा अंजनगाव तर्फे सूपूर्द करण्यात आला.

पूर्वी अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी आणि मृत्यूपूर्व चांदूरबाजार पोलिस स्टेशन ला कार्यरत असलेले स्व.संदीप देविदासराव चौधरी यांचे इलेक्शन ड्युटी वरून परत येतांना दिनांक ०६ नोव्हेंबर २०२४ रोजी तळेगाव ठाकूर येथे अपघाती निधन झाले होते.

संदीप चौधरी यांचे सॅलरी अकाउंट ॲक्सिस बँकेत असल्या मुळे त्यांच्या वारसांना अपघाती विमा संरक्षण म्हणून १ कोटी २१ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

पोलिस स्टेशन अंजनगाव सूर्जी चे पोलीस निरीक्षक श्री प्रकाश अहिरे सर व ॲक्सिस बँकेचे अमरावती विभागीय प्रमुख श्री निखिल नाईक यांच्या हस्ते धनादेश वारसदार पत्नी कोमल चौधरी व वडील देविदास चौधरी यांना २ जुलै २०२५ ला पोलिस स्टेशन अंजनगाव सुर्जी येथे सुपूर्द करण्यात आला.यावेळी पोलिस कर्मचारी वृंद अंजनगांव सुर्जी तसेच एक्सिस बैंक शाखा प्रमुख विजय जेठाणी, शाखा सेल्स मॅनेजर चेतन डोंगरे, ऑपरेशन मॅनेजर धनश्री सातव, जयेश अजमिरे, चक्रधर लोखंडे , प्रणव कुलट ,स्वप्नील बोरोडे ,जयदीप काळमेघ , प्रताप बनसोड उपस्थित होते.

# प्रवीण शेळकेने १७३५२ फूट उंच माउंट फ्रेंडशिप शिखर केले सर

अजिंक्य भारत

अंजनगाव सुर्जी येथील रहिवासी असलेला प्रवीण शेळके हा पुलगाव येथील २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसीअंतर्गत येणाऱ्या इंडियन मिलिटरी स्कूल येथील सीटीओ प्रा. प्रवीण रमेश शेळके यांनी हिमालय पर्वतातील माउंट फ्रेंडशिप शिखर ज्याची उंची ५२८९ मीटर (१७३५२ फूट) मायनस १० डिग्री सेल्सिअसमध्ये यशस्वीरीत्या सर केले.

त्याचा प्रवासाचा शुभारंभ हा आंतरराष्ट्रीय योग दिवस २१ जून रोजी कुल्लू मनाली येथील सोलंग व्हॅली येथून सुरुवात झाली होती यामध्ये प्रवीण सह आलोक आडे, अनिकेत खोब्रागडे व श्रेयस पोहनकर या तीन आजी-माजी विद्यार्थ्यांसह सहभाग घेतला होता. मोहिमेमध्ये उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, राजस्थान, बिहार, केरळ राज्यातील पाच जणांनी सहभाग नोंदविला होता.

**पाच दिवसांचा खडतर प्रवास**



सतत तीन दिवस पडलेला पाऊस व अतिशय खराब वातावरण असूनही बेस कॅम्प, कॅम्प वन, समीट कॅम्प, असे कॅम्प लावत माउंट फ्रेंडशिप हे खडतर शिखर करण्याकरिता तब्बल पाच दिवस लागले. या मोहिमेला इंडियन माउंटेनिरिंग फाउंडेशन दिल्लीची मान्यता प्राप्त झालेली होती. प्रा. शेळके यांनी याआधी माउंट चंद्रभागा 14, माउंट युनम असे ६००० मीटरच्यावर उंची असलेले शिखर सर केलेले आहे. प्रा. शेळके आपला शिक्षकीपेशा सांभाळत विद्यार्थ्यांना साहसी उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी सतत प्रेरणा देत असतात. यावेळी सुद्धा त्यांनी अनिकेत खोब्रागडे तो सध्या यवतमाळ पोलिस दलात कार्यरत आहे, या माजी विद्यार्थ्यासह शिखर सर केले.

### अनेकांकडून मिळाली कौतुकाची थाप

मोहिमेमध्ये इतर सहभागी विद्यार्थ्यांमध्ये दहावीमध्ये शिकणारा आलोक आडे याने ५००० मीटर तर श्रेयस पोहनकर याने ४८०० मीटरपर्यंत मजल मारली. मोहिमेला वर्धा जिल्हा शिक्षणाधिकारी जयश्री राऊत, सम्यक घोष, नवनीत थापा यांनी शुभेच्छा दिल्या होत्या. यशस्वी झाल्याबद्दल इंडियन मिलिटरी स्कूलचे अध्यक्ष मनोज भेंडे, सचिव कृष्णा कडू, कमांडंट के. एच. पाटील, प्राचार्य रविकिरण भोजने, पर्यवेक्षक नितीन कोठे आदींनी कौतुक केले.

## थोडक्यात

### गळफास घेत वृद्धाची आत्महत्या

**अमरावती :** गांधीनगर, प्रभात रेसीडेन्सी येथे एका वृद्धाने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. राजेश शंकरराव पाटील (६०) असे मृतकाचे नाव आहे. याबाबत प्रदीप शंकाच पाटील (५२, रा. किशोर नगर, अमरावती) यांनी राजापेठ पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी मर्ग दाखल केला.

### जावयाची मेहुण्यास मारहाण

**अमरावती :** जावयाने न सांगता बहिणीचा फोन नेला. दोघेही बहिणभाऊ फोन आणण्यासाठी जावई शुभम तेलमोरे (२६, रा. दाभा, ता. नांदगाव खंडेश्वर) येथे गेले. जावयाने दोघांनाही शिवीगाळ तर पत्नीला मारहाण केली. भाऊ तिच्या बचावासाठी धावला असता, त्यालाही लोखंडी रॉडने डोक्यावर मारले. यामध्ये दोघेही बहिणभाऊ जखमी झाले. याबाबत जखमी विवेक अतुल कुंभलवार याने दिलेल्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी जावयाविरुद्ध ११८ (१), ३५१ (२) अंतर्गत गुन्हा दाखल केला.

### क्षुल्लक कारणावरून वाद; तिघांची युवकाला मारहाण

**अमरावती :** पाण्याची पाईप लाईन फुटल्याच्या कारणावरून शेजारी राहणाऱ्या तिघांनी युवकासोबत वाद घालत लाथाबुक्क्यांनी मारहाण केले. शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना बनारसी बौद्ध विहाराजवळ घडली. नरेश गौतमराव मकेश्वर (३३) याच्या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलिसांनी रामदास गंफाजी मकेश्वर (६०), मंगेश रामदास मकेश्वर (३१) व रुपेश रामदास मकेश्वर (३७) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### अंजनगावबारीत वीज पडून दोन मेंढ्या ठार

**अंजनगाव बारी:** वीज पडून दोन मेढ्या जागीच ठार, तर पाच जखमी झाल्याची घटना अंजनगाव बारी स्मशानभूमीजवळ २ जुलै रोजी सायंकाळी घडली. ज्ञानेश्वर यमगर हे त्यांच्या मालकीच्या १० मेंढ्या चराईकरिता घेऊन जात होते. सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास गावाजवळच स्मशानभूमी जवळ आल्या असताना अचानक वीज कोसळली. या घटनेत दोन मेंढ्याचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जखमी झाल्या. यामध्ये यमगर यांचे अंदाजे 60 हजार रूपयांचे नुकसान झाले. याबाबत ज्ञानेश्वर यमगर यांनी तलाठ्याकडे घाव घेतली. तलाठ्यांनी घटनास्थळी येऊन मृत व जखमी मेंढ्याचा पंचनामा केला. जखमी मेंढ्यामध्ये पुन्हा तिन मेंढ्या वाचणार की नाही, हे सांगता येत नाही. शासनाने त्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

### ऑटो उलटून १० प्रवासी जखमी

**दर्यापूर** - भरधाव ऑटो पलटी होऊन १० प्रवाशी जखमी झाल्याची घटना बुधवारी दुपारी १ पारी १ वाजताच्या सुमारास तामसवाडी फाट्याजवळ घडली. फुलवंती नंदू बडोदे (३८), कविता नितेश कौचलकर (३०), अजय रवी नागले (२०), कोमल नंदू बडोदे (१५), प्रियांका रामू बडोदे (१८) सर्व रा. गोंडवाघोली ता. अंजनगाव सुर्जी अशी अपघातात जखमी झाल्याची नावे आहेत. दर्यापूर ते अंजनगाव मार्गावरील तामसवाडी फाट्याजवळ बुधवार रोजी दुपारी १ वाजता सुमारास ऑटो पलटी होऊन अपघात झाला. या अपघातात १० प्रवाशी जखमी झाले. त्यापैकी ३ जण गंभीर आहेत. त्यांना दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सर्वजण शाळेच्या कामानिमित्त ऑटोने जात होते. ऑटोचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. गंभीर जखमींना अमरावती येथील सामान्य रुग्णालयात रवाना करण्यात आले आहे.

अजिंक्य भारत
यवतमाळ जिल्हा
शुक्रवार, दि. ४ जुलै २०२५



## थोडक्यात



### कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीदिनी प्रतिमांचे वाटप

**उमरखेड :** हरितक्रांतीचे प्रणेते, कै. वसंतराव नाईक यांचे विचार घराघरांत पोहोचावेत, या उद्देशाने दराटी येथील तरुण कार्यकर्ते बबन जाधव यांनी नाईक यांच्या जयंतीदिनी त्यांच्या प्रतिमांचे तांड्या-वस्तीवर जाऊन वाटप केले. त्यांच्या या अनोख्या उपक्रमाचे कौतुक होत आहे. परमेश्वर उर्फ बबन जाधव यांनी 'शेतकरी हा कारखानदार झाला पाहिजे,' या नाईकांच्या स्वप्नाचा प्रसार करण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला. त्यांनी चिंचोली तांडा, अकोली, मन्याळी, बिटरगाव, जवराळा, मुरली यांसह अनेक गावांमध्ये आणि तांड्यांवर जाऊन प्रतिमांचे वाटप केले. तसेच, बिटरगाव येथील वसंतराव नाईक विद्यालय आणि पोलीस ठाण्यातही त्यांनी प्रतिमा भेट दिल्या. भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांचे ते खंदे समर्थक मानले जातात. या उपक्रमात त्यांचे सहकारी माजी सैनिक देवराव आडे, गजानन राठोड, किशोर जाधव, दशरथ राठोड यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.



### विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप

**महागाव :** येथील इंदिरानगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना 'सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप सोसायटी'तर्फे स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या 'उडान ग्रुप'मार्फत हा सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात आला. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणात कोणतीही कमतरता भासू नये आणि त्यांची आर्थिक अडचण दूर व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला. 'सहयोग'च्या महागाव शाखेतर्फे आयोजित या कार्यक्रमाला शाखेचे व्यवस्थापक मनोज सुकळकर, उत्कृष्ट ग्राहक जयश्री नरवाडे, शिक्षिका शीतल कावळे, शारदा दामधर, संजय नरवाडे, सुनील कोळपे, चित्तरंजन सिनकर आदी उपस्थित होते. मान्यवरांच्याहस्ते शाळेतील सर्व गरजू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग देण्यात आल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. संस्थेच्या या सामाजिक कार्याचे पालक आणि ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.



### कै. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

**यवतमाळ :** हरित क्रांतीचे जनक आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, कै. वसंतराव नाईक यांची ११२ वी जयंती येथील संकट मोचन चौकात उत्साहात साजरी करण्यात आली. बहुउद्देशीय प्रसारक महिला मंडळातर्फे आयोजित या कार्यक्रमात त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. मंगळवारी, (दि. १) रोजी झालेल्या या कार्यक्रमात वसंतराव नाईक यांच्या शेतकरीप्रेमाचा, दुष्काळमुक्तीसाठीच्या संघर्षाचा आणि देशाला हरित क्रांतीकडे नेणाऱ्या त्यांच्या भूमिकेचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला ज्येष्ठ मार्गदर्शक चंद्रशेखर चौधरी, समाजसेवक लोकेश इंगोले, महिला नेत्या मिनाक्षी सावळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबतच विद्या पाताळबंशी, सरस्वती ठाकूर, सुमन चव्हाण, कांता पवार, रजनी वाघाडे यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. उपस्थितांनी नाईकांच्या स्वप्नातील समृद्ध भारत घडवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. आदर्श बहुउद्देशीय प्रसारक महिला मंडळातर्फे या कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन करण्यात आले.

### 'विद्याधन' शिष्यवृत्तीसाठी अर्ज करा

**यवतमाळ :** सरोजिनी दामोदरन फाउंडेशनतर्फे आर्थिकदृष्ट्या वंचित गुणवंत विद्यार्थ्यांसाठी 'विद्याधन' उच्च शिक्षण शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. यासाठी ३० जुलैपर्यंत www.vidyadhan.org या संकेतस्थळावर किंवा 'SDF Vidya' ॲपवर ऑनलाइन अर्ज करता येईल. इन्फोसिसचे सह-संस्थापक एस.डी.शिबुलाल यांनी ही शिष्यवृत्ती सुरू केली आहे. २०२५ मध्ये दहावी उत्तीर्ण झालेले व ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दोन लाखांपेक्षा कमी आहे, असे विद्यार्थी पात्र आहेत. यासाठी ८५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण आवश्यक असून, अपंग विद्यार्थ्यांना ७५ टक्के गुणांची अट आहे. ऑनलाइन चाचणी आणि मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांची निवड केली जाईल.

## निधन वार्ता

### उत्तम नेवल



**उमरखेड :** तालुक्यातील पोफाळी ग्रामपंचायतचे माजी सरपंच आणि सेवा सहकारी संस्थेचे माजी अध्यक्ष उत्तम नारायण नेवल यांचे गुरुवारी, ३ जुलै रोजी सायंकाळी चार वाजता निधन झाले. ते दीर्घ काळापासून आजारी होते. नांदेड येथील रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने पोफाळी गावावर शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर त्यांचे मूळ गाव पोफाळी येथे शुक्रवारी, ४ जुलै रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, तीन भाऊ, दोन बहिणी आणि नातवंडांसह मोठा

# शेतकरी समृद्धीसाठी धोरण बदला

## ललित बहाळे : पुसदमध्ये वसंतराव नाईक जयंतीनिमित्त शेतकरी गौरव, २० प्रयोगशील शेतकऱ्यांचा सन्मान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**पुसद, दि. ३ :** 'शेती विश्वावर आता 'एआय' (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि 'जीएम' (जनुकीय संशोधित) तंत्रज्ञानाचा प्रभाव राहणार आहे. त्यामुळे, शेतकऱ्याची समृद्धी साधायची असेल, तर शासनाने तंत्रज्ञान आणि बाजारपेठेबद्दलचे आपले धोरण बदलले पाहिजे,' असे स्पष्ट प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश शेतकरी संघटनेचे अध्यक्ष ललित बहाळे यांनी केले. पुसद येथे ईश्वर फाउंडेशनतर्फे आयोजित 'वसंतराव नाईक शेतकरी गौरव' कार्यक्रमात ते बोलत होते.

हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीदिनानिमित्त, मंगळवारी (दि. १) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, २० प्रयोगशील शेतकऱ्याचा शाल, श्रीफळ आणि मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार संजय देशमुख होते. यावेळी बोलताना ललित बहाळे म्हणाले, 'शेतीतील प्रचंड उत्पादन देणाऱ्या जीएम तंत्रज्ञानाच्या स्वातंत्र्याचा संघटनेकडून आग्रह धरला जात आहे. शेतीतील तंत्रज्ञान आणि बाजारपेठेचे स्वातंत्र्य मिळाल्यास, शेतकऱ्यांना शेतीतून पैसा मिळू शकेल.' या कार्यक्रमात, कृषी पत्रकारितेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या यशोगाथा प्रसिद्ध करून त्यांना प्रेरणा दिल्याबद्दल, पत्रकार दिनकर गुल्हाने यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. खासदार संजय देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, 'शेतकऱ्यांचे प्रश्न लोकसभेत मांडणार असून, त्यांना न्याय मिळवून दिल्याशिवाय राहणार नाही,' अशी ग्वाही दिली. कृषी शास्त्रज्ञ गोविंद फुके आणि कृषिभूषण दीपक आसेगावकर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

### मान्यवरांची मोठी उपस्थिती

या कार्यक्रमाला खासदार संजय देशमुख यांच्यासह व्यासपीठावर कृषिभूषण दीपक आसेगावकर, कृषी शास्त्रज्ञ गोविंद फुके, आशिष देशमुख, शरद मैंद, अनुकूल चव्हाण, दयाराम चव्हाण, मोहम्मद नदीम, उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल, तहसीलदार महादेव जोरवर, तालुका कृषी अधिकारी विजय मुकाडे, विजय नवल, मिलिंद दामले, दीपक आनंदवार आणि प्रवीण शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रंगराव काळे यांनी केले.

### यांचा झाला गौरव

या कार्यक्रमात २० प्रयोगशील शेतकऱ्यांचा त्यांच्या कार्याबद्दल सन्मान करण्यात आला. यात निशांत राऊत, किशोर साखरे, मनिष जाधव, दिनकर गुल्हाने, शरद देशमुख, लक्ष्मण जाधव, आकाश प्रकाश जाधव, किशोर खेरासिंग राठोड, संजय तांबारे, ज्योती शंकर चव्हाण, देवराव तडसे, रवींद्र पुंड, सरिता रुपेश जाधव, नितेश शेजपाल, मोहिनी देशमुख, लेक संचालीत कृषी सेवा केंद्र (मांडवा), किरण हरिमकर, शिवाजी मस्के आणि विलास मंदाडे यांचा समावेश होता.

# ठाणेदाराविरुद्ध महिलांचे आमरण उपोषण

## पोलिसांवर प्रश्नचिन्ह, पीडितेचा ठाणेदारावर गंभीर आरोप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**पुसद, दि. ३ :** खंडाळा पोलिस स्टेशनचे ठाणेदार देविदास पाटील यांच्यावर गंभीर आरोप करत, दोन महिलांनी पुसद येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. एका महिलेने जबरदस्ती आणि अपमानास्पद वागणूक दिल्याचा, तर दुसऱ्या महिलेने तक्रारीची दखल न घेतल्याचा आरोप केला आहे.

मांजरजवळा येथील ६८ वर्षीय अनिताबाई बन्सी कांबळे यांनी १ जुलैपासून उपोषणाला सुरुवात केली आहे. त्यांच्या आरोपानुसार, शेतपेरणीसाठी पोलीस संरक्षणाची मागणी करूनही, ठाणेदार पाटील यांनी अर्ज स्वीकारण्यास नकार दिला आणि संरक्षण दिले नाही. उलट, वरिष्ठांकडे तक्रार केल्याचा राग मनात धरून, पाटील यांनी 'तुम्ही हरामखोर आहात, बदमाश आहात' असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच, खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत, त्यांना सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत पाणी आणि स्वच्छतागृहाच्या सुविधेविना पोलीस ठाण्यात बसवून ठेवले. यानंतर एका पोलीस कर्मचाऱ्याला, 'हिला मोटारसायकलवर फरफटत तहसील कार्यालयात घेऊन जा,' असे आदेश दिल्याचा गंभीर आरोपही कांबळे यांनी आपल्या तक्रारीत केला आहे. याचवेळी, देवठाणा येथील ५४ वर्षीय मिराबाई बबन कान्हेकर यादेखील आपल्या मालकीच्या प्लॉटच्या तक्रारीवर पाटील यांनी दखल न घेतल्याने २ जुलैपासून उपोषणाला बसल्या आहेत. ठाणेदार पाटील यांचा कार्यकाळ वादग्रस्त ठरत असून, त्यांच्यावर एका वरिष्ठ भाजप मंत्र्यांचा वरदहस्त असल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे. वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने, वरिष्ठ पोलीस अधिकारी आता काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आशा सेविकेची निवड वादाच्या भोवऱ्यात

## फेरनिवडीसाठी तक्रार, वयाची अट पूर्ण नसतानाही निवड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**महागाव, दि. ३ :** तालुक्यातील इजनी येथील आशा सेविकेची निवड प्रक्रिया वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. निवड झालेली उमेदवार वयाची अट पूर्ण करत नसतानाह, नियमांचे उल्लंघन करून आणि पदाचा गैरवापर करून निवड करण्यात आल्याचा गंभीर आरोप करत, ह संपूर्ण निवड प्रक्रिया रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याप्रकरणी, बिरसा ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष तुकाराम उमरे यांनी १ जुलै २०२५ रोजी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीनुसार, इजनी येथील आशा सेविका म्हणून विशेष ग्रामसभेत निवड झालेल्या निशा अजय जाधव या शासन निर्णयानुसार वयाची अट पूर्ण करत नाहत. २ जानेवारी २००९ च्या शासन निर्णयानुसार, या पदासाठी उमेदवाराचे वय किमान २५ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे, मात्र जाधव या पात्र नसल्याचा आरोप उमरे यांनी केला आहे. गावातील एका ग्रामपंचायत सदस्याने आपल्या पदाचा गैरवापर करून आणि ग्रामसचिवावर दबाव आणून, त्यांची सहमती नसतानाह हा निवडीचा ठराव मंजूर करून घेतला, असेह तक्रारीत म्हटले आहे. विशेष म्हणजे, खुद्द ग्रामसचिवाने या ठरावावर आपली स्पष्ट असहमती नोंदवली आहे. 'निवडलेला उमेदवार वयाची अट पूर्ण करत नसल्याने, या निवडीस ग्रामपंचायत सचिवांची सहमती नाह,' असा स्पष्ट उल्लेख त्या ठरावात करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यामुळे, हा वादग्रस्त ठराव आणि निवड प्रक्रिया तात्काळ रद्द करून, नियमांनुसार नव्याने आशा सेविकेची निवड करावी, अशी जोरदार मागणी तुकाराम उमरे यांनी आपल्या निवेदनाद्वारे केली आहे.

# शिवाजी महाराज पुतळा समितीचे उपोषण सुटले

## आता अतिक्रमणावर कारवाई होणार




दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ३ :** छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणीसंदर्भातील मागण्यांसाठी सुरू असलेले उपोषण, प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर अखेर मागे घेण्यात आले. उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांच्या हस्ते सरबत पिऊन उपोषणकर्त्यांनी आपले आंदोलन सोडले.

पुतळा कृती समितीचे गजानन देशमुख, गुलाबराव सूर्यवंशी, विष्णू गोरे आणि प्रवीण देशपांडे हे उपोषणाला बसले होते. त्यांची प्रमुख मागणी भारत पेट्रोलियम पंपाच्या अतिक्रमणाबाबत होती. प्रशासनाने केलेल्या मोजणीत, पंपाने दोन मीटर अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार, १ जुलै रोजी नोटीस देऊन कायदेशीर कारवाई केली जाईल, असे लेखी आश्वासन उपविभागीय अधिकारी मुळे यांनी दिले. तसेच, पंपाची लीज रद्द करण्याचा प्रस्ताव सात दिवसांत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवून त्याचा पाठपुरावा करण्याचेही आश्वासन देण्यात आले.

# सरकारी शाळेतच विद्यार्थ्यांना मिळतात खरे संस्कार

## शंकर केमेकार : अहेकल्ली येथील जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**पाटणबोरी, दि. ३ :** 'आपल्या पाल्यांना आदर्श आणि संस्कारी बनवायचे असेल, तर त्यांना हजारो रुपये शुल्क घेणाऱ्या खासगी शाळांऐवजी जिल्हा परिषद शाळांमध्येच दाखल करा,' असे कळकळीचे आवाहन अहेकल्ली येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शंकर केमेकार यांनी केले. शाळेत आयोजित करण्यात आलेल्या प्रवेशोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी त्यांनी पालकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, खासगी शाळा भरमसाठ शुल्क आकारतात, मात्र तेथे केवळ परीक्षा उत्तीर्ण करण्यावर भर दिला जातो; संस्कार आणि शिस्त शिकवली जात नाही. याउलट, जिल्हा परिषद शाळांमध्ये अनुभवी शिक्षक असल्याने येथेच विद्यार्थ्यांना खरे संस्कार आणि शिस्त मिळू शकते. विद्यार्थ्यांची हुशारी केवळ शिक्षकांवर नव्हे, तर विद्यार्थी आणि पालकांच्या सहभागावरही अवलंबून असते, असे ते म्हणाले. 'आपण खासगी शाळांवर हजारो रुपये खर्च करत राहिलो, तर एक दिवस सरकारी शाळा बंद पडतील आणि गोरगरिबांच्या शिक्षणाचे काय होईल,' असा सवालही त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या या आवाहनाला पालकांनी मोठा प्रतिसाद दिला, ज्यामुळे शाळेत शंभर टक्के पटनोंदणी यशस्वी झाली. यानंतर लगेचच सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय मन्ने, उपाध्यक्ष जीवन भोयर, सर्व सदस्य आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक शंकर केमेकार यांच्यासह शिक्षिका संगीता गड्डमवार आणि शिक्षक रमेश बनपेल्लीवार यांनी परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा स्तुत्य उपक्रम; ७० विद्यार्थ्यांना मदतीचा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**आर्णी, दि. ३ :** शिक्षणाच्या प्रवाहात कोणीही मागे राहू नये, या उदात्त हेतूने 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट' या सामाजिक संस्थेतर्फे तालुक्यातील शेलू (अंजनखेड) येथील गुरुदेव रवींद्रनाथ टागोर विद्यालयातील ७० गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या स्तुत्य उपक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय प्रकल्पाधिकारी राम हरी इरकर होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रकल्प अधिकारी दिलीप हंबरे, सहायक समन्वयक वैभव गवळी, कमर शेख, नितेश पवार, तसेच शाळेचे मुख्याध्यापक नामदेव मालखेडे, शिक्षक पुरुषोत्तम दरेकर, सुनील मानतुटे आणि संजय नारनवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात बोलताना रामहरी इरकर यांनी ट्रस्टच्या कार्याचे कौतुक केले. शिक्षणापासून वंचित असलेल्या घटकाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे काम ही संस्था करत आहे, असे ते म्हणाले. त्यांनी विद्यार्थ्यांना या संधीचा फायदा घेऊन, आपल्यातील कलागुणांना वाव द्यावा आणि जिद्द व परिश्रमाने स्पर्धा परीक्षांची तयारी करून मोठे यश मिळवावे, असे आवाहन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ७० विद्यार्थ्यांना बॅग, वह्या, कंपास बॉक्स, ग्राफबुक आणि चित्रकला वही यांसारख्या आवश्यक शैक्षणिक वस्तूंचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप हंबरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव गवळी यांनी केले, तर कमर शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## कागदपत्रे हरविली

मी उमेश देविदास जाधव, दिग्रस येथील रहिवासी असून दि. २७/०६/२०२५ रोजी दिग्रस तहसील कार्यालयात कामानिमित्ताने आलो होतो. तेव्हा माझे सोबत एका छोट्या थैलीमध्ये डि. एड. शिक्षण घेतलेल्या शिवाजी अध्यापक विद्यालय, पुसदचे शाळा सोडल्याची अस्सल प्रत, आधार कार्ड तसेच इतर शैक्षणिक कागदपत्रांच्या झेरॉक्सप्रती होत्या. मी तहसिलमधुन माझे काम आटोपल्यानंतर परत निघालो असता, माझे थैलीमधील वरील ठेवलेले दस्तऐवज दिसून आले नाही. त्यामुळे त्यांचा मी शोधाशोध घेतला असता मला ते मिळून आले नाही.

संपर्क
**उमेश देविदास जाधव**
दिग्रस, ता. दिग्रस, जि. यवतमाळ
मो.९०४९९८२४०५

# हायमास्ट लाइट घोटाळा विधानसभेत गाजला

## आमदार बाळासाहेब मांगुळकरांचा गंभीर आरोप; १.७८ कोटींच्या निधीची अफरातफर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.३: यवतमाळ नगरपरिषदेतील सोलर आणि एलईडी हायमास्ट लाईटच्या कामांमध्ये सुमारे एक कोटी ७८ लाख रुपयांचा मोठा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप यवतमाळचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी केला आहे. मुंबईत सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात, त्यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे हा विषय उपस्थित करून, या संपूर्ण प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी केली आहे.**




### शासनाच्या तिजोरीला १.७८ कोटींचा फटका

या प्रकरणात, संबंधित अधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर करून, अवाजवी आणि वाढीव दरांना मंजुरी दिली, असा आरोप आमदारांनी केला आहे. या गैरव्यवहारामुळे शासनाच्या तिजोरीला तब्बल एक कोटी ७८ लाख ९०हजार ५६४ रुपयांचे थेट आर्थिक नुकसान झाले आहे. हा निधी जनतेच्या विकासासाठी वापरला जाण्याऐवजी, तो अफरातफत वाया गेल्याचा ठपका त्यांनी ठेवला आहे.

### नियमांना हरताळ फासून दिला ठेका

आमदार मांगुळकर यांच्या आरोपानुसार, हे काम देताना अनेक नियम धाब्यावर बसवण्यात आले. ३.२४ कोटी रुपयांच्या या कामासाठी, ४० हायमास्ट लाइटचा ठेका 'कुलकर्णी अँड सन्स' या एकाच एजन्सीला विना-स्पर्धा देण्यात आला. तसेच, कामाचे दर ठरवताना बाजारभावाची तुलना केली नाही आणि सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा 'मेडा' यांसारख्या वरिष्ठ तांत्रिक यंत्रणांची आवश्यक मंजुरीही घेतली नाही.

आमदार मांगुळकर यांनी विधानसभेत दिलेल्या माहितीनुसार, 'साल २०२३-२४ मध्ये यवतमाळ नगरपरिषदेच्या विद्युत विभागाने एकूण ४२ हायमास्ट लाईटसाठी ३ कोटी २४ लाख रुपयांची कामे मंजूर केली होती. त्यापैकी, ४० हायमास्ट लाइटची कामे 'कुलकर्णी अँड सन्स, यवतमाळ' या एकाच एजन्सीला कोणतीही स्पर्धा न करता देण्यात आली,' असा आरोप त्यांनी केला. 'या कामांना आवश्यक असलेली सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा 'मेडा' (महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण) यांसारख्या वरिष्ठ यंत्रणांची तांत्रिक मान्यता घेण्यात आली नाही,' असेही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

'संबंधित अधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर करून, बाजारभावाची तुलना न करता वाढीव दरांना मंजुरी दिली,' असा ठपकाही मांगुळकर यांनी ठेवला. सोलर हायमास्टच्या बाबतीत संबंधित अभियंत्यांना अनुभव नसताना, त्यांनी पदाचा दुरुपयोग करून जास्त दरास मान्यता दिली व सरकारी निधीची अफरातफर केली आहे. 'त्यामुळे, शासनाच्या तिजोरीचे एक कोटी ७८ लाख ९० हजार ५६४ रुपयांचे थेट नुकसान झाले आहे.' 'त्यामुळे, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी,' अशी मागणी त्यांनी सभागृहात केली. या आरोपामुळे नगरपरिषदेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शासन यावर काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### नुकसानग्रस्त भागाचे तातडीने पंचनामे करा

**राळेगाव :** पावसाने दडी मारल्याने आलेले दुबार पेरणीचे संकट, वन्यप्राण्यांचा धुमाकूळ आणि अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या जमिनी, अशा तिहेरी संकटात तालुक्यातील शेतकरी सापडला आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून मदत करावी, अशी मागणी जिल्हा युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे संजय कारवटकर यांनी केली आहे. अपुऱ्या पावसामुळे ७५ टक्के पेरण्या विस्कळीत झाल्या आहेत. त्यातच, जंगली डुकरे, रोही आणि माकडे पिकांची मोठी नासाडी करत आहेत. तर, २६ जूनच्या अतिवृष्टीने धानोरा, रोहिणी, येवती परिसरातील जमिनी खरडून गेल्या आहेत. महागडी बियाणे आणि थकलेल्या कर्जामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहे. त्यामुळे, शासनाने वन्यप्राण्यांपासून संरक्षणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, दुबार पेरणीसाठी आणि पूरग्रस्त भागात तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी श्री. कारवटकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### प्रदेश उपाध्यक्षपदी वसंत ढोके

**यवतमाळ :** आम आदमी पार्टीचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष वसंत ढोके यांची महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. प्रदेश प्रभारी प्रकाश जरवाल आणि कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके पाटील यांनी सोमवारी (दि. ३०) ही घोषणा केली. पक्षाच्या स्थापनेपासून एकनिष्ठेने काम करणे आणि संघटनात्मक कौशल्यामुळे ढोके यांना ही जबाबदारी देण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या निवडीबद्दल यवतमाळ येथील जिल्हा कार्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विलास वाडे, मनिष माहुलकर, किशोर साखरकर, अशोक कारमोरे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### दुचाकी लंपास

**खंडाळा :** खंडाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बेलोरा येथून एक दुचाकी लंपास झाल्याची घटना घडली आहे. शेषराव धनु राठोड (वय ५२, रा. कनेरवाडी) यांनी तक्रार दिली. २७ जून रोजी त्यांची ४५ हजार रुपये किमतीची एम.एच. ३७ ए.सी. २६८४ क्रमांकाची दुचाकी अनोळखी व्यक्तीने चोरून नेली. घटनास्थळावरून ही दुचाकी लंपास झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांत धाव घेतली.

CAPTION फवारणी...



**दिग्रस :** यंदा समाधानकारक पावसामुळे पेरणी यशस्वी झाली आहे. असे असले तरी आता तालुक्यात सततच्या रिमझिम पावसामुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी एका नवीन संकटात सापडला आहे. सततच्या पावसामुळे सोयाबीनच्या पिकात मोठ्या प्रमाणात तण वाढले असून, ते नियंत्रणात आणण्यासाठी फवारणी करताना शेतकरी. (छायाचित्र : फारुक अहेमद)

## दोन दुचाकींची समोरासमोर धडक

**यवतमाळ, दि. ३ :** शहरात दोन दुचाकींच्या धडकेत एक व्यक्ती गंभीर जखमी झाला. कृष्णा किनाके (वय ५६) असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. ते किराणा सामान घेऊन दुचाकी (क्र. एमएच २९ /बीके ७६८५) ने घरी येत होते. यावेळी समोरून भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे आलेल्या एका अनोळखी दुचाकीस्वाराने त्यांच्या वाहनाला धडक दिली. या अपघातात कृष्णा किनाके हे गंभीर जखमी झाले. घटनेनंतर आरोपी दुचाकीस्वार पळून गेला. याप्रकरणी त्यांची मुलगी पायल कृष्णा किनाके यांनी दिलेल्या तक्रारीवरून, शहर पोलिसांनी अनोळखी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. शहरात अपघातांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## विधिसंघर्षग्रस्त बालकाकडून २० वर्षीय तरुणाचा खून

### जुन्या वादातून गळ्यावर चाकूने सपासप वार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि.३:** जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीचा पुन्हा एकदा प्रत्यय आला असून, लाडखेड पोलिस ठाणे हद्दीतील देऊरवाडी येथे एका विधिसंघर्षग्रस्त बालकाने २० वर्षीय तरुणाचा खून केला. जुन्या वादातून ही घटना घडली असून, पोलिसांनी संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे.

रोहन दीपक चामलाटे (वय २०) असे मृत तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री तो देऊरवाडी येथील चौकात उभा असताना, विधिसंघर्षग्रस्त बालकाने जुन्या वादातून त्याच्या गळ्यावर चाकूने तीन ते चार वार केले. यात गंभीर जखमी होऊन रोहन रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. या घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. याप्रकरणी मृत रोहनची आई रेखा चामलाटे यांनी तक्रार दिल्यानंतर, लाडखेड पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. पोलिस देऊरवाडीत दाखल झाले परंतु संशयित आरोपी बोरी-अरब रस्त्यावर असल्याची माहिती मिळताच, पोलिसांनी त्याला रात्रीच ताब्यात घेतले. जिल्ह्यात खुनाच्या घटनांमध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग वाढत असल्याने चिंतेचे वातावरण आहे.

## दहा हजारांवर शेतकरी मदतीपासून वंचित

### अतिवृष्टीची नुकसानभरपाई अडकली लालफितशाहीत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

> 'अतिवृष्टी नुकसानभरपाईचा लाभ मिळविण्यासाठी तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपली 'केवायसी' प्रक्रिया तातडीने पूर्ण करून घ्यावी. तसेच, सामायिक खातेधारक शेतकऱ्यांनी लाभासाठी संमतिपत्र देणे आवश्यक आहे,'
>
> -मयूर राऊत, तहसीलदार, दिग्रस.

**दिग्रस, दि.३:** खरीप हंगाम-२०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान सोसलेल्या दिग्रस तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांची नुकसानभरपाईसाठी प्रतीक्षा अद्याप संपलेली नाही. शासनाने मदत मंजूर करून अनेक महिने उलटले असले, तरी प्रशासकीय दिरंगाईमुळे १७हजारांहून अधिक पात्र शेतकऱ्यांपैकी केवळ ७२०० जणांनाच आतापर्यंत लाभ मिळाला आहे.

दिग्रस तालुक्यात ३१ ऑगस्ट ते ३सप्टेंबर २०२४ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले होते. शासनाने मदत मंजूर केल्यानंतर, एप्रिल महिन्यापासून शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण आणि 'केवायसी'ची प्रक्रिया सुरू केली. कृषी विभागाने २३ हजार बाधित शेतकऱ्यांची यादी दिली होती, ज्यापैकी १७,४८८ शेतकऱ्यांची अंतिम पात्र यादी शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली. मात्र, मदतीचे वितरण अत्यंत धीम्या गतीने झाले. ३० जूनपर्यंत केवळ १५८४ शेतकऱ्यांना लाभ मिळाला होता. त्यानंतर प्रक्रियेला वेग आला आणि ३ जुलैपर्यंत हा आकडा ७२०० वर पोहोचला आहे. असे असले तरी, अजूनही १०हजारांपेक्षा जास्त शेतकरी मदतीपासून वंचित आहेत. ऐन खरीप पेरणीच्या तोंडावर तरी ही मदत खात्यात जमा होईल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, मदत मिळण्यास उशीर झाल्याने अनेक गरजू शेतकऱ्यांना घरातील दागिने विकून किंवा कर्ज काढून पेरणी करावी लागल्याचे समजते.

## दोघांकडून चोरीतील आठ दुचाकी जप्त

### 'एलसीबी'ची कारवाई; आरोपींमध्ये अमरावतीच्या गुन्हेगाराचा समावेश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.३:** यवतमाळ शहर आणि परिसरात वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यात स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश आले आहे. पोलिसांनी २ जुलै रोजी केलेल्या एका मोठ्या कारवाईत, दोन सराईत आरोपींना अटक करून त्यांच्याकडून चोरीच्या एकूण आठ मोटारसायकल जप्त केल्या आहेत. जप्त केलेल्या या मुद्देमालाची एकूण किंमत ४ लाख २० हजार रुपये आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्त घालत असताना, त्यांना शेख सोहेल शेख मेहबूब (वय २७, रा. मेमन कॉलनी, यवतमाळ) हा चोरीची दुचाकी विकण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, त्याने इतरी दुचाक्या चोरल्याची कबुली दिली. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीवरून, अमरावती येथील सराईत गुन्हेगार फारूख खान उर्फ शाहरुख शमशेर खान (वय ३२, रा. अकबर नगर, अमरावती) यालाही ताब्यात घेण्यात आले. तो यवतमाळात सासुरवाडीला आला होता. त्यानेही यवतमाळच्या वडगाव आणि नेर परिसरातून दुचाक्या चोरल्याचे कबूल केले. या दोन्ही आरोपींकडून पोलिसांनी एकूण आठ मोटारसायकल जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे अवधूतवाडी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या दुचाकी चोरीच्या दोन गुन्ह्यांची उकल झाली आहे. ही यशस्वी कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक पियुष जगताप आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. या कारवाईत पोलिस उपनिरीक्षक गजानन राजमल्लू, तसेच कर्मचारी सय्यद साजिद, रूपेश पाली, योगेश डगवार, प्रशांत हेडाऊ, कविश पाळेकर, सुनील पैठणे, आकाश सूर्यवंशी, देवेंद्र होले, सोहेल मिर्झा आणि दिगांबर पिलावन यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली.

## भोयर येथील १२१ कुटुंबांचा मुख्य रस्ता अचानक बंद

### रेल्वेच्या कामामुळे नागरिक संतप्त; काँग्रेस शिष्टमंडळाने घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि.३:** नागपूर-नांदेड नवीन रेल्वे लाईनच्या कामामुळे भोयर (ता. यवतमाळ) येथील १२१ कुटुंबांचा मुख्य रहदारीचा रस्ता अचानक खोदण्यात आल्याने, या नागरिकांची मोठी अडचण झाली आहे. पर्यायी रस्त्याची सोय न करता झालेल्या या कामामुळे संतप्त नागरिकांनी काँग्रेसच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेत, तातडीने मार्ग काढून देण्याची मागणी केली आहे.

रेल्वेच्या ठेकेदारांनी २ जुलै रोजी दुपारी कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक मुख्य रस्ता खोदण्याचे काम सुरू केले. यामुळे या परिसरातील रहिवाशांना घरातून बाहेर पडणेही मुश्किल झाले असून, वैद्यकीय आणीबाणी, मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन रोजगार धोक्यात आला आहे, असे नागरिकांनी सांगितले. यासोबतच, हे सर्व रहिवासी गेल्या १७ वर्षांपासून ग्रामपंचायतीच्या ई-क्लास जमिनीवर राहत असून, अद्याप त्यांची घरे नियमित करण्यात आलेली नाहीत. त्यांना पाणी, रस्ते, आरोग्य अशा मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोपही करण्यात आला. या गंभीर समस्यांची दखल घेण्यासाठी, यवतमाळ शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. बब्लू उर्फ अनिल देशमुख यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने गुरुवारी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. या निवेदनात, खोदलेला रस्ता तत्काळ खुला करावा किंवा पर्यायी मार्गाची सोय करावी आणि सर्व्हे नं. ३९ मधील १२१ कुटुंबांची घरे नियमित करून त्यांना सर्व नागरी सुविधा द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने यावर तातडीने दखल न घेतल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. या शिष्टमंडळात तालुका काँग्रेस अध्यक्ष रमेश भिसनकर, बाजार समितीचे सभापती रवी ढोक, सरपंच राहुल पारधी, अरविंद जाधव, राजेंद्र कुंभाटे यांच्यासह अनेक महिला आणि नागरिक सहभागी झाले होते.

## नॅचरल शुगर कारखान्याचा रोलर पूजन सोहळा संपन्न

### कृषिरत्न बी. बी. ठोंबरे यांच्या हस्ते पूजन; नवीन गळीत हंगामाचा शुभारंभ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**महागाव, दि.३:** येथील नॅचरल शुगर कारखान्याच्या नवीन गळीत हंगामाचा शुभारंभ आज, गुरुवारी रोलर पूजन करून करण्यात आला. चेअरमन कृषिरत्न बी. बी. ठोंबरे यांच्या हस्ते झालेल्या या कार्यक्रमाला ऊस उत्पादक शेतकरी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा साखर कारखाना महागाव, उमरखेड आणि पुसद तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी कामधेनू ठरत आहे. विदर्भात ऊस उत्पादकांना सर्वाधिक भाव देण्याचा मान या कारखान्याने मिळवला आहे, असे यावेळी सांगण्यात आले. 'येणाऱ्या हंगामात जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस देऊन सहकार्य करावे,' असे आवाहन चेअरमन बी. बी. ठोंबरे यांनी केले. या रोलर पूजन सोहळ्याला शिवाजीराव देशमुख, अमृतराव देशमुख, विजय सूर्यवंशी, विशाल पवार, विनायक सरसमकर आणि कारखान्याचे व्यवस्थापक एम. डी. कदम यांच्यासह अनेक प्रतिष्ठित व्यक्ती व शेतकरी उपस्थित होते.